# श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)

**सभा क्र. १०/ २०१२** **दिनांक १२.०६.२०१२**

**स्थळ -(मुख्य जिल्हा न्यायाधिश यांचे कार्यालय) अहमदनगर** **वेळ-सायंकाळी ५०० वाजता**

श्री साईबाबा संस्थान व्यवस्थापन समितीची सभा मंगळवार दिनांक १२.०६.२०१२ रोजी सायंकाळी ०५.०० वाजता अहमदनगर येथे मा.मुख्य जिल्हा न्यायाधीश यांचे कार्यालयात आयोजित करण्यात आली असलेबाबत इकडील जा.नं. एसएसएस-वशी-०४-११०५-२०१२, दिनांक ११ जुन, २०१२ रोजीचे पत्राने सर्व सदस्यांना कळविण्यात आले होते.

त्यानुसार सदरहू सभा मंगळवार दिनांक १२.०६.२०१२ रोजी सायंकाळी ०५.०० वाजता अहमदनगर येथे मा.मुख्य जिल्हा न्यायाधीश यांचे कार्यालयात मा.अध्यक्ष श्री.जयंत दत्तात्रय कुलकर्णी यांचे अध्यक्षतेखाली सुरु करण्यात आली.

या सभेस खालील मा. सदस्य उपस्थित होते.

०१. मा.श्री.जयंत दत्तात्रय कुलकर्णी, मुख्य जिल्हा न्यायाधीश, अहमदनगर, अध्यक्ष

०२. मा.डॉ.संजीवकुमार, जिल्हाधिकारी, अहमदनगर, सदस्य

०३. श्री.किशोर मोरे, कार्यकारी अधिकारी, सदस्य

सभेच्या सुरुवातीस श्रीसाईबाबांची प्रार्थना करणेत येऊन शासन अधिनियमातील कलम ११ (२) नुसार आवश्यक गणपूर्ती असल्याने सभेचे कामकाज मा.अध्यक्ष मा.श्री.जयंत दत्तात्रय कुलकर्णी, मुख्य जिल्हा न्यायाधीश, अहमदनगर यांचे अध्यक्षतेखाली सुरु करण्यात आले.

यानंतर विषय पत्रिकेवरील विषयांवर चर्चा सुरू करणेत आली.

**विषय नं.०१** **दिनांक ३१.०३.२०१२ रोजी शिर्डी येथे झालेल्या व्यवस्थापन समिती सभेचे इतिवृत्त.**

**निर्णय क्र.४०३** **दिनांक ३१.०३.२०१२ रोजी शिर्डी येथे झालेल्या व्यवस्थापन समिती सभेचे इतिवृत्ताच्या प्रती सर्व सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या, त्याची नोंद घेत असतांना खालीलप्रमाणे दुरुस्त्या करण्यात आल्या.**

**(०१) निर्णय क्र.२६१ मधील शेवटचा परिच्छेद-**

परंतु आजचे सभेत सविस्तर चर्चा होऊन उपरोक्तप्रमाणे झालेला निर्णय रद्द करणेत येऊन यापुढे धनादेश व बँकेस देण्यात येणाऱ्या धनकर्षासाठीच्या पत्रावरील स्वाक्षरीचे संपुर्ण अधिकार मा.कार्यकारी अधिकारी यांना प्रदान करणेत यावे, असे ठरले.

**याऐवजी खालीलप्रमाणे वाचण्यात यावे.**

**परंतु आजचे सभेत सविस्तर चर्चा होऊन उपरोक्तप्रमाणे झालेला निर्णय रद्द करणेत येऊन यापुढे धनादेश व बँकेस देण्यात येणाऱ्या धनकर्षासाठीच्या पत्रावरील स्वाक्षरीचे संपुर्ण अधिकार मा.कार्यकारी अधिकारी यांना प्रदान करणेत यावे, तसेच मा.कार्यकारी अधिकारी यांचे अनुपस्थितीत हे अधिकार मा.उप कार्यकारी अधिकारी यांना असतील असे ठरले.** (कार्यवाही-मुख्य लेखाधिकारी)

---

**विषय नं.०२** **दिनांक ०६.०४.२०१२ रोजी शिर्डी येथे झालेल्या व्यवस्थापन समिती सभेचे इतिवृत्त.**

**निर्णय क्र.४०४** **दिनांक ०६.०४.२०१२ रोजी शिर्डी येथे झालेल्या व्यवस्थापन समिती सभेचे इतिवृत्ताच्या प्रती सर्व सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या, त्याची नोंद घेत असताना खालीलप्रमाणे दुरुस्त्या करणेत आल्या.**

**(०१) निर्णय क्र.२६३ (०५)-**

श्री साई आश्रमच्या खोल्यांकरिता कुलूप खरेदीची निविदा उघडून संबंधीत निविदा धारकांशी वाटाघाटी करण्यात आल्या.

**याऐवजी खालीलप्रमाणे वाचण्यात यावे.**

**श्री साई आश्रमच्या खोल्यांकरिता कुलूपे खरेदीची निविदा उघडून लिंक अतूट पॅड लॉक नं.५५ एमएम ७ लिव्हर घेण्याचे ठरलें. संबंधीत निविदा धारकांशी वाटाघाटी करण्यात आल्या. चर्चा/ वाटाघाटीअंती मे.दाता सिक्यूरिटी फर्निचर वर्क्स,अहमदनगर यांचे निम्नतम दर रु.१६५/- प्रती नग असल्याने त्यांना साईआश्रमसाठी २००० नग कूलपे व द्वारावती भक्तनिवाससाठी १६० नग कुलपे पुरवठा करणेकामी कार्यादेश देण्यात यावा,असें ठरलें.** (कार्यवाही-अधिक्षक,व्दारावती निवासस्थान)

---

**(०२) निर्णय क्र.२७१-**

यावर सविस्तर चर्चा होऊन खालीलप्रमाणे शिफारशी करण्यात आल्या.

**१.** गडद केलेले न्युनतम दर स्विकारण्यात यावे.

**२.** ज्या किराणा माल साहित्यासाठी मालाचे नमुने हे एकाच पुरवठाधारकाचे आल्याने व ते योग्य असल्याने एकच दर असूनही स्विकारण्यात यावेत.

**३.** **जायफळ:-** आलेले नमुने योग्य न वाटल्यामुळे एकही नमुना निवडण्यात आला नाही. त्यामुळे आवश्यकतेनुसार बाजारभावाने किंवा पुन्हा फेर कोटेशन मागवून खरेदी करावे.

४. **बिस्कीटे:-** पुर्वीप्रमाणेच बिस्कीटे कंपनी दराप्रमाणेच (MRP) विक्री करण्यात यावीत.

५. **पॅकेज्ड ड्रिंकिंग वॉटर:-** पॅकेज्ड ड्रिंकिंग वॉटर १ लिटर रु.८/- व ५०० मिली रु.५/- प्रति बाटली याप्रमाणे विक्री करण्यात यावी.

६. **तांदुळ खरेदीसाठी:-** आजचे सभेत संबंधीत निविदाधारकांकडून सुट दरपत्रके घेण्यात आलेली आहेत तसेच तांदुळाचे नमूने निवडण्यात आलेले आहेत. निवडण्यात आलेल्या नमून्यांचा तांदूळ सस्थानचे प्रसादालयात शिजविण्यात यावा व त्याचा अहवाल पुढील सभेपुढे सादर करावा. अहवालानुसार उत्कृष्ट अभिप्राय असलेल्या संबंधीत तांदुळ निविदाधारकांना दराबाबत चर्चा/ वाटाघाटीसाठी पुढील सभेपुढे बोलविणेत यावे.

७. **व्हॅट:-** शासन निर्णयानुसार व्हॅट रक्कम आदा करण्यात येईल.

**याऐवजी खालीलप्रमाणे वाचण्यात यावे.**

**प्रसादालय/कॅन्टीन या विभागांसाठी किराणा माल खरेदी करणेबाबत मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाने जनहित याचिका क्र.१८/२०११ मधील दिवाणी अर्ज नं.४०५१/२०१२ मध्ये दिनांक ०५.०५.२०१२ रोजी केलेल्या हूकुमानुसार प्रसादालय/कॅन्टीन या विभागांसाठी जुन,२०१२ ते सप्टेबर,२०१२ या ०४ महिने कालावधीकरिता आवश्यक असणारा किराणा माल खरेदीकामी ०२ स्थानिक व ०२ आघाडीचे राष्ट्रीय वर्तमानपत्रात जाहिरात देऊन टेंडर्स मागविण्यात यावेत व विहित पद्धतीने किराणा माल खरेदी करण्यात यावा. तसेंच सदरची खरेदी विषयक प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत सन २०११-१२ या आर्थिक वर्षातील मंजूर दरानुसार प्रसादालयासाठी लागणारा माल खरेदी करण्यात यावा असें ठरले.** (कार्यवाही-अधिक्षक,खरेदी विभाग)

---

**(०३) निर्णय क्र. २९९-**

यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.

**याऐवजी खालीलप्रमाणे वाचण्यात यावे.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, येथूनपुढे On Consignment basis वरील कुठल्याही स्टेन्ट/ व्हॉल्व्ह/ बलुन/ पेसमेकर इ. साहित्यांवर जेथे C.G.H.S. चे दर प्राप्त झालेले आहेत तेथे त्याच दराने किंवा त्यापेक्षा जर चर्चा/ वाटाघाटीनंतरचे दर कमी प्राप्त झालेले असतील त्या दोन्ही पैकी जे निम्नतम दर असतील त्याप्रमाणे स्विकारणेत यावेत व बीले आदा करणेत यावेत. तसेच येथून पुढे कुठल्याही On Consignment basis वर ठेवण्यात आलेल्या साहित्यांवर मुळ रक्कम व चर्चा/ वाटाघाटीनंतरचे आलेल्या दरातील फरक देणगी म्हणून स्वीकारु नये, असे ठरले.** (कार्यवाही-वैद्यकिय संचालक)

---

**(०४) निर्णय क्र. ३१२-**

यावर सविस्तर चर्चा होऊन, स्ट्रेस टेस्ट मशीनचे Console PC बदलुन घेणेसाठी मे.नासन मेडिकल्स, पुणे या कंपनीचे प्रतिनिधीस व्यवस्थापन समितीचे सभेपुढे बोलावून प्रत्यक्ष वाटाघाटी करणेस व याकामी येणाऱ्या अंदाजे एकुण रू.१,७०,०००/- चे खर्चास मान्यता देण्यात आली.

**याऐवजी खालीलप्रमाणे वाचण्यात यावे.**

त्यानुसार मे. नासन मेडिकल्स, पुणे यांचे अधिकृत डिलर मे.गॅलॅक्सी मेडिकल सिस्टीम्स, पुणे यांना आजचे सभेपुढे बोलविण्यात आले होते.

त्यास अनूसरुन आजचे सभेपुढे मे.गॅलॅक्सी मेडिकल सिस्टीम्स, पुणे हे समक्ष चर्चा /वाटाघाटी करीता उपस्थित होते.त्यांच्याशी झालेल्या चर्चा /वाटाघाटीनंतर त्यांनी एकूण रकमेवर सूट दिलेली आहे त्याचा तपशील खालीलप्रमाणे-

| Sr. | Item Description | Qty | Rate Per | Total Amt. in Rs. | Rate after Negotiation | Total Amt in Rs. |
|---|---|---|---|---|---|---|
| 01 | New ST- Win Deluxe Console (With Latest PC & Printer, UPS) | 01 | 2,00,000.00 | 2,00,000.00 | **- 24,000.00 (12% Discount)** | **1,76,000.00** |
| 02 | -Buyback cost of your old Dedica console with printer | 01 | 30,000.00 | 30,000.00 | **30,000.00** | **30,000.00** |
| | Net cost of New Deluxe Console (Warranty 12 Months) **(Incl. of all taxes) in Rs.** | | | **1,70,000.0 0** | 1,46,000.00 | **1,46,000.00** |
| | P.O. on the Name of M/s. Nasan Medical Electronics Pvt. Ltd., Pune. | | | New Treadmill will be supplied after 1 Month (Approx. Cost Rs.1, 00,000/-) as Donation by M/s Galaxy Medical Systems, Pune. | | |

**यावर चर्चा होउन, मे. नासन मेडिकल्स, पुणे यांचेकडुन जुना Console PC कंपनीस एकूण रू.३०,०००/- इतक्या रकमेत परत करुन (Buy Back) नवीन Console PC खरेदी करणेसाठी वरील तक्यात नमूद केल्याप्रमाणे येणाऱ्या एकुण रु. १,४६,०००/- चे खर्चास व मे. नासन मेडिकल इलेक्ट्रॉनिक्स,**

**पुणे यांना पुरवठा आदेश देण्यास तसेच मे.गॅलेक्सी मेडिकल सिस्टीम्स्, पुणे यांचेकडून एक नवीन ट्रेडमील देणगी म्हणून स्विकारणेत यावी असे ठरले.** (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**(०५) निर्णय क्र. ३१६-**

यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयाकरीता सन २०१२-१३ या वर्षाकरीता लागणारे औषधे व सर्जिकल साहित्य खरेदीकामी येणाऱ्या अंदाजे रु.४०,५५,५६,३८८/- चे खर्चास व औषधे खरेदीची उपरोक्तप्रमाणे अ.नं. १ ते ८ कार्यपध्दती अवलंबविण्यात यावी असे ठरले.

**याऐवजी खालीलप्रमाणे वाचण्यात यावे.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयाकरीता सन २०१२-१३ या वर्षाकरीता लागणारे औषधे व सर्जिकल साहित्य खरेदीकामी येणाऱ्या अंदाजे रु.४०,५५,५६,३८८/- चे खर्चास मान्यता देण्यात आली.**

**श्री साईबाबा व श्री साईनाथ या दोन्ही रुग्णालयाकरीता सन २०१२-१३ या वर्षाकरीता लागणारी औषधे व सर्जिकल साहित्य खरेदीकामी, मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाने जनहित याचिका क्र.१८/२०११ मधील दिवाणी अर्ज नं.४०५१/२०१२ मध्ये दिनांक २६.०४.२०१२ रोजी केलेल्या हूकुमानुसार वर्तमानपत्रात जाहिरात देऊन टेंडर्स मागविण्यात यावेत व खरेदी करावयाची औषधे व सर्जिकल साहित्य खरेदीकामी, प्राप्त होणाऱ्या टेंडर्सनुसार टेंडरधारकांसी चर्चा/वाटाघाटी करण्यात याव्यात व अंतिम निर्णय घेणेपूर्वी, मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची परवानगी घेऊन खरेदी करण्यात यावी असे ठरले.** (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**(०६) निर्णय क्र.३१७**

यावर सविस्तर चर्चा होऊन,उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली. सदरचे काम बांधकाम व विद्युत विभागाअंतर्गत विहित पद्धतीने दरपत्रके मागवून पूर्ण करुन घेण्यात यावे. याकामी येणारे अंदाजे पूर्णांकित रुपये ८७,००,०००/- मात्र पर्यंतचे खर्चास मान्यता देण्यात आली.

**याऐवजी खालीलप्रमाणे वाचण्यात यावे.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन,उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली. सदरचे काम बांधकाम व विद्युत विभागाअंतर्गत विहित पद्धतीने दरपत्रके मागवून पूर्ण करुन घेण्यात यावे. याकामी येणारे अंदाजे पूर्णांकित रुपये ८७,०००/- मात्र खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही-बांधकाम विभाग प्रमुख/विद्युत विभाग प्रमुख)

---

**(०७) निर्णय क्र. ३३४-**

यावर सविस्तर चर्चा होऊन,सध्या गावरान तूपाचे दर कमी झालेले आहेत,सबब मे.इंदापुर डेअरी ॲण्ड मिल्क प्रॉडक्टस, गोखळी यांना समक्ष चर्चा/वाटाघाटीसाठी बोलावून सुधारित दर देणेबाबत सांगण्यात यावे व त्यानुसार दिनांक ०१ एप्रिल,२०१२ ते दिनांक ३० सप्टेंबर, २०१२ अखेर ३५०० क्विंटल गावरान तुप मे.इंदापुर डेअरी ॲण्ड मिल्क प्रॉडक्टस, गोखळी यांचेकडून खरेदी करणेत यावे,असें ठरलें.

**याऐवजी खालीलप्रमाणे वाचण्यात यावे.**

**संस्थानसाठी आवश्यक असणारे गावरान तूप खरेदी करणेबाबत मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाने जनहित याचिका क्र.१८/२०११ मधील दिवाणी अर्ज नं.४०५१/२०१२ मध्ये दिनांक ०५.०५.२०१२ रोजी केलेल्या हूकुमानुसार जुन,२०१२ ते सप्टेबर,२०१२ या ०४ महिने कालावधीकरिता आवश्यक असणारे गावरान तूप खरेदीकामी ०२ स्थानिक व ०२ आघाडीचे राष्ट्रीय वर्तमानपत्रात जाहिरात देऊन टेंडर्स मागविण्यात यावेत व विहित पद्धतीने गावरान तूप खरेदी करण्यात यावे.** (कार्यवाही-अधिक्षक,खरेदी विभाग)

---

**(०८) निर्णय क्र. ३३५-**

आजचे सभेत महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळ मर्यादित, अकोला यांचे प्रतिनिधी श्री.शिन्दे,जिल्हा व्यवस्थापक महाबीज हे उपस्थित होते. त्यांचेशी सभेने चर्चा केली असता त्यांनी सदरहू गहू प्रती क्विंटल रुपये १३३०/- मात्र या दराने चाळणी करुन, संस्थानने पुरविलेल्या ५० किलो भरतीचे बारदानमध्ये भरुन, गाडी लोड करुन देणेत येईल असें सांगितले.

यावर सविस्तर चर्चा होऊन, महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळ मर्यादित, अकोला यांचेकडून १० हजार क्विंटल गहु चाळणी करुन ५० किलो भरतीचे बारदानामध्ये भरुन प्रती क्विंटल रुपये १३३०/- या दराने खरेदी करण्यात यावा. तसेच गव्हाची वाहतुक संस्थानमार्फत करण्यात यावी. तसेच,उर्वरित ३००० क्विंटल गहू जाहिर लिलावाने राहाता व कोपरगाव येथील कृषी उत्पन्न बाजार समिती येथून खरेदी करावा, असें ठरलें.

**याऐवजी खालीलप्रमाणे वाचण्यात यावे.**

**संस्थानचे प्रसादालय विभागासाठी गहू खरेदी करणेबाबत मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाने जनहित याचिका क्र.१८/२०११ मधील दिवाणी अर्ज नं.४०५१/२०१२ मध्ये दिनांक ०५.०५.२०१२ रोजी केलेल्या हूकुमानुसार जुन,२०१२ ते सप्टेबर,२०१२ या ०४ महिने कालावधीकरिता आवश्यक असणारा गहू खरेदीकामी ०२ स्थानिक व ०२ आघाडीचे राष्ट्रीय वर्तमानपत्रात जाहिरात देऊन टेंडर्स मागविण्यात यावेत व विहित पद्धतीने आवश्यक असणारा गहू खरेदी करण्यात यावा.** (कार्यवाही-अधिक्षक,खरेदी विभाग)

---

**(०९) निर्णय क्र. ३३७-**

यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.

**याऐवजी खालीलप्रमाणे वाचण्यात यावे.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, दिवसेंदिवस प्रसादभोजन,प्रसाद लाडू व अन्न पाकिटांसाठी साईभक्तांच्या संख्येत होणारी वाढ, गॅसदरात वेळोवेळी होणारी दरवाढ तसेच विशेषत: माहे एप्रिल-२०१२ मध्ये झालेल्या गॅसच्या दरवाढीमुळे प्रस्तावामध्ये नमुद केलेप्रमाणे दोन टँकर गॅससाठी रु.२० लाख कमी पडतील याकरिता इंण्डेन आईल कार्पोरेशन यांचेकडून गॅस खरेदीसाठी आगाऊ रु.२० लाख ऐवजी रु.२५ लाख मात्र रक्कम जमा करणेत यावी, असे ठरले.** (कार्यवाही-अधिक्षक, श्री साई प्रसादालय)

यानंतर सदरहू इतिवृत्त वाचून कायम करण्यात आले.

---

**विषय नं.०३ दिनांक २८.०४.२०१२ रोजी शिर्डी येथे झालेल्या व्यवस्थापन समिती सभेचे इतिवृत्त.**

**निर्णय क्र.४०५ दिनांक २८.०४.२०१२ रोजी शिर्डी येथे झालेल्या व्यवस्थापन समिती सभेचे इतिवृत्ताच्या प्रती सर्व सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या, त्याची नोंद घेत असतांना खालीलप्रमाणे दुरुस्त्या करण्यात आल्या.**

**०१) निर्णय क्र.३८१-**

यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईनाथ कारभारी सोळसे व श्रीमती रंजना राजेंद्र गोंदकर वर्ग-०४ कर्मचारी यांचे बाबत अधिक्षक, प्रसादालय विभाग यांचे अभिप्राय विचारात घेऊन, त्यांना दिनांक २२.०३.२०१२ पासून वेतन बॅंड रु.४४४०-७४४० + ग्रेडवेतन रु.१३००/- देऊन त्यांची सेवा पुढे चालू ठेवण्यात यावी व भविष्यात पदोन्नती तसेच इतर कारणामुळे रिक्त होणा-या वर्ग-०४ चे पदावर सामावून घेण्यात यावे,असें ठरलें.

**याऐवजी खालीलप्रमाणे वाचण्यात यावे.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईनाथ कारभारी सोळसे व श्रीमती रंजना राजेंद्र गोंदकर वर्ग-०४ कर्मचारी यांचे बाबत अधिक्षक, प्रसादालय विभाग यांचे अभिप्राय विचारात घेऊन, श्री साईनाथ कारभारी सोळसे यांना दिनांक २२.०३.२०१२ पासून व श्रीमती रंजना राजेंद्र गोंदकर यांना दिनांक २०.०३.२०१२ पासून वेतन बॅंड रु.४४४०-७४४० + ग्रेडवेतन रु.१३००/- देऊन त्यांची सेवा पुढे चालू ठेवण्यात यावी व भविष्यात पदोन्नती तसेच इतर कारणामुळे रिक्त होणा-या वर्ग-०४ चे पदावर सामावून घेण्यात यावे,असें ठरलें.** (कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना)

यानंतर सदरहू इतिवृत्त वाचून कायम करण्यात आले.

---

**विषय नं.०४ दिनांक ०९.०५.२०१२ रोजी शिर्डी येथे झालेल्या व्यवस्थापन समिती सभेचे इतिवृत्त.**

**निर्णय क्र.४०६ दिनांक ०९.०५.२०१२ रोजी शिर्डी येथे झालेल्या व्यवस्थापन समिती सभेचे इतिवृत्ताच्या प्रती सर्व सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या, त्याची नोंद घेण्यात आली.**

---

**विषय नं.०५ दिनांक २८.०५.२०१२ रोजी शिर्डी येथे झालेल्या व्यवस्थापन समिती सभेचे इतिवृत्त.**

**निर्णय क्र.४०७ दिनांक २८.०५.२०१२ रोजी शिर्डी येथे झालेल्या व्यवस्थापन समिती सभेचे इतिवृत्ताच्या प्रती सर्व सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या, त्याची नोंद घेण्यात आली.**

---

**विषय नं.०६ दिनांक ३०.०५.२०१२ रोजी शिर्डी येथे झालेल्या व्यवस्थापन समिती सभेचे इतिवृत्त.**

**निर्णय क्र.४०८ दिनांक ३०.०५.२०१२ रोजी शिर्डी येथे झालेल्या व्यवस्थापन समिती सभेचे इतिवृत्ताच्या प्रती सर्व सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या, त्याची नोंद घेण्यात आली.**

---

**विषय नं.०७ एल.आय.सी.ग्रुप ग्रॅज्युईटी योजना- उपाध्यक्ष नेमणूकीबाबत.**

**प्रस्ताव-** मा. व्यवस्थापन मंडळ निर्णय क्र. ४१८/२२. २३/०९/२००१ अन्वये संस्थान कर्मचाऱ्यांसाठी एल. आय. सी. कडील ग्रुप ग्रॅच्युटी योजना दि. ०१/१०/२००१ पासून लागु करण्यात आलेली आहे.

या योजनेसाठी श्री साईबाबा संस्थान एम्प्लॉईज ग्रुप ग्रॅच्युटी अॅश्युरन्स स्कीम या स्वतंत्र निधीची स्थापना करण्यात येऊन या नावाने सेंट्रल बँक ऑफ इंडिया, शाखा शिर्डी येथे स्वतंत्र खाते उघडण्यात आले आहे. या योजनेसाठी अध्यक्ष, उपाध्यक्ष व सेक्रेटरी म्हणुन अनुक्रमे मा.कार्यकारी अधिकारी, प्रशासकीय अधिकारी व लेखाधिकारी यांची विश्वस्त म्हणून नेमणूक करण्यात आलेली आहे. नेमणुक करण्यात आलेल्या वरील तीन विश्वस्तांपैकी कुठल्याही दोन विश्वस्तांच्या स्वाक्षरीने त्या खात्यावरील व्यवहार चालु आहेत. या निधीच्या व्यवस्थापनासाठी सध्या मा. कार्यकारी अधिकारी श्री. मोरे साहेब, प्रशासकीय अधिकारी श्री. आर.एस.साबळे व लेखाधिकारी श्री. ए.एम. काळे हे विश्वस्त म्हणून काम पाहत आहेत.

यापैकी श्री. आर एस.साबळे, प्रशासकीय अधिकारी हे दिनांक ३०/०४/२०१२ रोजी संस्थान सेवेतुन सेवानिवृत्त होत आहेत. त्यामुळे त्यांचे ऐवजी न्यासाचे विश्वस्त व उपाध्यक्ष म्हणुन एका प्रशासकीय अधिकारी यांची नेमणूक करणे आवश्यक आहे तरी याबाबत मा. व्यवस्थापन समितीचे सभेत निर्णय होणे कामी सादर.

**निर्णय क्र.४०९** **यावर सविस्तर चर्चा होऊन, एल.आय.सी.ग्रुप ग्रॅज्युईटी योजनेच्या न्यासाचे विश्वस्त व उपाध्यक्ष म्हणुन श्री. बी.डी.साबळे, प्रशासकीय अधिकारी यांची नेमणूक करणेत यावी, असे ठरले.**

(कार्यवाही- मुख्य लेखाधिकारी)

---

**विषय नं.०८** **साईनिवास अतिथीगृह येथील पहिल्या मजल्यावरील मिटींग हॉल मधील व दुसऱ्या मजल्यावरील जनरल टॉयलेट बाथरुमचे नूतनीकरण करणेबाबत.**

**प्रस्ताव-** संस्थानचे साईनिवास अतिथीगृह येथे भक्तांचे निवासाकरीता व्ही.आय.पी. सुट असून पहिल्या मजल्यावर मिटींग हॉल आहे. मिटींग हॉलकरीता दोन टॉयलेट बाथरुम असून दुसऱ्या मजल्यावर जनरल टॉयलेट बाथरुम आहे. सततच्या वापरामुळे सदर टॉयलेटचे टाईल्स, बेसिन, संडास भांडे, इत्यादी खराब झालेले असल्याने मा. कार्यकारी अधिकारी सो., यांनी दि.१८/०४/२०१२ रोजी सदर बाथरुमची दुरुस्ती करणेबाबत सूचना केली असल्याचे अधिक्षक, साईप्रसाद निवासस्थान विभाग यांनी दि.१८/०४/२०१२ रोजीचे पत्रान्वये कळविले आहे.

यापुर्वी जनसंपर्क कार्यालयाजवळील ट्रांझीट सुट नं. १ ते ४ चे नूतनीकरण करणेत आलेले आहे. त्याच पध्दतीने सदर टॉयलेटचे नूतनीकरण करता येईल. याकरीता सध्या असलेल्या फ्लोरींग व डॅडोच्या टाईल्स काढून आधुनिक स्वरुपाच्या टाईल्स बसविणे, प्लंबींग व सॅनिटरी फिटींग करणे इ. कामे करणे आवश्यक आहे. याकरीता आवश्यक टाईल्स, सॅनिटरी फिटींग खरेदी करणे, मजुरी दराने टाईल्स बसविणे इ. कामाकरीता अंदाजे रु.२,४२,३९०/- मात्र खर्च अपेक्षीत आहे. प्लंबींगचे काम पाणीपुरवठा विभागामार्फत करुन घेता येईल.

तरी याकामी आवश्यक टाईल्स, सॅनिटरी फिटींग खरेदी करणे व मजुरी दराने टाईल्स बसविणेकरीता येणारे अंदाजे रु.२,४२,३९०/- मात्रचे खर्चास व सदरचे मटेरीअल खरेदी करणे व मजुरीदराने टाईल्स बसविणेकरीता विहीत पध्दतीने कोटेशन मागविणेसाठी मा.त्रीसदस्य समितीचे प्रशासकीय मान्यतेस्तव सविनय सादर.

**निर्णय क्र.४१०** **यावर सविस्तर चर्चा होऊन, साईनिवास अतिथीगृह येथील पहिल्या मजल्यावरील मिटींग हॉल मधील व दुसऱ्या मजल्यावरील जनरल टॉयलेट बाथरुमचे नूतनीकरण करणेकामी आवश्यक टाईल्स, सॅनिटरी फिटींग खरेदी करणे व मजुरी दराने टाईल्स बसविणेकरीता येणारे अंदाजे रु.२,४२,३९०/- मात्रचे खर्चास व सदरचे मटेरीअल खरेदी करणे व मजुरीदराने टाईल्स बसविणेकरीता विहीत पध्दतीने कोटेशन मागविणेस मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

---

**विषय न.०९** **श्री गुरुपौर्णिमा उत्सव-२०१२ तसेच पावसाळयाचे कालावधीत साईभक्तांचे सुविधेकरिता मंडप व इतर अनुषंगिक व्यवस्था करणेबाबत.**

**प्रस्ताव-** संस्थानतर्फे प्रतिवर्षा प्रमाणे याही वर्षी सोमवार दि.०२/०७/२०१२ ते बुधवार दि.०४/०७/२०१२ अखेर श्रीं चा गुरुपौर्णिमा उत्सव साजरा करण्यात येणार आहे. उत्सवाचे कालावधीत साईभक्तांची मोठया प्रमाणावर गर्दी होण्याची शक्यता असल्यामुळे मंदिर परिसर, नविन भक्तनिवासस्थान परिसर, धर्मशाळा परिसर, प्रसादालय परिसर व साईनगर परिसर या सर्व ठिकाणी ताडपत्रीचे छत असलेले कापडी मंडप, पार्टीशन, बॅरेकेटींग, स्टेज, कनात इ. अनुषंगीक व्यवस्था करणे आवश्यक आहे. तसेच पावसाळ्याचे दिवसांत साईभक्तांचे सोयीसाठी मंदिर परिसरामध्ये मंडप व्यवस्था करणे आवश्यक आहे. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

**अ)** श्री गुरुपौर्णिमा उत्सव २०१२ करीता करावयाची मंडप व्यवस्थाः (कालावधी दि.०२/०७/२०१२ ते दि.०४/०७/२०१२ अखेर ३ दिवस)

**अ(१) ताडपत्रीचे छत असलेले कापडी मंडप (लाकडी बल्ल्या व बांबुचे स्ट्रक्चर असलेले)**

| अ.नं. | मंडपाचे ठिकाण व तपशिल | साईज | क्षेत्रफळ (चौ.फुट) |
|---|---|---|---|
| १ | श्रीं चे चावडी समोरील जागेत १८' उंची | ६०'x३०' | १८००.०० |
| २ | नंदादिपचे पाठीमागे पालखीसाठी मंडप | ९०'x३०' | २७००.०० |

| | | | |
|---|---|---|---|
| ३ | शनिमंदिर, महादेव मंदिर व गणेश मंदिरा समोर | ६०'x४०' | २४००.०० |
| ४ | व्दारकामाई ते रथ पालखी गेट पर्यन्त. | १४०'x१७' | २३८०.०० |
| ५ | मंगल कार्यालय येथे कनात व बिछायतीसह | ९०'x१५' | १३५०.०० |
| ६ | साईउद्यान समोर कनात व बिछायतीसह | ३०'x७५' | २२५०.०० |
| ७ | समाधि मंदिर गेट नं. ३ ते मारुती मंदिरापर्यन्त १५' उंचीचा | १००'x२०' | २०००.०० |
| ८ | श्री मारुती मंदिर ते शामसुंदर हॉलपर्यन्त दक्षिणोत्तर १५' उंचीचा | ५०'x२५'<br>१५'x२०' | १२५०.००<br>३००.०० |
| ९ | नविन भक्तनिवासस्थान दक्षिण बाजूस पार्किंगमध्ये कनात व बिछायतीसह | ४५'x३९०' | १७५५०.०० |
| १० | साईबाबा भक्तनिवास पश्चिम बाजूस बुफे करीता | ३०'x९०' | २७००.०० |
| ११ | गेट नं. ४ करीता बाहेरील बाजूस | ४०'x२०' | ८००.०० |
| १२ | जुने प्रसादालय परिसरात तिकीट काउंटर समोर जेवण रेलींग पूर्व/ पश्चिम बाजू कनात व बिछायतीसह | १३५'x४०' | ५४००.०० |
| १३ | जुने प्रसादालय परिसरात सुलभ प्रसाधनगृहासमोर कनात व बिछायतीसह | ८०'x४०' | ३२००.०० |
| १४ | पालखीसाठी निर्मळ पिंप्री येथे व शिंगवे नाईक येथे कनात व बिछायतीसह | ४०'x६०'<br>४०'x६०' | २४००.००<br>२४००.०० |
| १५ | पालखीसाठी गुहा येथे कनात व बिछायतीसह | ४०'x६०' | २४००.०० |
| १६ | पोलीस स्टेशन जवळ पालखी स्वागता करीता कनात व बिछायतीसह | २०'x१५' | ३००.०० |
| १७ | पालखी स्वागता करीता नगरपंचायत समोर कनात व बिछायतीसह | १५'x१०' | १५०.०० |
| १८ | पालखी स्वागता करीता स्वागत कक्ष येथे माहिती केंद्रासाठी कनात व बिछायतीसह | २०'x१५' | ३००.०० |
| १९ | जुने प्रसादालय पार्किंगमध्ये | १००'x१५०' | १५०००.०० |
| २० | साईनगर मैदानावर माहिती केंद्र करीता | १५'x१५' | २२५.०० |
| २१ | साईनाथ माध्यमिक विद्यालय येथे बाथरुम व्यवस्थेसाठी मंडप व्यवस्था. | १५'x१५'<br>२५'x१०' | २२५.००<br>२५०.०० |
| २२ | जुने प्रसादालय प्रवेशव्दार (नगर-मनमाड फुटपाथ व आतिल बाजूने मोबाईल लॉकर पर्यन्त) | ३०'x१०'<br>४५'x२५' | ३००.००<br>११२५.०० |
| | **मंडपाचे एकूण क्षेत्रफळ** | | **७११५५.००** |
| | **अंदाजे रु.३ प्रति चौ.फुट प्रमाणे येणारा एकूण अंदाजे अपेक्षित खर्च- अ(१)** | | **रु.६,४०,३९५/-** |

## अ(२) ताडपत्रीचे छत असलेले कापडी मंडप (एम एस पाईप व कैच्यांचे स्ट्रक्चर असलेले)

| अ.नं. | मंडपाचे ठिकाण व तपशिल | साईज | क्षेत्रफळ (चौ.फुट) |
|---|---|---|---|
| १ | समाधी मंदिर उत्तर बाजूस, चावडी गेट ते नगरव्दार गेटपर्यन्त १८' उंची | २८४'x१९'.५" | ५५१५.०० |
| २ | साईनगर मैदानावर कनात व बिछायतीसह | १५०'x७५'<br>६०'x९०' | ११२५०.००<br>५४००.०० |
| ३ | गेट नं. ३ समोरील मोकळ्या जागेत (१६ आर जागेत) | २१०'x८०' | १६८००.०० |
| | **मंडपाचे एकूण क्षेत्रफळ** | | **३८९६५.००** |
| | **अंदाजे रु.९ प्रति चौ.फुट प्रमाणे येणारा एकूण अंदाजे अपेक्षित खर्च- अ(२)** | | **रु.१०,५२,०५५/-** |

## अ(३) बाथरुमसाठी पत्र्याचे पार्टीशन व्यवस्था दि.०२/०७/२०१२ ते दि.०४/०७/२०१२ अखेर- ३ दिवस

| अ.नं. | कामाचे ठिकाण व तपशिल | परिमाण / एकक | अंदाजे दर प्रति रनिंग फुट प्रति दिवस | रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|
| १ | साईनगर मैदानावर बाथरुम व्यवस्थेसाठी १०' उंचीचे जी. आय. पत्र्याचे व कापडी पार्टीशन | ३००.००<br>रनिंग फुट | ५.०० | **रु.४,५००/-** |
| | | | **एकुण- अ(३)** | **रु.४,५००/-** |

## अ(४) मंदिर परिसरामध्ये सभाकुंड येथे स्टेज व्यवस्था दि.०२/०७/२०१२ ते दि.०४/०७/२०१२ अखेर - ३ दिवस

| अ.नं. | कामाचे ठिकाण व तपशिल | परिमाण / एकक | अंदाजे दर रु. प्रति चौ. फुट प्रति दिवस | रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|
| ०१ | मंदिर परिसरामध्ये कलाकारांचे कार्यक्रमासाठी स्टेज व्यवस्था:<br>३' उंचीचे स्टेज, स्टेजवर सिटेंटीक मॅटीन, स्टेजचे मागील बाजूस पडदा, स्टेजचे वरिल बाजूने ताडपत्री वापरुन स्टेज तयार करणे व आतिल बाजूने सुशोभित कापड बांधणे, व स्टेजचे तिन बाजूने साईडपट्टी लावणे, पुढील बाजूने पडदा लावणे व कलाकारांचे मेकअपसाठी १६'x१०' साईजच्या ०२ नग ग्रीन रुम तयार करणे. तसेच सदरहू कार्यक्रमासाठी फायबर खुर्च्या ३०० नग इ. सह स्टेज व्यवस्था. | १६' x२४' = ३८४ चौ. फुट | १२.०० | **रु.१३,८२४/-** |
| | | | **एकुण- अ(४)** | **रु.१३,८२४/-** |

**अ(५) बॅरेकेटींग व कनात व्यवस्था कालावधी दि.०२/०७/२०१२ ते दि.०४/०७/२०१२अखेर - ३ दिवस**

| अ.नं. | कामाचे ठिकाण व तपशिल | परिमाण रनिंग फुट | अंदाजे दर रु. प्र.रनिंग फुट प्रति दिवस | रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|
| ०१ | दर्शन रांगेकरीता व श्री साई प्रसादालय येथे साईभक्तांचे रेलिंग व्यवस्थेकामी व इतर आवश्यक ठिकाणी लोखंडी पाईप व गोल्टेचे ४' उंचीचे बॅरेकेटींग | ९०० | ६.०० | १६२००.०० |
| ०२ | दर्शन रांगेसाठी कनात | ७०० | ४.५० | ९४५०.०० |
| | | | **एकुण- अ(५)** | **रु.२५,६५०/-** |

| | |
|---|---|
| **श्री गुरुपौर्णिमा उत्सव २०१२ साठी करावयाच्या मंडप व्यवस्थेकरीता अपेक्षित एकुण अंदाजे खर्च (अ)** | **रु.१७,३६,४२४/-** |

**ब) पावसाळयाकरीता ताडपत्रीचे छत असलेले कापडी मंडप व्यवस्था दि.०१/०७/२०१२ ते दि.३०/०९/२०१२ अखेर एकुण ९२ दिवस**

**ब(१) ताडपत्रीचे छत असलेले कापडी मंडप (लाकडी बल्ल्या व बांबुचे स्ट्रक्चर असलेले)**

| अ.नं. | मंडपाचे ठिकाण व तपशिल | मंडपाची साईज | चौरसफुट |
|---|---|---|---|
| १ | समाधी मंदिर बाहेर पडण्याचा मार्ग ते श्री गुरुस्थान मंदिराचे समोरील बेसमेंटचे पश्चिम बाजू पर्यन्त (पूर्व-पश्चिम) | १५०'x१०' | १५००.०० |
| २ | बेसमेंटचे पश्चिम बाजूस (दक्षिण -उत्तर) | ५०'x१०' | ५००.०० |
| ३ | श्री गुरुस्थान मंदिर (निंबवृक्षाच्या ) पश्चिम बाजुस, दक्षिणोत्तर असा | ४५'x३०' | १३५०.०० |
| ४ | व्हि. आय. पी. दर्शन रांगेसाठी (शनि गेट) | ११५'x१०' | ११५०.०० |
| ५ | गेट नं. ०३ समोर | १५'x१०'<br>४०'x१०' | १५०.००<br>४००.०० |
| ६ | जुना पिंपळवाडी रस्त्यावरील दर्शन रांगेच्या पूर्व व पश्चिम प्रवेशव्दारा समोर | ३०'x४५'<br>२०'x१५' | १३५०.००<br>३००.०० |
| ७ | लेंडीबागेत दत्त मंदिर जवळ नंदादिप समोर | १०५'x३५' | ३६७५.०० |
| ८ | साईप्रसाद नं.०२ / चौकशी कार्यालयासमोरील मोकळया जागेत | १५'x६०'<br>१५'x२०' | ९००.००<br>३००.०० |
| ९ | लाडू विक्री काउंटर समोर | ५०'x१५' | ७५०.०० |
| | | **मंडपाचे एकूण क्षेत्रफळ** | **१२३२५.००** |
| | | **अंदाजे रु.०.३० प्रति चौ.फुट प्रमाणे येणारा एकूण अंदाजे अपेक्षित खर्च- ब(१)** | **रु.३,४०,१७०/-** |

**ब(२) ताडपत्रीचे छत असलेले कापडी मंडप (एम एस पाईप व कैच्यांचे स्ट्रक्चर असलेले)**

| अ.नं. | मंडपाचे ठिकाण व तपशिल | मंडपाची साईज | चौरसफुट |
|---|---|---|---|
| १ | समाधी मंदिरा समोरील सभाकुंडामध्ये (कनात व बिछायतीसह) | ६०'x६५' | ३९००.०० |
| | | **मंडपाचे एकूण क्षेत्रफळ** | **३९००.००** |
| | | **अंदाजे रु.०.३० प्रति चौ.फुट प्रमाणे येणारा एकूण अंदाजे अपेक्षित खर्च- ब(२)** | **रु.१,०७,६४०/-** |
| | | **सन २०१२ पावसाळ्याचे कालावधीत करावयाच्या मंडप व्यवस्थेकरीता अपेक्षित एकुण अंदाजे खर्च (ब)** | **रु.४,४७,८१०/-** |
| | | **श्री गुरुपौर्णिमा उत्सव २०१२ व पावसाळ्यासाठी करावयाच्या मंडप व्यवस्थेकरीता अपेक्षित एकुण अंदाजे खर्च (अ + ब)** | **रु.२१,८४,२३४/-** |

शिर्डी साई ट्रस्ट, चेन्नई यांचेमार्फत देणगीदाखल बांधकाम करण्यात येत असलेल्या "साई आश्रम" इमारती श्री गुरुपौर्णिमा उत्सवापुर्वी साईभक्तांचे निवासाकरीता उपलब्ध झाल्यास वरीलपैकी जुना प्रसादालय परिसर, साईनगर व भक्तनिवासस्थान (५०० खोल्या) येथिल निवासव्यवस्थेसाठी असलेल्या मंडपांची आवश्यकता भासणार नाही. वरीलप्रमाणे स्टेज, मंडप व इतर अनुषंगिक व्यवस्था करणेसाठी अशा प्रकारचे मंडप व्यवस्थेचे काम करणारे खालील ठेकेदार यांचेकडून कोटेशन्स मागविता येतिल.

| अ. नं. | मंडप फर्मचे नांव | अ. नं. | मंडप फर्मचे नांव |
|---|---|---|---|
| ०१ | कैलास मंडप ॲण्ड लाईट डेकोरेटर्स, अहमदनगर | ०८ | कल्यानी टेन्ट हाऊस, मु. पो. नांदुर, |
| ०२ | झुराळे टेन्ट मंडप डेकोरेटर्स, निमगांव खैरी | ०९ | साईकृपा टेन्ट हाऊस, बेलापूरगांव |
| ०३ | श्री. भिमराज भागुजी गाडेकर, (सावता मंडप) राहाता | १० | लोकप्रिय डेकोरेटर्स, संक्रापूर |
| ०४ | रोशनी मंडप ॲण्ड लाईट डेकोरेशन, संक्रापूर | ११ | बालाजी मंडप डेकोरेटर्स, मनमाड |
| ०५ | बाबला टेन्ट हाऊस, श्रीरामपूर | १२ | जगदंबा मंडप डेकोरेटर्स, वावी |
| ०६ | शुभम टेन्ट हाऊस, निमगांव खैरी | १३ | शेटे डेकोरेटर्स, शहापूर |
| ०७ | शर्मा मंडप डेकोरेटर्स, वैजापूर | १४ | जीस आयडीयाज प्रा. लि., मुंबई |

वरीलप्रमाणे अ नुसार श्रीगुरुपौर्णीमा उत्सव-२०१२ निमीत्ताने मंडप व इतर अनुषंगीक व्यवस्था करणेकामी अंदाजे रु.१७,३६,४२४/- मात्र तसेच ब नूसार पावसाळी मंडप व्यवस्था करणेकामी अंदाजे रु.४,४७,८१०/- मात्र खर्च अपक्षित आहे. तरी अशाप्रकारे येणारे अंदाजे एकुण रु.२१,८४,२३४/- मात्रचे

अपेक्षित खर्चास व वर नमूद केलेप्रमाणे संस्थानकडे अशा प्रकारचे मंडप व्यवस्थेचे काम करणारे/ यापुर्वीचे कामांसाठी कोटेशन सादर केलेले मंडप ठेकेदार यांचेकडून कोटेशन्स मागविणेकरिता मा.त्रीसदस्य समितीची प्रशासकीय मान्यता मिळणेस विनंती.

निर्णय क्र.४११ **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमूद केल्यानुसार श्रीगुरुपौर्णीमा उत्सव-२०१२ साठी मंडप व इतर अनुषंगीक व्यवस्था करणेकामी अंदाजे रु.१७,३६,४२४/- मात्र, तसेच पावसाळी मंडप व्यवस्था करणेकामी अंदाजे रु.४,४७,८१०/- मात्र, अशा एकूण अंदाजे रु.२१,८४,२३४/- मात्रचे अपेक्षित खर्चास मान्यता देण्यात आली. याकामी संस्थानकडे अशा प्रकारचे मंडप व्यवस्थेचे काम करणारे/ यापुर्वीचे मंडप बांधणी कामांसाठी कोटेशन सादर केलेले ठेकेदार यांचेकडून कोटेशन्स मागविण्यात येऊन सदरचे कोटेशन्स मा.कार्यकारी अधिकारी यांचे समक्ष उघडून कोटेशन्स सादरकर्त्यांशी चर्चा /वाटाघाटी करुन अंतिम निर्णय घ्यावा असे ठरले.** (कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

---

**विषय नं.१०** **रुग्णालयाचे लॉण्ड्री विभागाकरीता मंजूर दराने केमिकल्स खरेदी बाबत.**

**प्रस्ताव-** लॉन्ड्री विभागाकरीता मा.व्यवस्थापन सभा दि.१२/०६/२०११ चे सभेतील निर्णय क्रमांक ४७४ अन्वये रु.१,२६,३५०/-इतक्या रकमेचा पुरवठा आदेश इकडील पत्र क्र. १६३२ दिनांक ०२/०७/२०११ अन्वये व रु.८६,४००/- व पत्र क्र.२२८५ दिनांक १७/०८/२०११ अन्वये रु.३९९५०/- इतक्या रकमेचा पुरवठा आदेश देऊन केमीकल्सची खरेदी निन्मत्तम दराने मे.मिनीटेक हायजीन मेकर्स, मुंबई यांचेकडुन केली असुन त्यांनी दिनांक १८/०७/२०११ रोजी पुरवठा केलेला आहे. सदर केमीकल्स आतापर्यंत वापरात आहे.

लॉन्ड्री विभाग कार्यान्वित झाल्यापासुन होणाऱ्या खपाचा व शिल्लक केमीकल्सचा विचार करता लॉन्ड्री विभागास केमीकल्सचा तुटवडा भासु नये म्हणुन लॉन्ड्री विभागाने आता पुन्हा पुढील एक वर्ष पुरु शकेल इतक्या साठयाची केमीकल्सची मागणी केली होती परंतु रुग्णालयाचे लॉन्ड्री विभागाचे व भक्तनिवास लॉन्ड्री विभागाचे केमीकल्स एकत्रीत खरेदी करावे असा निर्णय झालेला आहे त्यामुळे दि.२५/०१/२०१२ चे टिपणी अन्वये सदरचा प्रस्ताव भक्तनिवासस्थान या विभागाकडे दिनांक ०८/०२/२०१२ रोजी एकत्रीत प्रस्ताव ठेवणे कामी दिलेला आहे व त्याबाबत येत्या मा.व्यवस्थापन समितीचे सभेत निर्णय होईल. परंतु सदर केमीकल्स उपलब्ध होईपर्यंत २-३ महिन्याकरीता दिनांक ०७/३/२०१२ अन्वये खालीलप्रमाणे केमीकल्सची मागणी केली आहे.

| अ.नं. | केमीकल्सचे नाव | २-३ महिने करीता मागणी | अंदाजे किंमत रु./पै. | एकुण किंमत रु./पै. |
|---|---|---|---|---|
| १ | नॉक्स १०० | २०० किलो | ८८.०० | १७६००.०० |
| २ | नॉक्स बुस्ट | २०० किलो | ४६.०० | ९२००.०० |
| ३ | नॉक्स सोर | २०० किलो | ४८.०० | ९६००.०० |
| ४ | B S R | १०० लिटर | २१५.०० | २१५००.०० |
| ५ | ब्लिचींग लिक्वीड | २०० लिटर | २२.०० | ४४००.०० |
| | | | **एकुण किंमत** | **६२,३००.००** |

यापुर्वी मा.व्यवस्थापन सभा दि.१२/०६/२०११ नि.क्र४७४ अन्वये वरील केमीकल्स मे.मिनीटेक हायजीन मेकर्स,मुंबई यांचेकडुन खरेदी केलेली आहे. त्याच मंजुर दराने त्यांचेकडुन खरेदी करता येतील. मंजुर दराने केमीकल्स खरेदीकामी अंदाजे रु.६२,३००/- खर्च येईल. सदर खर्चाची तरतुद श्री साईनाथ रुग्णालयाच्या अंदाजे खर्चाच्या तरतुदीतून करता येईल.

तरी सदरचे केमीकल्स त्यांचेकडुन मागील मंजुर दराने खरेदी करण्याचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे ठेवण्यास मान्यता असावी हि विनंती.

निर्णय क्र.४१२ **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे रुग्णालयासाठी आवश्यक असणारे केमिकल्स मे.मिनीटेक हायजीन मेकर्स,मुंबई यांचेकडुन मागील मंजूर दराने खरेदी करणेस व याकामी येणारे अंदाजे रु.६२,३००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**विषय नं.११** **श्री साईबाबा रुग्णालयातील सी.व्ही.टी.एस ओ.टी. नं. ०२ करीता कार्डीयाक इन्स्ट्रुमेंट खरेदी बाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा रुग्णालयातील सी.व्ही.टी.एस. ऑपरेशन थिएटर नं. २ विभागाने दि.०१/०२/२०१२ रोजीचे मागणी पत्रकान्वये इन्स्ट्रुमेंटची मागणी केलेली होती. कारण सध्या त्यांच्याकडे इन्स्ट्रुमेंटचा एक सेट आहे परंतु शस्त्रक्रियांचे प्रमाण वाढल्यामुळे तो सेट सारखा Sterile करुन वापरावा लागतो त्यामुळे पुढील शस्त्रक्रियेसाठी विलंब होतो त्यामुळे पहिली शस्त्रक्रिया संपल्यानंतर तीच इन्स्ट्रुमेंट पुन्हा Sterile होईपर्यंत बराच वेळ जातो पर्यायाने दोन शस्त्रक्रियेमध्ये बराच वेळ जातो. त्यामुळे त्यांनी Scanlan / Geister / Vasculan या नामांकित कंपनीपैकी कुठल्याही एका कंपनीचा आणखी एक अतिरिक्त सेंटची मागणी केलेली आहे.

सदरचे इन्स्ट्रुमेंट खरेदीकामी अंदाजे दरासाठी तीन अधिकृत विक्रते / पुरवठाधारकाकडून इकडील पत्र क्र.६२९३ दि.०१/०३/२०१२ अन्वये फॅक्सव्दारे दरपत्रक मागविण्यात आले होते. त्यानूसार M/s.

Zenith Surgical Co., Mumbai यांनी त्यांचे पत्र क्र.ZS/५९०/२०११-१२ दि.१०/०३/२०१२ चे पत्रान्वये Geister कंपनीचे इन्स्ट्रुमेंटकरीता दर पत्रक पाठविलेले आहे. त्यांचे दरानुसार सदरचे खरेदीकामी अंदाजे रु.९,३८,९१०/- इतका खर्च अपेक्षित आहे,

त्याचा तपशिल खालीलप्रमाणे-

| Sr. No. | Name of Item | Qty. | App. Rate per in Rs. | App.Total Amt. in Rs. |
|---|---|---|---|---|
| 1 | Forward Spring Pot Long | 02 | 51450.00 | 102900.00 |
| | Forward Spring Pot Small | 01 | 45675.00 | 45675.00 |
| 2 | Backward Spring Pot Long | 03 | 60165.00 | 180495.00 |
| | Backward Spring Pot Small | 01 | 56490.00 | 56490.00 |
| 3 | Ring Tip 6/0 | 01 | 27825.00 | 27825.00 |
| 4 | Ring Tip 7/0 Long | 02 | 30975.00 | 61950.00 |
| | Ring Tip 7/0 Small (Regular) | 02 | 29400.00 | 58800.00 |
| 5 | Needle Holder 6/0 Long & Heavy | 04 | 42735.00 | 170940.00 |
| 6 | Needle Holder 7/0 Long | 03 | 42735.00 | 128205.00 |
| | Needle Holder 7/0 Small (Regular) | 01 | 41160.00 | 41160.00 |
| 7 | Gerald Forceps Long | 03 | 9240.00 | 27720.00 |
| | Gerald Forceps Small | 01 | 11550.00 | 11550.00 |
| 8 | Vascular Scissor (Silver End or Black End) | 02 | 12600.00 | 25200.00 |
| | | | **Total Amt. in Rs.** | **938910.00** |

तेंव्हा वरीलप्रमाणे इन्स्ट्रुमेंट विहित पध्दतीने निविदा मागवून खरेदीस व याकामी येणाऱ्या अंदाजे रक्कम रु.९,३८,९१०/- चे खर्चास मान्यता असावी.

**निर्णय क्र.४१३** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे साईबाबा रुग्णालयातील सी.व्ही.टी.एस ओ.टी. नं. ०२ करीता आवश्यक असणारे कार्डीयाक इन्स्ट्रूमेंट विहित पध्दतीने निविदा मागवून खरेदीस व याकामी येणाऱ्या अंदाजे रक्कम रु.९,३८,९१०/- चे खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**विषय नं.१२** **श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये विविध मशिनचे वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट करणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये एकुण ५२ कंपन्यांचे एकुण रु. ३२,७५,५३,६३८.७६/- इतक्या रकमेचे अंदाजे ५८० मेडीकल इक्विपमेंटस खरेदी करणेत आले असुन नियमीत वापरात आहेत. सदर मशीन्स पैकी १९५ मशिन्सचे संबंधीत २७ कंपन्यांकडे दुरुस्ती व देखभालीकरीता मा. व्य. समितीच्या विविध निर्णयांन्वये दरवर्षी कंपन्यांकडे वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट करण्यात येत आहे. सदर वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट कालावधीत कंपन्या नियमीत तसेच आवश्यकतेनुसार तातडीच्या भेटी देउन दुरूस्ती व देखभाल करीत असुन सर्व मशिन सध्या व्यवस्थित काम देत आहेत. सध्या काही मशीन्सचे वॉरंटी कालावधी संपलेले असुन माहे मार्च २०१२ अखेर काही मशीन्सचे कॉन्ट्रॅक्ट कालावधी संपत आहेत.

वार्षिक सर्व्हिस कॉट्रॅक्टबाबत मा. व्य. समितीच्या दि. २०/०५/२००७ च्या सभेतील विषय क्र. ३३ निर्णय क्र. ३८६ अन्वये खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात आला आहे.

"दरवर्षी संस्थानमधील महत्वाच्या मशीनरींचे (यामध्ये उदा. प्रसादालयातील विविध मशीनरी, विद्युत विभागातील विविध मशीनरी, श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रुग्णालयातील विविध मशीनरी, एअरकंडीशनर्स, वायुवीजन यंत्रणा, वगैरे) वार्षीक मेन्टेनन्स सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट अथवा रिस्क प्रोटेक्शन टाईप सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट हे त्या त्या मशीनरीच्या उत्पादक कंपनीला अथवा संबंधीत मशीनरीच्या उत्पादक कंपनीने निर्देशीत केलेल्या त्यांच्या अधिकृत सर्व्हिस डीलरला देण्यात यावे असे ठरले."

तक्त्यामध्ये दिलेल्या अ. क्र. १ ते ५४ अन्वये एकुण ३१ कंपन्यांच्या २७४ नग मशीन्सचे सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट करणेची आवश्यकता आहे. सदरकामी दरवर्षीप्रमाणे तसेच मा. व्य. समितीच्या दि. १२/०६/२०११ चे सभेतील निर्णय क्र.३७३ प्रमाणे कंपन्यांच्या प्रतिनीधींना वैद्यकिय प्रशासक, व वैद्यकिय संचालक यांचे समक्ष बोलावुन दिलेल्या दरांबाबत चर्चा / वाटाघाटी करुन वार्षीक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्टचे दर निश्चीत करता येतील असे नम्र मत आहे.

तरी श्री साईबाबा हॉस्पिटलमधील वरीलप्रमाणे एकुण २७४ नग मशीन्सचे वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट करणेकरीता संबंधीत कंपन्यांनी दिलेल्या दरांबाबत कंपनी प्रतिनीधींशी प्रत्यक्ष वाटाघाटी करुन दर निश्चीत करणेस व त्यानुसार येणाऱ्या अंदाजे एकुण रू. १,०२,७९,०४३/- रकमेच्या खर्चास मान्यता असावी.

**निर्णय क्र.४१४** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे श्री साईबाबा हॉस्पिटलमधील एकुण २७४ नग मशीन्सचे वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट करणेकरीता संबंधीत कंपन्यांनी दिलेल्या दरांबाबत कंपनी प्रतिनीधींशी वैद्यकिय संचालक, वैद्यकिय उप-संचालक व वैद्यकिय अधिक्षक यांचे समक्ष प्रत्यक्ष**

**वाटाघाटी करुन दर निश्चीत करणेस व त्यानुसार येणाऱ्या अंदाजे एकुण रक्कम रुपये १,०२,७९,०४३/- रकमेच्या खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**विषय नं.१३** **श्री साईनाथ रुग्णालयातील विविध मशिनचे वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट करणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईनाथ रुग्णालयामध्ये अंदाजे ३५ कंपन्यांचे अंदाजे रु. ९४७२५४९७.१२/- इतक्या रकमेचे अंदाजे ३१८ मेडीकल इक्विपमेंटस खरेदी करणेत आले असुन नियमीत वापरात आहेत. सदर मशीन्स पैकी ५४ मशिन्सचे २४ संबंधीत कंपन्यांकडे दुरुस्ती व देखभालीकरीता मा. व्य. समितीच्या विविध निर्णयांन्वये दरवर्षी कंपन्यांकडे वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट करण्यात येत आहे. सदर वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट कालावधीत कंपन्या नियमीत तसेच आवश्यकतेनुसार तातडीच्या भेटी देउन दुरूस्ती व देखभाल करीत असुन सर्व मशिन सध्या व्यवस्थित काम देत आहेत. सध्या काही मशीन्सचे वॉरंटी कालावधी संपलेले असुन माहे मार्च २०१२ अखेर काही मशीन्सचे कॉन्ट्रॅक्ट कालावधी संपत आहेत.

वार्षीक सर्व्हिस कॉट्रॅक्टबाबत मा. व्य. समितीच्या दि. २०/०५/२००७ च्या सभेतील विषय क्र. ३३ निर्णय क्र. ३८६ अन्वये खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात आला आहे.

"दरवर्षी संस्थानमधील महत्वाच्या मशीनरींचे (यामध्ये उदा. प्रसादालयातील विविध मशीनरी, विद्युत विभागातील विविध मशीनरी, श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रुग्णालयातील विविध मशीनरी, एअरकंडीशनर्स, वायुवीजन यंत्रणा, वगैरे) वार्षीक मेन्टेनन्स सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट अथवा रिस्क प्रोटेक्शन टाईप सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट हे त्या त्या मशीनरीच्या उत्पादक कंपनीला अथवा संबंधीत मशीनरीच्या उत्पादक कंपनीने निर्देशीत केलेल्या त्यांच्या अधिकृत सर्व्हिस डीलरला देण्यात यावे असे ठरले."

तक्त्यामध्ये दिलेल्या अ. क्र. १ ते २७ अन्वये एकुण २६ कंपन्यांच्या ६२ नग मशीन्सचे सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट करणेची आवश्यकता आहे. सदरकामी दरवर्षीप्रमाणे तसेच मा. व्य. समितीच्या दि. १२/०६/२०११ चे सभेतील निर्णय क्र.३७४ प्रमाणे कंपन्यांच्या प्रतिनीधींना वैद्यकिय प्रशासक, वैद्यकिय उप-संचालक व वैद्यकिय संचालक यांचे समक्ष बोलावुन दिलेल्या दरांबाबत चर्चा / वाटाघाटी करुन वार्षीक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्टचे दर निश्चीत करता येतील असे नम्र मत आहे.

तरी श्री साईनाथ रुग्णालयातील वरीलप्रमाणे एकुण ६२ नग मशीन्सचे वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट करणेकरीता संबंधीत कंपन्यांनी दिलेल्या दरांबाबत कंपनी प्रतिनीधींशी वैद्यकिय अधिक्षक, वैद्यकिय उप-संचालक व वैद्यकिय संचालक यांचे समक्ष प्रत्यक्ष वाटाघाटी करुन दर निश्चीत करणेस व त्यानुसार येणाऱ्या अंदाजे एकुण रू. १४,१३,७१९/- इतक्या रकमेच्या खर्चास मान्यता असावी ही विनंती.

**निर्णय क्र.४१५** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे श्री साईनाथ रुग्णालयातील एकुण ६२ नग मशीन्सचे वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट करणेकरीता संबंधीत कंपन्यांनी दिलेल्या दरांबाबत कंपनी प्रतिनीधींशी वैद्यकिय संचालक, वैद्यकिय उप-संचालक व वैद्यकिय अधिक्षक यांचे समक्ष प्रत्यक्ष वाटाघाटी करुन दर निश्चीत करणेस व त्यानुसार येणाऱ्या अंदाजे एकुण रू. १४,१३,७१९/- इतक्या रकमेच्या खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**विषय नं.१४** **११ महिने कालावधीसाठी तात्पूरती नेमणूक करण्यात आलेल्या परिचारिका/परिचारक यांचे नेमणूक संपुष्ठात येत असलेबाबत व त्यांचा दि.०८.०५.२०१२ रोजीचा संस्थान सेवेत कायम करणेबाबतचा अर्ज.**

**प्रस्ताव-** ११ महिने तात्पुरते कालावधीसाठी नेमणूक करण्यात आलेल्या १९ परिचारक/परिचारका यांनी दि.०८.०५.२०१२ रोजी अर्ज करुन त्यामध्ये आम्ही सर्व अर्जदार आपल्या साईबाबा संस्थानच्या श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयामध्ये दैनिक वर्तमानपत्र जून २००८ रोजीच्या जाहिरातीनुसार दि.१७.०८.२००८ रोजी परीचारीका या पदासाठीच्या झालेल्या निवड प्रक्रियेमधून निवड होऊन परिचारीका या पदावर चार वर्षापासून एकत्रित मानधनावर (फिक्स पे) काम करत आहोत. दि.१७.०८.२००८ रोजी ७५ जागांसाठी परिचारीका या पदासाठी निवड प्रक्रिया झाली. संस्थानने पात्र उमेदवारांपैकी काही उमेदवारांची आरक्षणानुसार १२ महिने या कालावधीसाठी तर काही उमेदवारांची ११ महिने या कालावधीसाठी नेमणुक केली होती. जे उमेदवार आरक्षणानुसार पात्र झाले अशा उमेदवारांची १२ महिने या कालावधीसाठी नेमणुक केली होती अशा उमेदवारांचा १२ महिन्याचा कालावधी संपुष्टात आल्यावर संस्थानने सेवेत कायम करुन घेतलेले आहे.परंतु ज्या उमेदवारांची ११ महिने या कालावधीसाठी नेमणुक केली अशा सर्व उमेदवारांचा कालावधी संपुष्टात आल्यानंतर मा. व्यवस्थापन समिती सभा दि.०९.०८.२००९ सभा दि.०७.०८.२०१० सभा दि.१३.०२.२०११ व सभा दि.२८.०८.२०११ अन्वये रोजीच्या निर्णयानुसार आपण पुन्हा पुन्हा मुदतवाढ दिलेली आहे.त्यानंतर दै. लोकमत दि.२५.१०.२०१० जाहिरातीनुसार दि.२७,२८ व २९ जुन २०११ रोजी परिचारीका या पदासाठी आरक्षणानुसार ६७ जागांसाठी मुलाखती घेण्यात आल्या. आम्ही एकत्रित मानधनावरील सर्व उमेदवारांनी पुन्हा मुलाखत व लेखी, प्रात्यक्षिक परीक्षा दिलेली आहे. आम्हाला परिचारीका या पदावर काम करण्याचा भरपूर अनुभव आहे. आम्ही

संस्थानचे श्री साईबाबा व साईनाथ रुग्णालयामध्ये परिचारीका या पदावर चार वर्षापासून प्रामाणिकपणे एकत्रित मानधनावर (फिक्स पे) काम करत आहोत.

तरी मे. साहेब यांना विनंती की, दै. वर्तमापनपत्र जून २००८ व दै. लोकमत दि.२५.१०.२०१० रोजीच्या जाहिरातीनुसार सेवा जेष्ठतेनुसार प्रथम आम्हा सर्वांना आपल्या संस्थानच्या श्री साईबाबा व साईनाथ रुग्णालयामध्ये स्थायी रिक्त परिचारीका या पदावर कायम करुन श्री साईबाबांची सेवा करण्याची संधी द्यावी अशी विनंती केलेली आहे.

संस्थानचे दोन्ही रुग्णालयाकरीता स्टाफनर्सची आवश्यकता असल्याने १०० बिंदु नामावलीप्रमाणे सन २००८ मधील जाहिरातीस अनुसरुन प्रवर्गातील पुरेसे उमेदवार न मिळाल्याने खालील स्टाफनर्सची ११ महिने कालावधीसाठी नेमणूक करणेत आलेल्या असून ११ महिन्याची नेमणूक संपुष्टात आलेनंतर त्यांना वेळोवेळी मुदतवाढी (११ महिन्यासाठी ) देण्यात आलेल्या आहेत.मा. व्यवस्थापन समितीचे दि.०७.०८.२०१० रोजीचे सभेत निर्णय क्र.६६१ नुसार १०० बिंदूनामावली प्रमाणे प्रवर्गातील व इतर वर्गवारीमधील दोन्ही हॉस्पीटलमधील परिचारीकांची रिक्त पदे भरण्यासाठी वर्तमानपत्रात जाहिरात देऊन अर्ज मागणी करणेत यावी, असे ठरले होते.त्यास अनुसरुन दोन्ही रुणालयासाठी बिंदु नामावलीनुसार जात प्रवर्गाप्रमाणे आवश्यक तेवढया एकूण ६७ परिचारीकांची पदे भरणेकरीता अर्ज मागविणेसाठी दि.२५.१२.२०१० रोजीचे दैनिक लोकमत या वर्तमानपत्रात जाहिरात प्रसिध्द करण्यात आली होती.

सदर जाहिरातीस अनुसरुन आलेल्या अर्जदार उमेदवारांच्या लेखी परिक्षा घेऊन त्यातील उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांना प्रात्यक्षिक परिक्षेस व मुलाखतीस बोलविण्यात आले होते. मा. व्यवस्थापन समितीचे दि.२८.०८.२०११ रोजीचे सभेतील निर्णय क्र.६६६ नुसार श्री साईबाबा संस्थानचे आस्थापनेवरील सर्व पदांची बिंदु नामावली तयार करुन विभागीय आयुक्त्, नाशिक विभाग, मागास प्रवर्ग कक्ष यांचेकडून बिंदु नामावली तपासून घेणेत यावी व तोपर्यंत परिचारक/ परिचारीका या स्थायी पदावर अनुशेषाने नेमण्याची प्रक्रीया स्थगित करण्यात यावी. तसेच प्रात्यक्षिक परिक्षा व मुलाखतीची गुणवत्ता यादीतील मेरीटनुसार १८ उमेदवारांची प्रतिमाह रु.११,०००/- वेतन देऊन कंत्राटी पध्दतीने परिचारक/परिचारीका या पदावर घेणेकरीता निवड करण्यात आली व आणखी उमेदवाराची आवश्यकता भासल्यास वैद्यकिय संचालक यांनी मुलाखतीस उपस्थित असलेल्या उमेदवारामधून योग्य उमेदवारांची कंत्राटी पध्दतीने कंत्राटदारामार्फत घेणेकरीता निवड करावी. तसेच ११ महिने कालावधीकरीता कार्यरत असलेल्या परिचारक/ परिचारीका यांचे पैकी ज्यांचे काम समाधानकारक नाही व ज्यांचे वय ४५ वर्षापेक्षा जास्त आहें अशा चार परिचारक/परिचारीका व्यतिरिक्त ज्यांचे काम समाधानकारक आहे अशा १९ परीचारक/परिचारीकाना प्रतिमाह रु. ११,०००/- वेतन देऊन पुढील मुदतवाढ देण्यात यावी असे ठरले. त्यानुसार खालीलप्रमाणे १९ परिचारीकांची ११ महिने नेमणूकीची मुदत मे २०१२ ते नोव्हेंबर २०१२ पर्यंतच्या कालावधीमध्ये संपुष्टात येत आहे. श्री साईबाबा संस्थानचे आस्थापनेवरील पदान्नतीचे व सरळ सेवा भरतीचे पदांची निश्चिती झालेली नसल्याने विभागीय आयुक्त्, नाशिक विभाग, मागास प्रवर्ग कक्ष यांचेकडून बिंदु नामावली तपासून घेणेचे काम अपुर्ण आहे.

| अ.नं. | नाव | हजर तारीख | कालावधी संपुष्टात येत असल्याची तारीख |
|---|---|---|---|
| ०१ | ०२ | ०३ | ०४ |
| १ | श्री विशाल निळकंठ कुलकर्णी | ०१/०७/२०११ | ३१/०५/२०१२ |
| २ | कु. रिटा मॅन्युएल मुन्तोडे | ०४/०७/२०११ | ०३/०६/२०१२ |
| ३ | कु. आशुमती संपत सदाफुले | ०४/०७/२०११ | ०३/०६/२०१२ |
| ४ | कु. मनिषा स्टिफन आवारे | ०३/०७/२०११ | ०२/०६/२०१२ |
| ५ | कु. कांचन विनायक शिंदे | ०७/०७/२०११ | ०६/०६/२०१२ |
| ६ | श्रीमती वैशाली भगवान महागडे | ०५/०७/२०११ | ०४/०६/२०१२ |
| ७ | श्रीमती सारीका फकीरा बनसोडे | २५/०७/२०११ | २४/०६/२०१२ |
| ८ | श्री. आशिष शरद सुर्यवंशी | ०९/०७/२०११ | ०८/०६/२०१२ |
| ९ | कु. आशा रमेश जगताप | २७/०७/२०११ | २६/०६/२०१२ |
| १० | कु. प्रतिमा रामचंद्र कोळगे | ०३/०८/२०११ | ०२/०७/२०१२ |
| ११ | श्री. राहुल प्रकाश ओहोळ | १३/०८/२०११ | १२/०७/२०१२ |
| १२ | कु. प्राजक्ता दिपक जाधव | ०६/१०/२०११ | ०५/०९/२०१२ |
| १३ | सौ. रुपाली राजेंद्र गवळी | ०७/१०/२०११ | ०६/०९/२०१२ |
| १४ | श्रीमती विजया उज्वल शेळके | १२/१०/२०११ | ११/०९/२०१२ |
| १५ | श्रीमती कावेरी सुदाम म्हस्के | १५/१०/२०११ | १४/०९/२०१२ |
| १६ | सौ. रुथ निलेश श्रीवास्तव | २५/१०/२०११ | २४/०९/२०१२ |
| १७ | कु. कविता योसेफ पंडीत | ०८/११/२०११ | ०७/१०/२०१२ |
| १८ | श्रीमती अलका भिमराव बिराजदार | १०/११/२०११ | ०९/१०/२०१२ |
| १९ | श्री रवि आगुस्तीन मुन्तोडे | ०९/१२/२०११ | ०८/११/२०१२ |

आता रकाना क्र.०४ मध्ये नमुद केलेप्रमाणे वरील परिचारक/परिचारीकाची मुदत मे - २०१२ ते नोव्हे-२०१२ या दरम्यान संपुष्टात येत आहे. त्यांचा वरील कालावधीचा कामकाजाबाबतचा गोपनिय अहवाल वैद्यकिय संचालक व वैद्यकिय अधिक्षक यांनी दिलेला असून त्यामध्ये त्यांचे काम समाधारकारक असून परिचारीकांची आवश्यकता असल्याने पुढी

आता रकाना क्र.०४ मध्ये नमुद केलेप्रमाणे वरील परिचारक/परिचारीकाची मुदत मे-२०१२ ते नोव्हे-२०१२ या दरम्यान संपुष्टात येत आहे. त्यांचा वरील कालावधीचा कामकाजाबाबतचा गोपनिय अहवाल वैद्यकिय संचालक व वैद्यकिय अधिक्षक यांनी दिलेला असून त्यामध्ये त्यांचे काम समाधारकारक असून परिचारीकांची आवश्यकता असल्याने पुढील ११ महिने कालावधीकरीता/नियमाप्रमाणे मुदतवाढ देण्यात यावी असे नमूद केले आहे.

तरी ११ महिने कालावधीसाठी तात्पुरती नेमणुक करण्यात आलेल्या परिचारीका/परिचारक यांचा संस्थान सेवेत कायम करणेबाबतचा अर्ज तसेच वैद्यकिय अधिक्षक व वैद्यकिय संचालक यांचे अहवालानुसार परिचारीक/परिचारकांना पुढील ११ महिने कालावधीकरीता नेमणुक देणेबाबत चर्चा होऊन निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.४१६** **यावर सविस्तर चर्चा होऊन, ११ महिने कालावधीसाठी तात्पुरती नेमणुक करण्यात आलेल्या परिचारीका/ परिचारक यांचेबाबत वैद्यकिय अधिक्षक व वैद्यकिय संचालक यांचे अहवालानुसार परिचारक/ परिचारीकां यांना उपरोक्त कॉलम नं.०४ मध्ये संबधितांचे नावापूढे दर्शविलेल्या तारखेपासून पूढे ११ महिने कालावधीकरीता, याआधी देण्यात आलेल्या नेमणूक आदेशातील अटी/ शर्तीनुसार तात्पुरती नेमणूक देण्यात यावी, असे ठरले.**

(कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**विषय नं.१५** **क्ष किरण निर्मिती करणाऱ्या मशिन्सचे Quality Assurance Test करणे बाबत**

**प्रस्ताव-** श्री साईनाथ व श्री साईबाबा हॉस्पिटलमधील विविध विभागांमध्ये क्ष-किरण निर्मीती करणारे मशीन्स रुग्णांच्या विविध प्रकारच्या तपासण्या तसेच शस्त्रक्रीया करताना वापरले जातात (उदा. कॅथलॅब मशीन, सि. टी. स्कॅन मशीन, पोर्टेबल एक्स-रे मशीन्स, ५०० एम. ए. एक्स-रे मशीन, सी-आर्म इ.). सदर मशीन्सची परमाणु उर्जा नियामक परिषदेच्या (A.E.R.B.) च्या नियमानुसार लायसेन्स नुतनीकरणापूर्वी Quality Assurance Test करणे अनिवार्य आहे. यावर्षाअखेर कॅथलॅब मशीनचे लायसेन्सची मुदत संपत आहे. त्यामुळे श्री साईनाथ रुग्णालयाचे आर. एस. ऑफीसर यांनी पत्र क्र. ५९७५, दि.०३/०२/२०१२ अन्वये या वर्षी सदर प्रकारची QA Test सर्व मशिनकरीता करुन घेणेबाबत कळविले आहे.

मे. सिमेन्स लि. मुंबई यांना पत्र क्र.६५८१/१२,दि.१३/०३/१२ अन्वये सर्व एक्स रे मशिन्सची QA Test करणेबाबत कळविणेत आले होते. कंपनीने 'AERB Certification साठी आवश्यक असणारी QA Test ही AERB अधिकृत कंपन्याकडून केली जाते व M/s. TBS India Telematic & Biomedical Services Pvt. Ltd. Bangalore यांचेकडून सदर काम करून घेणेस' कळविले आहे. त्यासाठी M/s. TBS यांनी पत्र क्र. TBS/BD/SSSH/२०१२/०३/०७६९, दि. २१/०३/२०१२ अन्वये १२ मशिन्स करीता सर्व करांसहीत एकुण रू १,४८,१८५/- (अक्षरी रु. एक लाख अठ्ठेचाळीस हजार एकशे पंच्याऐंशी मात्र) इतक्या रकमेचे कोटेशन पाठविले आहे. परंतु अशा प्रकारच्या QA Test करणाऱ्या विविध कंपन्याकडुन कोटेशन मागवुन QA Test निम्नतम दराने करुन घेता येईल असे नम्र मत आहे.

तरी क्ष-किरण निर्मीती करणारे मशीन्सचे QA Test करणेकामी विविध कंपन्याकडुन कोटेशन मागवुन निम्नतम दराने QA Test करणेस व त्यासाठी येणाऱ्या अंदाजे रु. १,४८,१८५/- चे खर्चास मान्यता असावी.

**निर्णय क्र.४१७** **यावर सविस्तर चर्चा होऊन, क्ष किरण निर्मिती करणाऱ्या मशिन्सचे Quality Assurance Test करणेकामी विविध कंपन्यांकडुन कोटेशन मागवुन निम्नतम दराने टेस्ट करुन घेण्यास व याकामी येणाऱ्या अंदाजे रु. १,४८,१८५/- चे खर्चास मान्यता असावी.** (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**विषय नं.१६** **श्री साईबाबा हॉस्पिटल कँटीनमध्ये ठेवण्यात येणारे खाद्यपदार्थ व पेय यांचे दर निश्चित करुन जाहिरातीव्दारे निविदा मागविणे बाबत**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा हॉस्पीटलमध्ये रुग्ण व त्यांचे नातेवाईक तसेच कर्मचारी यांना अल्पोपहार, जेवण, थंड पेय व इतर खादयपदार्थ पुरविणेकामी भाडेतत्वावर कॅन्टीन चालविण्यासाठी देण्यात आलेली आहे. दि.०६.०४.२०१२ रोजीचे मा.त्रिसदस्यीय समिती समोर श्री साईबाबा हॉस्पीटलचे सध्याचे कॅन्टीन चालक यांची कॅन्टीन चालविणेची मुदत दि.१७.०६.२०१२ अखेर संपुष्टात येत असल्याने पुढील एक वर्ष कालावधीसाठी कॅन्टीन भाडेतत्त्वावर चालविणेस देणेकामी वर्तमानपत्रात जाहिरात देऊन सिलबंद निविदा मागविणेबाबतचा विषय सादर करण्यात आला होता .

सदर विषयांस अनुसरुन श्री साईबाबा हॉस्पीटलमधील सध्याचे कॅन्टीन चालक यांची कॅन्टीन चालविणेची मुदत दि.१७.०६.२०१२ अखेर संपुष्टात येत असल्याने पुढील एक वर्ष कालावधीसाठी कॅन्टीन भाडेतत्त्वावर चालविणेस देणेकामी वर्तमान पत्रात जाहिरात देऊन सिलबंद निविदा मागविण्यात याव्यात. तसेच हॉस्पीटल कॅन्टीनमध्ये ठेवण्यात येणारे पदार्थ व पेय यांचे विक्रीचे दर निश्चित करण्यासाठी परिवहन महामंडळाच्या, ट्रस्टच्या अथवा खाजगी कॅन्टीनमध्ये असलेले विक्रीचे दर घेण्यात यावेत व त्याचा तपशिल पुढील सभेपुढे ठेवावा, अशी चर्चा झालेली आहे.

त्यास अनुसरुन प्रवरा मेडीकल ट्रस्ट, लोणी येथील कॅन्टीन स्वागत केटरिंग सर्व्हीसेस, एमटीडीसी, शिरडी यांचे नीम रेंस्टॉरंट, विभाग नियंत्रक, राज्य परिवहन महामंडळ, सर्जेपुरा, अ.नगर व हॉटेल साई कृष्णा, शिरडी यांचेकडून कॅन्टीनमधील पदार्थाचे दरपत्रक मिळविण्यात आलेले आहेत. त्यापैकी विभाग नियंत्रक, राज्य परिवहन महामंडळ, सर्जेपुरा, अ.नगर, यांनी त्यांचेकडील जा.क्र.राप/ विनिअह/ वाणिज्य/४५२५,दि.०७.०५.२०१२ अन्वये एस टी महामंडळात बसस्थानकावरील उपहारगृहे, स्नॅक बार इ. वाणिज्य आस्थापनामधील खाद्यपदार्थ , पेय इ. दर निश्चित करण्याचे अधिकार सर्वस्वी परवानाधारकावर सोपविण्यात आलेले आहेत. महामंडळ खाद्यपदार्थांचे दर निश्चित करत नाही, असे कळविलेले आहे. आता उपलब्ध असलेल्या प्रवरा मेडीकल ट्रस्ट, लोणी येथील कॅन्टीन स्वागत केटरिंग सर्व्हीसेस, एमटीडीसी,शिरडी यांचे नीम रेंस्टॉरंट, हॉटेल साई कृष्णा, शिरडी या कॅन्टीन/हॉटेल धारकाकडील दरपत्रकाचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

**(अ) अल्पोपहार (नाष्टा) पदार्थ**

| अ. नं. | पदार्थाचे नाव | नग | प्रमाण (वजन) | सध्याचे दर | पीएमटी कॅन्टीन स्वागत केटरिंग सर्व्हीसेस, लोणी | एमटीडीसी हॉटेल नीम रेस्टॉरंट शिरडी | हॉटेल साईकृष्णा, शिरडी | निश्चित करावयाचे दर |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | बटाटे वडा रसा व दोन पाव | ०२ | प्रत्येकी १०० ग्रम | १२.०० | १२/- | ३०/- | २०/- | |
| २ | इडली सांबर, चटणी | ०२ | प्रत्येकी १५० ग्रम | १२.०० | १५/- | ३०/- | २५/- | |
| ३ | साधा डोसा | ०१ | १५०ग्रॅम | १५.०० | १५/- | ३५/- | ३०/- | |
| ४ | मसाला डोसा | ०१ | २५० ग्रॅम | २०.०० | २०/- | ४०/- | ४०/- | |
| ५ | उत्तपा | ०१ | २०० ग्रॅम | १२.०० | १५/- | ३५/- | ३०/- | |
| ६ | पोहे | ०१ प्लेट | १५० ग्रॅम | ८.०० | ८/- | २५/- | २५/- | |
| ७ | शिरा | ०१ प्लेट | १५० ग्रॅम | १२.०० | ----- | २५/- | ३०/- | |
| ८ | साबूदाना खिचडी | ०१ प्लेट | १२० ग्रॅम | १२.०० | ----- | ४०/- | ३०/- | |
| ९ | पुरी भाजी (पुरी ०४ नग) | ०१ प्लेट | २०० ग्रॅम | १५.०० | ----- | ४५/- | ४५/- | |
| १० | पंजाबी डिशेस (करी सह) | ०१ | ---- | ३५.०० | ----- | वेगवेगळ दर आहेत | वेगवेगळ दर आहेत | |
| ११ | आलु परोठा व पालक परोठा | ०१ नग | ---- | १५.०० | १८/- | ४०/- | ५०/- | |
| १२ | व्हेज बिर्याणी | ०१ प्लेट | --- | २५.०० | ४५/- | ९०/- | ----- | |
| १३ | दही वडा | ०२ नग | प्रत्येकी १०० ग्रॅम | १५.०० | ----- | ----- | ३५/- | |
| १४ | प्लेन राईस | ०१ प्लेट | ---- | १०.०० | ३५/- | ५०/- | ४०/- | |
| १५ | चिप्स, बिस्किट, चॉकलेट | ---- | स्टँडर्ड बॅन्ड | प्रिंटेड दराने | ----- | ----- | ----- | |
| १६ | आईस्क्रिम | ---- | | प्रिंटेड दराने | ----- | ----- | ----- | |
| १७ | गुलाबजामून | ०१ प्लेट | १५० ग्रॅम | ०७.०० | ----- | ----- | ३०/- | |
| १८ | पाव वडा | ०१ नग | १५० ग्रॅम | ०७.०० | ७/- | ----- | ----- | |
| १९ | फुल जेवण (निवासी डॉक्टरांसाठी) | ०१ प्लेट | ---- | ३५.०० (मासिक दोन | ----- | ----- | ----- | |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | वेळा १३००/- प्रतिमाह) | | | | |
| २० | दही भात | ०१ प्लेट | --- | १५.०० | ५०/- | ७०/- | ४५/- | |
| २१ | भजी (मिक्स) | ०१ प्लेट | --- | ०८.०० | ----- | ----- | ----- | |
| २२ | मेदु वडा | ०२ नग | प्रत्येकी १०० ग्रॅम | १५.०० | १५/- | ३०/- | ३५/- | |

**(ब) मर्यादित भोजनातील (राईस प्लेट) पदार्थ (दर रुपये १८/-)**

(मासिक तत्वावर दोन वेळेच्या भोजनाचा दर निवासी डॉक्टरांसाठी रु.१०००/- राहील.)

**सुधारीत दर रुपये --------**

| अ.नं. | पदार्थाचे नाव | नग | मागणीनुसार जादा | पीएमटी कॅन्टीन स्वागत केटरिंग सर्व्हीसेस, लोणी | एमटीडीसी हॉटेल नीम रेस्टॉरंट शिरडी | हॉटेल साईकृष्णा, शिरडी | निश्चित करावयाचे दर |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | चपाती अथवा पुरी | चपाती ०४ नग/ पुरी ०६ नग | प्रती नग ३ रुपये | ६/- | ---- | ६/- | |
| २ | साधा भात | एक वाटी | प्रती वाटी ५ रुपये | ----- | ----- | ----- | |
| ३ | सुकी भाजी | एक वाटी | प्रती वाटी ५ रुपये | ----- | ----- | ----- | |
| ४ | सांबर | एक वाटी | प्रती वाटी ५ रुपये | ----- | ----- | ----- | |
| ५ | रसा भाजी | एक वाटी | प्रती वाटी ५ रुपये | ----- | ----- | ----- | |
| ६ | दही | एक वाटी | प्रती वाटी ५ रुपये | ----- | ----- | ----- | |
| ७ | पापड | एक नग | प्रती नग ५ रुपये | ----- | १०/- | ७/- | |
| ८ | लोणचे | आवश्यकते नुसार | | ----- | ----- | ----- | |

**(क) पेये**

| अ.नं. | पेयाचे नाव | नग | प्रमाण (मिली) | सध्याचे दर | पीएमटी कॅन्टीन स्वागत केटरिंग सर्व्हीसेस, लोणी | एमटीडीसी हॉटेल नीम रेस्टॉरंट शिरडी | हॉटेल साईकृष्णा, शिरडी | निश्चित करावया चे दर |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | चहा | ०१ कप | १०० मिली | ४.०० | ४/- | १०/- | १२/- | |
| २ | कॉफी | ०१ कप | १०० मिली | ७.०० | ८/- | ---- | २०/- | |
| ३ | दुध | ०१ कप | १०० मिली | ७.०० | ७/- | २०/- | १५/- | |
| ४ | मिनरल वॉटर व थंड पेये | --- | --- | प्रिंटेड दराने | ---- | ---- | ---- | |
| ५ | सोडा | --- | --- | प्रिंटेड दराने | ---- | ---- | ---- | |
| ६ | चहा<br>कॉफी<br>दूध | ०१ कप<br>०१ कप<br>०१ कप | १०० मिली<br>१०० मिली<br>१०० मिली | ३.००<br>५.००<br>५.०० | | | | |
| **( अ.नं.०६ मधील सवलत फक्त संस्थानमधील कामावरील कर्मचाऱ्यांसाठीच लागु राहील.)** | | | | | | | | |

**(ड) इतर पेय व पदार्थ-**

| अ.नं. | पदार्थाचे नाव | प्रमाण (वजन) | सध्याचे दर | पीएमटी कॅन्टीन स्वागत केटरिंग सर्व्हीसेस, लोणी | एमटीडीसी हॉटेल नीम रेस्टॉरंट शिरडी | हॉटेल साईकृष्णा, शिरडी | निश्चित करावया चे दर |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | संत्री ज्यूस | ३०० मिली लिटर | २०.०० | ----- | ----- | ४०/- | |
| | मोसंबी ज्यूस | | | ----- | ----- | ४५/- | |
| | अननस ज्यूस | | | ----- | ----- | ३५/- | |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| २ | चॉकलेट मिल्क शेक | ३०० मिली लिटर | २५.०० | ----- | ----- | ४५/- | |
| | चिकू मिल्क शेक | | | ----- | ----- | ५०/- | |
| | कोल्ड कॉफी | | | ----- | ----- | ५०/- | |
| ३ | शहाळे | ०१ नग | १२.०० | ----- | ----- | ----- | |
| ४ | साधी पावभाजी | १५० ग्रॅम व ०२ पाव | २०.०० | ----- | ----- | ४५/- | |
| ५ | स्पेशल पावभाजी | १५० ग्रॅम व ०२ पाव | २५.०० | ----- | ----- | ७५/- | |
| ६ | जादा पाव | ०२ नग | ०४.०० | ----- | ----- | १०/- | |

उपरोक्त तक्त्यातील अ) मधील अ.नं. १९) फुल जेवण, अ.नं. २१ भजी(मिक्स) तसेच ड) मधील अ.नं. ३ शहाळे या पदार्थाचे दर प्रवरा मेडीकल ट्रस्ट, लोणी येथील कॅन्टीन स्वागत केटरिंग सर्व्हीसेस, एमटीडीसी, शिरडी यांचे नीम रेस्टॉरंट, हॉटेल साई कृष्णा, शिरडी या कॅन्टीन/ हॉटेलधारकाकडील दरपत्रकात उपलब्ध नसल्याने नमूद करण्यात आलेला नाही.

तरी उपरोक्त पदार्थांचे दर निश्चित करुन मिळावेत तसेच सध्याचे कॅन्टीनधारक यांची कॅन्टीन चालविणेची मुदत १७.०६.२०१२ अखेर संपुष्टात येत असून उपरोक्त पदार्थाचे दर निश्चित होऊन त्यानुसार जाहिरातीव्दारे निविदा मागवून नविन कॅन्टीन चालकांची नेमणुक होईपावेतो काही कालावधी लागणार असल्याने सध्याचे कॅन्टीनधारक यांना मुदतवाढ देणेबाबत निर्णय होणेस विनंती.

निर्णय क्र.४१८ **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा हॉस्पिटल कँटीनमध्ये ठेवण्यात येणारे खाद्यपदार्थ व पेय यांचे दर मा.कार्यकारी अधिकारी व वैद्यकिय संचालक यांनी निश्चित करुन, जाहिरातीव्दारे निविदा मागविणेत याव्यात. दरम्यानचे कालावधीत सध्याचे कँटीन ठेकेदार यांना दिनांक १८.०६.२०१२ पासून पूढे तीन महिने कालावधीसाठी अथवा नवीन कँटीन ठेकेदार नेमणूक करणेची कार्यवाही पूर्ण होईपर्यत या दोहोंपैकी जे अगोदर घडेल तो पर्यत पूर्वीचेच अटी शर्तीवर मुदतवाढ देण्यात यावी असे ठरले.**(कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**विषय नं.१७ डॉ.नितीन दिलीपराव आहेर यांची ज्यु.रेडीओलॉजिस्ट या पदावर देण्यात आलेल्या नेमणूकीस कार्योत्तर मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** संस्थानचे दोन्ही रुग्णालयांकरीता तज्ञ वैद्यकिय अधिकारी,आरएमओ व सीएमओ आदी पदे भरणेकामी दि.०८.०३.२०१२ रोजीचे इंडियन एक्सप्रेस व लोकसत्ता या वर्तमानपत्रामध्ये वाक इन इंटरव्हुची जाहिरात प्रसिध्द करुन दि.१८.०४.२०१२ रोजी श्री साईनिवास अतिथीगृह (मिटींग हॉल) येथे सकाळी ११.०० वाजता युरोसर्जन, पेड्रीयाट्रीशियन, मेडीकल ऑफिसर (आर्थो) ऑफथॉलमॉलॉजिस्ट, सि.इंन्टेंसिव्हीस्ट,ज्यु. ॲनेस्थेशियालॉजिस्ट, ज्यु. रेडीओलॉजिस्ट, सिएमओ, आरएमओ या पदाच्या मुलाखती घेण्यात आल्या.

त्यातील ज्यु रेडीओलॉजिस्ट या पदाची आवश्यकता असल्याने दोन पदांसाठी दि.१८.०४.२०१२ रोजी मुलाखती घेण्यात आल्या. सदर मुलाखती मधील ज्यु. रेडीओलॉजिस्ट या पदाचे मुलाखतीसाठी चार अर्जदार उमेदवारांना बोलविण्यात आले होते. त्यापैकी डॉ.दिनेश कुमार मोहनसिंग परदेशी व डॉ. संदिप सिताराम कडू हे दोन उमेदवार मुलाखतीस उपस्थित होते. डॉ संदिप कडू हे दोन महिने श्री साईबाबा हॉस्पीटलमध्ये मोफत सेवा देणेस तयार होते व त्यानंतर ते प्रायव्हेट प्रक्टिस सुरु करणार असल्याने या पदासाठी त्यांचा विचार करण्यात आलेला नाही. डॉ. दिनेश कुमार मोहनसिंग परदेशी यांना श्री साईबाबा हॉस्पीटलकडे प्रत्येकी मासिक रुपये ३२,०००/- एकत्रित वेतनावर नेमणुक देऊन सी टी, एम आर आय व सोनोग्राफीसाठी मंजूर इंन्सेटीव्ह देण्यात यावा, असे ठरले होते. त्यास अनुसरुन डॉ. दिनेश कुमार मोहनसिंग परदेशी यांना दि.०२.०५.२०१२ रोजी नेमणुकीचे पत्र पाठवित असलेबाबत फोनवरुन संपर्क केला असता त्यांनी घ्मी शक्यतो येणार नाही डअसे दुरध्वनीवरुन कळविले होते.

तसेच डॉ. नितीन आहेर यांचे दि. ०२.०५.२०१२ रोजीचे अर्जानुसार डॉ. आहेर सहा महिन्याकरीता ज्यु. रेडीओलॉजिस्ट म्हणून श्री साईबाबा हॉस्पीटलकडे काम करणेस तयार असल्याने वैद्यकीय संचालक यांनी डॉ नितीन आहेर यांची मुलाखत घेऊन त्यांचे अर्जावर सोनोग्राफी विभागात ज्यु रेडीओलॉजिस्टचे पद चार ते पाच महिन्यापासून रिक्त आहे त्याकरीता डॉ आहेर यांना सदर पदावर नेमणूकीसाठी शिफारस केलेली आहे. डॉ नितीन आहेर यांचे शिक्षण एम बी बी एस-२००७, डी एम आर ई-२०११ असे असुन ज्यु रेडीओलॉजिस्ट या पदासाठी ते पात्र आहेत.

दि.०८.०३.२०१२ रोजीचे जाहिरातीमध्ये ज्यु रेडीओलॉजिस्टचे दोन पदांची आवश्यकता असल्याचे जाहिरातीत नमुद करणेत आले होते. सदर जाहिरातीस अनुसरुन एकच उमेदवाराची निवड करणेत आली व दुसरे पद रिक्त असलेने वैद्यकिय संचालक यांनी शिफारस केलेले उमेदवार डॉ नितीन आहेर यांना जा.नं.एसएसएस/ एसएसबीएच/एचआर/ ७४५/ २०१२, दि.१०.०५.२०१२ चे आदेशान्वये रु. ३२,०००/- एकत्रीत वेतनावर ज्यु. रेडीओलॉजिस्ट या पदावर सहा महिन्याकरीता नेमणूक देण्यात आलेली आहे..

तरी, उपरोक्त देण्यात आलेल्या डॉ नितीन आहेर, ज्यु.रेडीओलॉजिस्ट यांचे नेमणूकीस कार्योत्तर मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.४१९** **यावर सविस्तर चर्चा होऊन,डॉ.नितीन दिलीपराव आहेर यांची ज्यु.रेडीओलॉजिस्ट या पदावर दरमहा रुपये ३२,०००/- एकत्रित मासिक वेतनावर सहा महिने कालावधीसाठी देण्यात आलेल्या नेमणूकीस कार्योत्तर मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**विषय नं.१८** **श्री साईप्रसादालय स्टीम बॉयलर व थर्मिक फ्ल्यूड हिटरचे वार्षिक सर्विस कॉन्ट्रॅक्ट देणे बाबत.**

**प्रस्ताव-** सन १९९९ पासून प्रसादालयात अन्न शिजविणेसाठी थरमॅक्स कंपनीच्या RXG-४ स्टीम बॉयलर वापरणेत येत आहे. माहे जानेवारी २००९ पासून नविन प्रसादालय सुरू करतांना थरमॅक्स कंपनीचा RXD ८५० स्टीम बॉयलर बसविणेत आलेला आहे. त्याशिवाय श्री साईप्रसादालयातील मोतीचूर लाडु प्रसाद बनविणेकामी थर्मिक फ्ल्युड हिटींग यंत्रणेसाठी थरमॅक्स कंपनीचा थर्मिक फ्ल्युड हिटर ऑगष्ट २००९ पासुन कार्यन्वित करणेत आलेला आहे.

सन १९९९ पासुन RXG-४ स्टीम बॉयलर करीता वार्षिक सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट थरमॅक्स कंपनीचे अधिकृत फ्रॅंचीसला देण्यात येत आहे. मागील वर्षापासून दोन स्टीम बॉयलर व थर्मिक फ्ल्युड हिटर चे वार्षिक कॉन्ट्रक्ट मे.मॅक्सीथर्म वर्क्स, औरंगाबाद यांना देण्यात आलेले आहे. सन २०११- १२ या वर्षाचे RXG-४, RXD ८५० या स्टीम बॉयलर व थर्मिक फ्ल्युड हिटरचे वार्षिक सर्व्हीस कॉन्ट्रक्ट हे ३१/०३/२०१२ रोजी संपणार आहे.

मॅक्सीथर्म वर्क्स, औरंगाबाद यांनी वार्षिक सर्व्हीसींगचे काम समाधानकारक व वेळेत पुर्ण करुन दिलेले आहे. त्याच प्रमाणे वेळोवेळी स्टीम बॉयलर दुरुस्तीबाबत संस्थानला तातडीने मदत केलेली आहे.

सन २०१२-२०१३ करीता दोन स्टीम बॉयलर व थर्मिक फ्ल्युड हिटर सुस्थितीत ठेऊन कार्यान्वित राहणेसाठी वार्षिक सर्व्हीसींग कॉन्ट्रॅक्ट देणे गरजेचे असल्यामुळे मॅक्सीथर्म वर्क्स औरंगाबाद यांना खर्चाचा अंदाज कळविणेसाठी सांगणेत आलेले होते. त्यानुसार मॅक्झीथर्म वर्क्स, औरंगाबाद यांनी सन २०१२-२०१३ या वर्षासाठी RXG-४, RXD ८५० व थर्मिक फ्ल्युड हिटरसाठी खालीलप्रमाणे वार्षिक सर्व्हीसींगचे दर कळविलेले आहे. सदर वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रक्ट मध्ये दोन महिण्यांनी एक याप्रमाणे प्रत्येक युनिट साठी सहा सर्व्हिसींग करुन देणार आहे.

| **अ.नं.** | **बॉयलरचे नाव** | **२०११-१२ मागील वर्षीचे दर** | **२०१२-१३ वार्षिक सर्व्हिसींग करीता दिलेले दर** |
|---|---|---|---|
| १. | RXG-4 | २२,५००/- + सर्व्हिस टॅक्स | २५,५००/- + सर्व्हिस टॅक्स |
| २. | RXD 850 | २२,५००/- + सर्व्हिस टॅक्स | २५,५००/- + सर्व्हिस टॅक्स |
| ३. | थर्मिक फ्ल्युड हिटर | २०,०००/- + सर्व्हिस टॅक्स | २५,५००/- + सर्व्हिस टॅक्स |
| | **एकुण** | **६५,०००/- + सर्व्हिस टॅक्स** | **७६,५००/- + सर्व्हिस टॅक्स** |

तरी थरमॅक्स कंपनीचे अधिकृत सर्व्हिस फ्रॅंचीस मे.मॅक्सीथर्म वर्क्स, औरंगाबाद यांना सन २०१२-२०१३ या वर्षाकरीता दोन स्टीम बॉयलर व थर्मिक फ्ल्युड हिटरचे सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट देणेस व त्याकामी सर्व्हीस फी रु७६,५००/- + सर्व्हीस टॅक्स (लागू असेल तो) चे खर्चास मान्यता असावी.

**निर्णय क्र.४२०** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईप्रसादालय स्टीम बॉयलर व थर्मिक फ्ल्यूड हिटरचे वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट थरमॅक्स कंपनीचे अधिकृत सर्व्हिस फ्रॅंचीस मे.मॅक्सीथर्म वर्क्स, औरंगाबाद यांना सन २०१२-२०१३ या वर्षाकरीता दोन स्टीम बॉयलर व थर्मिक फ्ल्युड हिटरचे सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट देणेस व त्याकामी सर्व्हीस फी रु ७६,५००/- + सर्व्हीस टॅक्स (लागू असेल तो) चे खर्चास प्रशासकीय मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-अधिक्षक, श्री साईप्रसादालय)

---

**विषय नं.१९** **आटा मळणी मशिन देणगी स्वरुपात स्विकारणे अथवा खरेदी करणे बाबत.**

**प्रस्ताव-** श्री साई प्रसादालयात प्रतीदिन सरासरी ३३,००० साईभक्तांचे प्रसादभोजन वेळेवर बनविणेसाठी किचनमध्ये अनेक स्वरुपाचे ऑटोमायझेशन केलेले आहे. आळा मळणी करणे, कणकेचे गोळे तयार करणे, चपाती बनविणे, भाजीपाला कापणे, कडधान्य निवडणे, कडधान्य/भाजीपाला स्वच्छ धुणे, कांदा लसूण कापणे, ओला मसाला/सुका मसाला दळणे, ताट धुणे, स्वयंचलित गिरणीव्दारे आटा दळणे, चाळून तयार करणे इत्यादी कामे देशी व परदेशी बनावटीचे मशिनव्दारे केली जातात. प्रस्तुत मशिनरींचे मेन्टेनंन्स प्रसादालय विभागामार्फत केले जाते. किचनमधील प्रोसेस इक्वीपमेंट नादुरुस्त होवून दैनंदिन प्रसादभोजन बनविणेचे कामात अडचण निर्माण होवू नये म्हणून महत्वाचे इक्वीपमेंटस् स्टॅण्डबाय ठेवण्यात आलेले आहेत.

चपाती/पुरीसाठी दर्‌रोज सरासरी ३० क्विंटल तर गर्दीचे प्रमाणात २५ ते ६० क्विंटल आटा मळणीचे काम करावे लागते. चपाती/पुरी आटा मळणी करणेकरीता चपाती विभागात २ मशिन्स प्रत्येकी ८० किलो क्षमतेचे व एक मशिन्स ४० किलो क्षमतेचे कार्यान्वीत आहेत. तसेच नाष्टापाकीट विभागात ४० कि. क्षमतेचे दोन मशिन्स कार्यरत आहेत. चपाती विभागात पुरीसाठी तसेच चपाती मशिन्सकरीता आटा मळणी करावी लागते. तीन पैकी जे.के मशिनस, मोरबी, गुजरात येथील दोन मशिन्स अधिक चांगल्याप्रकारे

आटा मळणी करतात. तसेच सदर मशिन्सला मेन्टेनंस कमी आहे. तीन मशिन्सचा वापर सतत असल्यामुळे ऑईल, ग्रीस, रबर, व्ही बेल्ट, बेअरींग्ज, वरचेवर बदलाव्या लागतात. मशिन मेन्टेनंसकरीता बंद ठेवल्यास भक्तांच्या वाढत्या गर्दीमुळे, उर्वरीत दोन मशिनव्दारे आटा मळणी करणे जिकरीचे ठरते.

८० किलो क्षमतेचे दोन्ही बाजूने गती असलेले जे.के. कंपनीचे आटामळणी मशिन थेट उत्पादकाकडून खरेदी अथवा देणगीदार मिळाल्यास मशिन देणगी घेता येईल. सदर ८० किलो क्षमतेच्या एका मशिनसाठी अंदाजे रु.३ लाखापर्यंत खर्च अपेक्षित आहे.

तरी ८० किलो क्षमतेचे जे.के.कंपनीचे आटा मळणी यंत्र नग-०१ विहीत पद्धतीने खरेदी करणेस व त्याकामी येणाऱ्या खर्चास किंवा देणगी घेणेकामी प्रशासकीय मान्यतेसाठी सादर.

**निर्णय क्र.४२१** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे ८० किलो क्षमतेचे जे.के.कंपनीचे आटा मळणी मशिन देणगी मिळाल्यास देणगी स्वरुपात स्विकारणेत यावी, देणगी न मिळाल्यास विहित पध्दतीने खरेदी करण्यात यावी, असे ठरले.** (कार्यवाही- अधिक्षक, श्री साई प्रसादालय)

---

**विषय नं.२०** **चपाती किचनमध्ये चपाती मशिन व चपाती भट्टी करीता एल.पी.गॅस पाईपलाईन बनविणे व सिलेंडर मेनीफोल्ड मध्ये पाण्याचे स्प्रींकलर पाईप लाईन बसविणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईप्रसादालयात साईभक्तांना वेळेवर प्रसाद भोजन देणेसाठी किचन मध्ये आवश्यक अटोमायझेशन करणेत आलेले आहे. श्री साई प्रसादालयामध्ये दर्‌रोज सरसरी ३३,००० साईभक्त प्रसादभोजनाचा लाभ घेतात. त्याचप्रमाणे दर्‌रोज सरासरी २५०० किलो आटयापासुन चपाती व पुरी बनविली जाते. चपातीसाठी स्वतंत्र किचन वापरात आहेत. आज मितीस चपाती मशिनद्वारे व मनुष्यबळाकरवी चपाती बनविण्यात येत आहे. सध्या पाच चपाती मशिन्स कार्यन्वित आहे. चपाती मशिनची वाढती संख्या व मनुष्यबळाकरवी चपाती / पुरी बनविण्याच्या भट्टया यांच्या साठी सध्या असलेले गॅस कनेक्शन कमी पडत आहे. सध्या पाच चपाती मशिन्स किचनमध्ये पुर्व बाजुस बसविलेले आहे. नविन मशिनकरीता व गर्दीचे वेळेस मनुष्यबळाकरवी चपाती/पुरी बनविणेकामी भट्टया वाढविणे आवश्यक असल्याने पश्चिम बाजुस असलेल्या रिकाम्या जागेत पाच गॅसचे नविन कनेक्शन करुन घेणे आवश्यक आहेत. त्यानुसार प्रसादालयातील एल. पी. गॅस प्लॅट व किचन मधील गॅस पाईप लाईनचे पुरवठादार व उभारणी करणारे मे. ग्लोब गॅस इक्युपमेंट इंडस्ट्रीज प्रा. लि. मुंबई यांचेकडुन प्राथमिक खर्चाचा अंदाज येणेकरीता दरपत्रक मागविणेत आलेले आहे. त्यानुसार खर्चाचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ.नं. | तपशिल | संख्या | रक्कम |
|---|---|---|---|
| 1 | 1” Tata C class pipe | 150 Rft. | 20250.00 |
| 2 | 1” Bend M.S. | 6 Nos. | 510.00 |
| 3 | 1/2” M.S. Coupling | 5 Nos. | 325.00 |
| 4 | 1/2” x 3/8” Needle control valve long Spindle | 5 Nos. | 1625.00 |
| 5 | 1” M Clamp | 10 Nos. | 850.00 |
| 6 | 1” Ball valve with flange with nut, Gasket 150# class | 1 No. | 5850.00 |
| 7 | 25” x 25” x5 mm thick | 40 Rft | 1800.00 |
| 8 | ½” Tata C Class Pipe | 20 Rft | 2300.00 |
| 9. | ½” Bend M.S. | 5 Nos | 375.00 |
| 10 | Surksha Burner Pigtail 60” long | 5 Nos. | 2000.00 |
| 11 | ½” M Clamps | 5 Nos | 350.00 |
| 12 | U Clamps 1” | 20 Nos | 1700.00 |
| 13 | Earth Jumper | 2 Nos. | 130.00 |
| 14 | Pressure Gauge with isolation valve 0 to 100 psi 4” Φ | 1 No. | 1250.00 |
| 15 | Labour charges (Installation, Welding, Fitting & Painting) | | 34000.00 |
| | Vat 12.5% on item no. 1 to 14 (Amount Rs.39315.00) | | 4914.00 |
| | Service Tax 10.3% on item no. 15 (Amount Rs. 34000) | | 3502.00 |
| | **Total** | | **81731.00** |

सदर नविन गॅस पाईप लाईन उभारणीचे काम त्या क्षेत्रातले तज्ञ व एक्सप्लोझीव्ह विभागाचे मान्यताप्राप्त एजन्सी यांचेकडुन विहित पद्धतीने दरपत्रक मागवून करता येईल. उपरोक्त प्रमाणे साहीत्य, मजुरी व टॅक्सेसमध्ये वाढ झालेली असल्याने सदर कामाचा अंदाजे रु. १,००,०००/- (अक्षरी रुपये एक लाख मात्र) खर्च अपेक्षित आहे.

त्याचप्रमाणे प्रसादालयात १०० नग एल.ओ. टी. सिलेंडर्सचे मेन फोल्ड बनविण्यात आलेले आहे. बल्क गॅस पुरवठयात अडचण निर्माण झाल्यास किंवा एल. पी. गॅस प्लॅट काही कारणास्तव बंद ठेवावा लागल्यास साईभक्तांना प्रसाद भोजन सेवा पुरविणेमध्ये अडथळा येऊ नये म्हणुन सिलेंडर मेन फोल्ड यंत्रणा कार्यरत असणे आवश्यक असल्याने देणगीदार मे. समृद्धी इंण्डेयन, राहाता यांचेकडुन सिलेंडर मेन फोल्ड यंत्रणा देणगी स्वरुपात बसविण्यात आलेली आहे. सदर सिलें्डर मेन फोल्ड मध्ये फायर सेफ्टीच्या

दृष्टीने पाण्याचे स्प्रिंकलर बसविणे आवश्यक आहे. त्यानुसार प्रसादालयातील एल. पी. गॅस प्लॅंट व किचन मधील गॅस पाईप लाईनचे पुरवठादार व उभारणी करणारे मे. ग्लोब गॅस इक्युपमेंट इंडस्ट्रीज प्रा. लि. मुंबई यांचेकडुन खर्चाचा प्राथमिक अंदाज येणेकरीता स्प्रिंकलर बसविणे कामाचे दरपत्रक मागविणेत आलेले आहे. त्यानुसार खर्चाचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ.नं. | तपशिल | संख्या | रक्कम |
|---|---|---|---|
| 1 | 2" Tata B Class Pipe | 30 Rft | 4950.00 |
| 2 | 2" Bend M.S. | 6 Nos | 840.00 |
| 3 | ½" M.S. Coupling | 90 Nos | 5850.00 |
| 4 | Sprinkler Nozzle K 25 | 90 Nos | 18900.00 |
| 5 | 1½" Tata B Class Pipe | 200 Rft | 23000.00 |
| 6 | 1½" Bend M.S. | 6 Nos | 690.00 |
| 7 | Butter fly valve 1½" with machining flange & nut, gasket. | 1No. | 3850.00 |
| 8 | 40" x 40" x 5mm thick | 200 kg | 13000.00 |
| 9 | U Clamp 2" | 10 Nos | 1250.00 |
| 10 | U Clamp 1½" | 25 Nos | 2750.00 |
| 11 | 1½" x 2" Reducer M.S. | 1 No | 155.00 |
| 12 | Earth Jumper | 4 Nos | 260.00 |
| 13 | Labour charges (Installation, Welding, Fitting & Painting) | 230 Rft | 46000.00 |
| | Vat 12.5% on item no. 1 to 12 (Amount Rs.75495/-) | | 9437.00 |
| | Service Tax 10.3% on item no. 15 (Amount Rs. 46000/-) | | 4738.00 |
| | **Total** | | **1,35,670.00** |

सिलेंडर मेन फोल्ड मध्ये पाण्याचे स्प्रिंकलर बसविणेचे काम त्या क्षेत्रातले तज्ञ यांचेकडुन विहित पद्धतीने दरपत्रक मागावुन करता येईल. उपरोक्त प्रमाणे साहीत्य, मजुरी, टॅक्सेसमध्ये वाढ झालेली असल्याने सदर कामासाठी अंदाजे रु. १,५०,०००/- (अक्षरी रुपये एक लाख पन्नास हजार मात्र) खर्च अपेक्षित आहे.

तरी वरीलप्रमाणे चपाती किचन मध्ये वाढीव गॅस पाईप बनविणेकामी अंदाजे रक्कम रु. १,००,०००/- (अक्षरी रुपये एक लाख मात्र) खर्चास व सिलेंडर मेन फोल्ड मध्ये पाण्याचे स्प्रिंकलर बसविणे व त्याकामी अंदाजे रक्कम रु. १,५०,०००/- (अक्षरी रुपये एक लाख पन्नास हजार मात्र) पर्यंतच्या खर्चास मान्यता मिळणेकामी मा. त्रीसदस्य समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.४२२** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे चपाती किचन मध्ये वाढीव गॅस पाईप बनविणेकामी अंदाजे रक्कम रु. १,००,०००/- व सिलेंडर मेन फोल्ड मध्ये पाण्याचे स्प्रिंकलर बसविणेसाठी व त्याकामी येणारे अंदाजे रक्कम रु. १,५०,०००/- पर्यंतच्या खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-अधिक्षक,प्रसादालय विभाग)

---

**विषय नं.२१** **आषाढी एकादशी निमित्ताने समाधी मंदीरात फूलांची सजावट करणे बाबत.**

**प्रस्ताव-** श्री अनुज शर्मा ,गजीयाबाद यांनी कळविले की, आषाढी एकादशी निमित्ताने दिनांक ३०/०६/२०१२ रोजी श्री साईबाबांचे समाधी मंदिरातील गाभाऱ्यास फुलांची सजावट करण्यास तयार आहे. फुलांची सजावट करणेसाठी त्यांनी संस्थान कडे परवानगी मागीतलेली आहे.

संस्थान, संस्थान मार्फत साजऱ्या करण्यात येणाऱ्या उत्सवासाठी समाधी मंदिर,दारकामाई, चावडी, गुरुस्थान या ठिकाणी फुलांची सजावट करण्यात येते. सदरची सजावट ही संस्थान खर्चाने किंवा कोणी साईभक्त देणगी म्हणुन सजावट करण्यास तयार असल्यास त्यांना सजावटीची परवानगी देण्यात येते.

श्री गुरुपौर्णिमा उत्सव -२०११. या निमित्ताने के.सी. सुब्रामणी राजु ,बंगलोर यांनी .,श्रीमती. अंबिका व्ही नायर, मुंबई.यांनी, श्री पुण्यतिथी उत्सव -२०११, श्री रविंद्र तलवार,दिल्ली यांनी दिपावली -२०११ व श्री डंग, दिल्ली.यांना श्री दत्त जयंती निमित्ताने, श्री राजस जैन,पुणे यांनी नववर्ष -२०१२ निमित्ताने, श्री रामनवमी उत्सव- २०१२ या निमित्ताने श्रीमती रिम्पल लोहीया , मा. विश्वस्त श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांना मंदिर व मंदिर परिसरास फुलांची सजावट करणेस परवानगी देण्यात आलेली आहे.

श्री. अनुज शर्मा, गजीयाबाद यांना आषाढी एकादशी निमित्ताने मंदिर व मंदिर परिसरात फुलाची सजावट करणेस व येणारे कारागीर यांना दर्शनासाठी, जेवणासाठी पास व सजावटीचे सामान ठेवणेसाठी हॉल देता येईल. त्यास मंजुरी मिळावी ही विनंती.

**निर्णय क्र.४२३** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री. अनुज शर्मा, गजीयाबाद यांना आषाढी एकादशी निमित्ताने मंदिर व मंदिर परिसरात फुलाची सजावट करणेस व येणारे कारागीर यांना दर्शनासाठी, जेवणासाठी पास व सजावटीचे सामान ठेवणेसाठी हॉल देण्यात यावा असे ठरले.** (कार्यवाही-बगीचा विभागप्रमुख)

---

**विषय नं.२२** **संस्थान परिसरातील नारळ फळे (शहाळे)विक्री करणे बाबत.**

**प्रस्ताव-** बगीचा विभागामार्फत संस्थान परिसरामध्ये साठवण तलावाचे चारही बाजुने व पश्चिमेला आंबा- नारळ बागेत , धर्मशाळा परिसर, साईनगर परिसर , नविन भक्त निवास परिसर, शैक्षणिक संकुल परिसरात एकुण १५०० नारळ झाडे लावण्यात आलेले आहे. सदर झाडांना मागील ४ ते ५ वर्षापासुन चांगल्या प्रमाणात फळे येण्यास सुरुवात झालेली आहे. मागील वर्षी या नारळ (शहाळे) फळांची विक्री करणेकामी दरपत्रके मागवुन त्यांची खोती देण्यात आलेली होती. सदरच्या खोतीचा कालावधी माहे - मार्च १२ अखेर संपलेला आहे. नारळांच्या झाडांना जुन पासुन नविन बहारचे फळे येण्यास सुरुवात होईल. करिता या नारळ झाडांची खोती देणे आवश्यक आहे.

नारळ (शहाळे) फळे खोती देणेसाठी स्थानिक फळविक्रेते / व्यापारी, हॉटेल्स् , कृषि उत्पन्न बाजार समिती, राहाता व कोपरगांव यांचे कडुन दरपत्रक मागवुन ०१ वर्ष कालावधीसाठी नारळ (शहाळे) फळांची ठेका देता येईल. तरी नारळ (शहाळे) फळांची प्रति नग या प्रमाणे दर घेवुन नारळ (शहाळे) याची उच्चोत्तम दराने माहे- मे २०१२ ते मार्च -२०१३ या कालावधीसाठी ठेका देता येईल.

**निर्णय क्र.४२४ यावर सविस्तर चर्चा होऊन, माहे मे-२०१२ ते मार्च -२०१३ या एक वर्ष कालावधीसाठी संस्थान परिसरातील नारळ फळे (शहाळे) खोती देणेसाठी स्थानिक फळविक्रेते / व्यापारी, हॉटेल्स् , कृषि उत्पन्न बाजार समिती, राहाता व कोपरगांव यांचे कडून दरपत्रक मागविण्यात यावेत असे ठरले.**

(कार्यवाही-बगीचा विभागप्रमुख)

---

**विषय नं.२३** **संस्थान परिसरातील नारळ झाडांसाठी शेणखत खरेदी करणे बाबत.**

**प्रस्ताव-** संस्थान परिसरामध्ये साठवण तलाव चारही बाजुने, पश्चिमेला आंबा- नारळ बागेत, धर्मशाळा परिसर,साईनगर परिसर, नविन भक्त निवास परिसर, शैक्षणिक संकुल परिसरात या ठिकाणी १५०० नारळ झाडे लावण्यात आलेले आहे. या झाडांना मागील ३ वर्षा पासुन शेणखत देण्यात आलेले नाही. नारळ झाडां पासुन गेली ५ ते ६ वर्षापासुन चांगल्या प्रमाणात फळे येत आहे. या फळांच्या विक्रीतुन संस्थानसाठी चांगले उत्पन्न मिळते आहे. या वर्षी रु.८.५०/- या दराने प्रती नग विक्री करण्यात येत आहे.

नारळ झाडांना पावसाळा सुरु झाले नंतर बहर येण्यास सुरुवात होते. त्यामुळे पावसाळा चालु होणे अगोदर नारळ झाडांना शेणखत दिल्याने नविन हंगामात चांगल्या प्रमाणात बहर /कोंब होईल, करिता संस्थान परिसरातील झाडांना शेणखत देणे आवश्यक आहे. संस्थान परिसरातील झाडांसाठी अंदाजे १५ ट्रिप शेणखत देणे आवश्यक आहे.

०१ ट्रिप शेणखत खरेदी करणेसाठी ४०००/- मात्र खर्च येईल. ( रु.३००० शेणखत किंमत + १००० वाहतुक खर्च) या प्रमाणे खर्च येईल. १५ ट्रिप शेणखत खरेदी करणेसाठी अंदाजे रु.६०,०००/- मात्र खर्च अपेक्षित आहे.

नारळ झाडांना शेणखत टाकणेसाठी स्थानिक शेतकरी व शेणखत पुरवठाधारक यांचे कडुन दरपत्रके घेवुन प्रशासकिय मंजुरीने दरपत्रके उघडुन सदरचे शेणखत खरेदी करता येईल.

**निर्णय क्र.४२५ यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थान परिसरातील नारळ झाडांसाठी ट्रॅक्टर ट्रेलरच्या १५ ट्रीपा शेणखत खरेदी करणेकामी स्थानिक शेतकरी व शेणखत पूरविणारे ठेकेदार यांचेकडून दरपत्रके घेऊन खरेदी करण्यात यावे. याकामी येणारे अंदाजे रक्कम रुपये ६०,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही-बगीचा विभागप्रमुख)

---

**विषय नं.२४** **श्री गुरुपौर्णिमा उत्सव २०१२ या निमित्ताने समाधी मंदिर व मंदिर परिसरास फुलांचे सजावट करणे बाबत**

**प्रस्ताव-** श्री. व्हि.एम. विजय रामा ,बंगलोर यांनी कळविले की, श्री गुरुपौर्णिमा उत्सव २०१२ निमित्ताने ते श्री साईबाबांचे समाधी मंदिरातील गाभाऱ्यास,मंदिर परिसरातील व्दारकामाई, चावडी, गुरुस्थान इ. ठिकाणी फुलांची सजावट करण्यास तयार आहे. फुलांची सजावट करणेसाठी त्यांनी संस्थान कडे परवानगी मागीतलेली आहे.

संस्थान मार्फत साजऱ्या करण्यात येणाऱ्या उत्सवासाठी समाधी मंदिर, व्दारकामाई, चावडी, गुरुस्थान या ठिकाणी फुलांची सजावट करण्यात येते. सदरची सजावट ही संस्थान खर्चाने किंवा कोणी साईभक्त देणगी म्हणुन सजावट करण्यास तयार असल्यास त्यांना सजावटीची परवानगी देण्यात येते.

श्री गुरुपौर्णिमा उत्सव -२०११. साठी व्ही.एस.एल, इंडस्ट्रियल प्रायव्हेट लिमिटेड, यांनी व श्री रामनवमी उत्सवा-१२ साठी श्रीमती.लोहिया मॅडम ,नागपूर. यांना व अक्षय तृतिया निमित्ताने श्री दत्तोबा बांगर,पुणे. यांना फुलांची सजावाट करणेस परवानगी देण्यात आलेली आहे.

श्री गुरुपौर्णिमा उत्सवात देणगी स्वरुपात फुलांची सजावट करणेसाठी कोणाचाही अर्ज आलेला नाही. त्यामुळे व्ही.एम. विजय रामा ,बंगलोर यांना फुलांची सजावट करणेसाठी परवानगी देता येईल. सजावटीसाठी येणारे कारागीर यांना दर्शनासाठी, जेवणासाठी पास व सजावटीचे सामान ठेवणेसाठी हॉल देता येईल.

तरी श्री. व्ही.एम. विजय रामा ,बंगलोर यांनी श्री गुरुपौर्णिमा उत्सव-२०१२ या निमित्ताने श्री साईबाबांचे समाधी मंदिरातील गाभाऱ्यास,मंदिर परिसरातील व्दारकामाई, चावडी, गुरुस्थान इ. ठिकाणी फुलांची सजावट करणेस परवानगी देता येईल.

**निर्णय क्र.४२६** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री गुरुपौर्णिमा उत्सव २०१२ या निमित्ताने समाधी मंदिर व मंदिर परिसरास फुलांचे सजावट करणेकामी श्री व्ही.एम. विजय रामा ,बंगलोर यांना परवानगी देण्यात यावी. सदर सजावटीसाठी येणारे त्यांचे कारागीरांना दर्शन, जेवणासाठी पास व सजावटीचे सामान ठेवणेसाठी हॉल देण्यात यावा असे ठरले.** (कार्यवाही-बगीचा विभागप्रमुख)

---

**विषय नं.२५** **कंट्रोल रुम करिता नविन खरेदी करण्यात आलेल्या ०२ नग जादा फायबर मोड्यूल्सचे खर्चास मंजूरी मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** मंदिर व परिसरात अद्ययावत सुरक्षा यंत्रणा मे.व्हेन्टेज इंटीग्रेटड सि.सो.नोईडा या कंपनी मार्फत कार्यान्वित करण्यात आलेली आहे. सुरक्षा यंत्रणेचे कंट्रोलरुम गुरुस्थान मंदिरा समोरील तळघरात करण्यात आलेले आहे.सदर कंपनीला सुरक्षा साहित्यांची वर्क ऑर्डर जा.नं.एस एस एस वशी-संरक्षण/ ५९५८ / दि.१४.०४.२०१० अन्वये देण्यात आलेली होती.सदर वर्कऑर्डर मध्ये कंट्रोलरुमसाठी १२ नग Gigabit Sigale Fiber port Modules ची मागणी करण्यात आलेली होती.

परंतु पुरवठा आदेशानुसार कळविलेले १२ नग Modules कंट्रोलरुमसाठी कमी पडत असल्याचे दिसून आले आहे. कंट्रोल रुम मध्ये बसविण्यात येणाऱ्या जादा सुरक्षा साहित्यांपैकी फेस रेकगनीशन सॉप्टवेअर करीता आणखी ०२ नग मोडयुल्सची आवश्यकता होती, की ज्यामुळे यंत्रणा स्लो होणार नाही व मंदिर परिसरात बसविण्यात आलेल्या कॅमेऱ्यांचा स्पीड वाढेल.करीता ट्रायकलर कसल्टंटचे प्रतिनिधी श्री विरेंद्र कुमार व सुरक्षा साहित्य पुरवठादार श्री प्रणव वर्मा यांचे समवेत दि.०१.०९.२०११ रोजी चर्चा झाली. झालेल्या चर्चे नुसार नविन ०२ नग मोडयुल्स पुरवठादार यांनी त्यांना देण्यात आलेल्या वर्क ऑर्डरमध्ये नमूद रकमेनुसारच खरेदी करुन कंट्रोलरुम मध्ये बसविण्याचे ठरले होते.

त्यानुसार सदरचे ०२ नग फायबर मोडयुल्स मे व्हेन्टेज यांचे कडून खरेदी करुन सदर मोडयुल्स कंट्रोलरुममध्ये फायबर स्विचला नेटवर्क स्विचने कनेक्टीव्हीटीसाठी बसविण्यात आलेले आहे.

सदर Gigabit Modules ची किंमत वर्कऑर्डर प्रमाणे प्रति नग रु ३८,५००/- मात्र अशी असून ०२ नग Gigabit Modules ची किंमत रु.७७,०००/- इतकी होते तसेच त्यावरील ५% प्रमाणे सेल्स टॅक्स रु.३,८५०/- अशी एकुण बिलाची रक्कम रु.८०,८५०/- मात्रचे आलेल्या खर्चास, त्यानुसार करण्यात आलेल्या कामास मान्यता मिळणेस विनंती तसेच सदर बिलाची रक्कम सुरक्षा साहित्य पुरवठादार मे.व्हेन्टेज यांना आदा होणेस मान्यता असावी.

**निर्णय क्र.४२७** **यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-संरक्षण विभागप्रमुख)

---

**विषय नं.२६** **मंदीर परिसरातील कापडकोठी येथे बसविण्यात आलेल्या सीसीटीव्ही कॅमेऱ्याचे साहित्यांचे खर्चास, केलेल्या कामास कार्योत्तर मंजूरी मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** मंदिर परिसरात असलेल्या कापडकोठीचे ठिकाणी श्रींचे वस्त्र, सोन्या,चांदीचे नाणी,बिनधनी वस्तु,इत्यादी विक्रीसाठी ठेवण्यात येतात. सदरचे ठिकाण सुरक्षिततेच्या दृष्टीने अत्यंत महत्वाचे असल्यामुळे त्या ठिकाणी सी.सी.टी.व्ही.कॅमेरा त्वरीत बसविणे आवश्यक होते.

तत्पुर्वी मंदिर परिसरात बसविण्यात आलेल्या कॅमेऱ्यापैकी मंदिराचे तळघरात सध्या फिक्स सोनी कंपनीचा कॅमेरा बसविण्यात आलेला होता.त्या ठिकाणी पुर्णत: अंधार असल्याने बसविण्यात आलेला फिक्स कॅमेरा उपयोगी पडत नसल्याने सदर ठिकाणी नाईट व्हीजन कॅमेरा बसविण्यात येणार असल्याने त्याठिकाणी असलेला फिक्स कॅमेरा काढून तो कापड कोठी या ठिकाणी व्हेन्टेज कंपनीमार्फत वायरिंग करुन तातडीने बसविण्यात आलेला आहे.

कापडकोठी येथे बसविण्यात येणाऱ्या फिक्स कॅमेऱ्यासाठी सिंगल मोड फायबर मेडीया कनव्हटर ०२ नग,फायबर पॅच कोड ०४ नग,आऊट डोअर वेदर प्रुफ बॉक्स ०१ नग इत्यादी अनुषंगीक साहित्य आवश्यक असल्याने ते मे.व्हेन्टेज इंटिग्रेटेड सिक्युरिटी सोल्युशन प्रा.लि.दिल्ली यांचेकडून पूर्वीच्याच सुरक्षा साहित्य खरेदीसाठी देण्यात आलेल्या वर्कऑर्डर मध्ये नमुद असलेल्या किंमतीनुसारच खरेदी करण्यात आलेले आहे .ते साहित्य सी.सी.टी.व्ही कॅमेऱ्यांसाठी मंदिर परिसरातील कापडकोठी व कंट्रोलरुम येथे कॅमेऱ्यासह बसविण्यात आलेले आहे.उपरोक्त बसविण्यात आलेल्या साहित्यांसाठी व्हॅटसह एकुण २८,४५८/- रुपये मात्र खर्च आलेला आहे.

उपरोक्त साहित्यांसाठी आलेल्या २८,४५८/- मात्रचे खर्चास,त्यानुसार करण्यात आलेल्या कामास तसेच सदर बिलाची रक्कम सुरक्षा साहित्य पुरवठादार मे.व्हॅन्टेज यांना आदा होणेस मान्यता असावी.

**निर्णय क्र.४२८** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे मंदीर परिसरातील कापडकोठी येथे बसविण्यात आलेल्या सीसीटीव्ही कॅमेऱ्याचे साहित्यांसाठी आलेल्या रक्कम रुपये २८,४५८/- मात्रचे**

**खर्चास,त्यानुसार करण्यात आलेल्या कामास तसेच सदर बिलाची रक्कम सुरक्षा साहित्य पुरवठादार मे.व्हॅन्टेज यांना आदा करणेस मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-संरक्षण विभागप्रमुख)

---

**विषय नं.२७** **संस्थान निर्मित साईमंदिरातील आरत्या व मंत्रोच्चार व श्री साई सत्चरित्र सार हिंदी दोहावली ऑडीओ सि.डी. निर्मिती खर्चास मंजूरी मिळणे बाबत.**

**प्रस्ताव-** मा. व्यवस्थापन समितीचे १०.०१.२००८ चे सभेतील निर्णय क्र.७१ नुसार मे. सोनी डीएडीसी मॅन्युपॅक्चरींग इंडिया प्रा.लि., मुंबई यांचेकडील सी.डी./व्हीसीडी निर्मितीसाठी असलेल्या शर्ती /अटी मान्य करण्यात येऊन त्यांचेकडून कायमस्वरुपी संस्थान निर्मित सी.डी., व्हीसीडी चे काम करुन घेण्यास मान्यता मिळालेली आहे.

मा. व्यवस्थापन समितीचे दि.१८.१०.२००८ चे सभेतील निर्णय क्र.८१२ नुसार संस्थान प्रकाशित पुस्तके/ फोटो/छपाई करणे, संस्थान प्रकाशित सी.डी. निर्मिती करणे व विक्री किंमती ठरविणे वगैरे कामाची कार्यालयीन पद्धती निश्चित करण्यात आली आहे. त्यात सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम १४ चा नं. १७ ठ मध्ये समितीची कर्तव्ये व अधिकार यातील तरतुदीनुसार भक्तांची गैरसोय होऊ नये, वेळोवेळी साठा उपलब्ध व्हावा याकरीता खालील सुधारित पद्धत अवलंबणे बाबत विचार करण्यात आलेला आहे.

संस्थान निर्मित खालील ऑडीओ सी.डीचा साठा अल्प प्रमाणात शिल्लक असल्याने त्यांची पुनर्निर्मिती करुन घेणे आवश्यक आहे. सोनी कंपनीची सी.डी. निर्मितीची गुणवत्ता चांगली असल्याने त्यांचेकडून मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयानुसार दरपत्रक मागविण्यात यावे व त्यानुसार मा. कार्यकारी अधिकारी यांनी कार्यादेश द्यावेत. असे ठरले आहे. त्यानुसार मे. सोनी डीएडीसी मॅन्युपॅक्चरींग इंडिया प्रा.लि., मुंबई यांचेकडून खालील प्रमाणे दरपत्रक मागविण्यात आले असून, त्यांचे दि.२२.०३.२०१२ चे पत्रातील दराने अपेक्षित खर्च, शिल्लक साठा प्रस्तावित परिमाण यांचा तपशिल पुढीलप्रमाणे.

| अ नं. | ऑडीओ सी.डीचा तपशिल | शिल्लक संख्या | शिल्लक किती महिने पुरेल | निर्मिती संख्या | एक्साइज, व्हॅटसह दर | एकूण रक्कम रुपये | संस्थान विक्री किंमत रुपये |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | श्री साई मंदिरातील आरत्या व मंत्रोच्चार एमपी ३ | ६२१८ | ४ | १५,००० नग | १८.२७ | २७४०५०.०० | ३०.०० |
| ०२ | श्री साई सत्चरित्र हिंदी दोहावली (३ सीडीचा संच) | ३६३६ | ५ | १०,००० संच | ६४.७९ | ६४७९००.०० | ९०.०० |
| | | | | | एकूण रु. | ९,२१,९५०.०० | |

वरील तक्त्यात दर्शविलेप्रमाणे ऑडीओ सी.डीची पुनर्निर्मिती मे सोनी डीएडीसी मॅन्युफॅक्चरींग इंडिया प्रा.लि.,मुंबई यांचेकडून करुन घेणेस रु.९,२१,९५०/- (अक्षरी रुपये - नऊ लाख, एकविस हजार, नऊशे पन्नास) मात्र खर्च अपेक्षित आहे. कंपनीचे शर्ती अटीनुसार कंपनीस अग्रीम रक्कम द्यावी लागते.

सबब M/s.Sony DADC Manufacturing India Pvt. ltd. Mumbai यांचेकडून प्रस्तावित काम करुन घेणेस त्याकामी येणारे ९,२१,९५०/- खर्चास तसेच M/s.Sony DADC Manufacturing India Pvt. ltd. Mumbai यांना रक्कम रुपये ९,२१,९५०/- अग्रीम देणेस मान्यतेसाठी सादर .

**निर्णय क्र.४२९** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे संस्थान निर्मित साईमंदिरातील आरत्या व मंत्रोच्चार व श्री साई सत्चरित्र सार हिंदी दोहावली ऑडीओ सि.डी. M/s.Sony DADC Manufacturing India Pvt. ltd. Mumbai यांचेकडून करुन घेणेस याकामी येणारे ९,२१,९५०/- खर्चास तसेच M/s.Sony DADC Manufacturing India Pvt. ltd. Mumbai यांना रक्कम रुपये ९,२१,९५०/- अग्रीम देणेस मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-अधिक्षक,प्रकाशने विभाग)

---

**विषय नं.२८** **श्री साईलीला व्दैमासिक अंक छपाईकामी दरपत्रके मागविणे बाबत.**

**प्रस्ताव-** सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.१४ च्या कलम नं.१७ ठ मध्ये खालील प्रमाणे तरतूद आहे.

"श्री साईबाबांचे जीवन त्यांचे कार्य, त्यांच्या लीला व त्यांची शिकवण याबाबतच्या उपयुक्त माहीतीचा प्रचार- प्रसार करील आणि साहित्य ग्रंथालय चालवील व त्याचा विस्तार करील"

वरील तरतुदीनुसार श्री साईबाबा संस्थानमार्फत श्री साईलीला द्वैमासिक मराठी / हिंदी-इंग्रजी प्रकाशित केले जाते.

मा.व्यवस्थापन समितीचे दि.१२.०६.२०११ चे सभेतील निर्णय क्र.४९१ नुसार मे. टॅको व्हीजन्स प्रा.लि., मुंबई यांना जा.नं.एसएसएस-वशी - प्रकाशने-१६९०/२०११ दिनांक ०४.०७.२०११ अन्वये माहे जुलै-ऑगस्ट २०११ ते मे-जून २०१२ या कालावधीसाठी छपाई करुन देणेकामी खालील प्रमाणे कार्यादेश देण्यात आला आहे.

| अ.नं | तपशिल | प्रति महा अंदाजे छपाई संख्या | मंजूर दर रुपये पैसे | वार्षिक वर्गणी रुपये | किरकोळ विक्री |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | साईलीला अंक मराठी (५अंक) ३२ + ४ पाने =३६ पाने | १३,००० नग | १०.२३ | ५०/- | ८/- |
| ०२ | दसरा विशेषांक मराठी (१ अंक) ६४ +४ = ६८ पाने | १३,००० नग | १७.०८ | | १५/- |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ०३ | साईलीला अंक हिंदी-इंग्रजी (५अंक) ३२ +४ =३६ पाने | १८,००० नग | ९.१८ | ५०/- | ८/- |
| ०४ | दसरा विशेषांक हिंदी-इंग्रजी (१ अंक) ६४ +४ =६८ पाने | १८,००० नग | १५.९८ | | १५/- |

छपाई कार्यादेशाची मुदत माहे जून २०१२ अखेर संपत आहे. पुढील वर्षाकरीता माहे जुलै-ऑगस्ट २०१२ ते मे-जुन २०१३ या कालावधीसाठी श्री साईलीला मराठी/हिंदी-इंग्रजी द्वैमासिक छपाईचे कामासाठी संस्थान अधिकृत निवडक प्रेसधारकांचे यादीतील मुंबई येथील प्रेसधारकांकडून दरपत्रके मागवून निम्नतम दरानुसार छपाई करुन घ्यावी लागेल. श्री साईलीला मासिक वितरणाचे काम संस्थानचे, मुंबई कार्यालयातून होते. वर्गणीदाराना मासिक वेळेत पोहच व्हावे म्हणून फक्त मुंबई येथील प्रेसधारकांकडून दरपत्रके मागविणे योग्य राहील.

दि.१९.०४.२०१२ रोजी मुंबई कार्यालय अधिक्षक यांचेशी दुरध्वनीवरुन साईलीला अंकाचे छपाईबाबत चर्चा केली असता, सभासद संख्येत दिवसेंदिवस वाढ होत असल्याने मागील छपाई संख्ये पेक्षा साईलीला मराठी अंकात २००० नगांनी वाढ करणेबाबत सुचित केले आहे.

| अ.नं. | तपशिल | प्रति महा छपाई संख्या नग | प्रति अंक मागील छपाई दर | प्रति अंक अंदाजे छपाई दर | द्वैमासिक छपाई मासिक अंक | एकूण अंदाजे रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | साईलीला अंक मराठी ३२ + ४ पाने =३६ पाने | १५,००० | १०.२३ | १२.०० | ५ | ९,००,०००/- |
| ०२ | साईलीला अंक हिंदी-इंग्रजी ३२ +४ =३६ पाने | १७,००० | ९.१८ | ११.०० | ५ | ९३,५,०००/- |
| ०३ | दसरा विशेषांक मराठी ६४ +४ = ६८ पाने | १५,००० | १७.०८ | १९.०० | १ | २,८५,०००/- |
| ०४ | दसरा विशेषांक हिंदी-इंग्रजी ६४ +४ =६८ पाने | १७,००० | १५.९८ | १७.०० | १ | २,८९,०००/- |
| | | | | | एकूण रु. | २४,०९०००/- |

सबब उपरोक्त परिशिष्टात नमुद केलेप्रमाणे माहे जुलै-ऑगस्ट २०१२ ते मे-जून २०१३ या कालावधी करीता श्री साईलीला द्वैमासिक अंक व दसरा विशेषांक मराठी व हिंदी-इंग्रजी छपाई करुन घेणेस संस्थान अधिकृत प्रेसधारकांचे यादीतील मुंबई येथील प्रेसधारकांकडून दरपत्रके मागविणेस किंवा जाहिरातीद्वारे दरपत्रके मागविणे याबाबद योग्य निर्णय होणेस व छपाईकामी येणा-या अंदाजे रु. २४,०९,०००/- मात्रचे खर्चास मान्यतेसाठी सादर.

**निर्णय क्र.४३० यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे माहे जुलै-ऑगस्ट २०१२ ते मे-जून २०१३ या कालावधी करीता श्री साईलीला द्वैमासिक अंक व दसरा विशेषांक मराठी व हिंदी-इंग्रजी छपाई करुन घेणेस संस्थान अधिकृत प्रेसधारकांचे यादीतील मुंबई येथील प्रेसधारकांकडून दरपत्रके मागवून छपाई करणेस व याकामी येणा-या अंदाजे रु. २४,०९,०००/-मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही-अधिक्षक,प्रकाशने विभाग)

---

**विषय नं.२९ ह.भ.प. दासगणूकृत चार आध्याय (मराठी) पुस्तीकेचा इंग्रजी भाषेत अनुवाद करणेस अनुमती देणे बाबत.**

**प्रस्ताव-** श्री.राकेश पटेल, सुरत यांनी दि.०१.०४.२०१२ चे पत्रान्वये ह.भ.प.दासगणूकृत चार अध्याय - मराठी या संस्थान प्रकाशित पुस्तीकेचा - इंग्रजी भाषेत अनुवाद करणेस परवानगी मागितली आहे. सदर पुस्तीकेच्या प्रथम १००० प्रती ते स्वतः छापून देणगी दाखल देणार असून, सदर पुस्तीकेचे पुढील प्रकाशनाचे सर्व हक्क विनाअट संस्थानला देणार आहेत.

सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.१४ च्या कलम नं.१७ ठ मध्ये "श्री साईबाबांचे जीवन त्यांचे कार्य, त्यांच्या लीला व त्यांची शिकवण याबाबतच्या उपयुक्त माहितीचा प्रचार-प्रसार करील आणि साहित्य ग्रंथालय चालविल व त्याचा विस्तार करील "अशी तरतुद आहे.

यानुसार साईबाबांचे जीवन कार्याचा प्रचार-प्रसार सर्व भाषेत व्हावा म्हणून उक्त पुस्तीकेचा इंग्रजी अनुवाद करणेस परवानगी देणेस हरकत नाही.

तथापि संस्थानचे नियमाप्रमाणे पुस्तक प्रकाशनापूर्वी, केलेला अनुवाद योग्य असलेबाबत पुणे विद्यापिठाचे प्रमाणपत्र सादर करणेबाबत त्यांना सांगता येईल. सर्व बाबींची पूर्तता झाल्यानंतरच पुस्तक संस्थानद्वारा प्रकाशन करणेबाबत कार्यवाही करणेत येईल.

सबब श्री. राकेश पटेल, सुरत यांना ह.भ.प.दासगणूकृत चार अध्याय - मराठी पुस्तीकेचा इंग्रजी भाषेत अनुवाद करणेस अनुमती देणेस मान्यतेसाठी सादर.

**निर्णय क्र.४३१ यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री. राकेश पटेल, सुरत यांना ह.भ.प.दासगणूकृत चार अध्याय - मराठी पुस्तीकेचा इंग्रजी भाषेत अनुवाद करणेस मान्यता देण्यात आली. याकामी त्यांनी संस्थानचे नियमाप्रमाणे पुस्तक प्रकाशनापूर्वी, केलेला अनुवाद योग्य असलेबाबत पुणे विद्यापिठाचे प्रमाणपत्र सादर करणेबाबत त्यांना सांगण्यात यावे असे ठरले.** (कार्यवाही-अधिक्षक,प्रकाशने विभाग)

---

**विषय नं.३०** **श्री साईलीला मराठी व श्री साईलीला हिंदी-इंग्रजी द्वै-मासिके वर्गणीदारांना पाठविणेकामी पाकिटे छपाईबाबत.**

**प्रस्ताव-** संस्थान प्रकाशित साईलीला मराठी व श्री साईलीला हिंदी-इंग्रजी द्वैमासिकाचे वर्गणीदारांना मुंबई कार्यालयाद्वारे अंक पोष्टाने पाठविले जातात. सन २०११-१२ करीता माहे जुलै-ऑगष्ट २०११ ते मे-जून २०१२ या कालावधीसाठी आवश्यक पाकीटे छपाईकामी विहीत पद्धतीने प्रकाशने विभागाकडील अधिकृत प्रेसधारकांचे यादीतील मुंबई येथील प्रेसधारकांना दर मागणी पत्रके पाठवून प्राप्त दरपत्रकातील निम्नतम दर धारक मे. टॅको व्हीजन्स, मुंबई यांना खालील प्रमाणे कार्यादेश देण्यात आलेला होता.

| अ.नं. | तपशिल | छपाई संख्या | मंजूर दर सर्व करांसह |
|---|---|---|---|
| ०१ | साईलीला मराठी द्वैमासिकासाठी ब्राऊन पाकीटे | ८०,००० | ०.८५ |
| ०२ | श्री साईलीला हिंदी - इंग्रजी द्वैमासिकासाठी ब्राऊन पाकीटे | १,२०,००० | ०.८० |

कार्यादेशाची मुदत जुन २०१२ अखेर संपत असल्याने सन २०१२-१३ करीता माहे जुलै-ऑगष्ट २०१२ ते मे-जून २०१३ या कालावधीसाठी खालीलप्रमाणे पाकीटे छपाई करुन घेणे आवश्यक आहे.

| अ.नं. | तपशिल | प्रस्तावित संख्या | अंदाजे दर | मंजूर दर सर्व करांसह |
|---|---|---|---|---|
| ०१ | साईलीला मराठी द्वैमासिकासाठी ब्राऊन पाकीटे<br>साईज - ११.५" x ८.५"फ्लॅप - १.७"पेपर -८० जीएसएम ब्राऊन क्रॉफ्ट पेपर प्रिंटींग एका रंगात<br>१५००० वर्गणीदार x ६अंक = ९०००० | १,००,००० | १.१० | ११००००.०० |
| ०२ | श्री साईलीला हिंदी -इंग्रजी द्वैमासिकासाठी ब्राऊन पाकीटे<br>साईज - ११.५" x८.५"फ्लॅप - १.७"<br>पेपर -८० जीएसएम ब्राऊन क्रॉफ्ट पेपर प्रिंटींग एका रंगात<br>१७००० वर्गणीदार x ६अंक = १,०२,००० | ११०००० | १.०५ | ११५५००.०० |
| | | **एकुण अपेक्षित खर्च-** | | **२,२५,५००.००** |

सबब उपरोक्त परिशिष्टात नमूद केलेप्रमाणे माहे जुलै-ऑगष्ट २०१२ ते मे-जून २०१३ या कालावधी करीता साईलीला - मराठी व श्री साईलीला हिंदी-इंग्रजी द्वैमासिके वर्गणीदारांना पोष्टाने पाठविणेकामी आवश्यक पाकीटे छपाईकामी प्रकाशने विभागाकडील उपलब्ध अधिकृत प्रेसधारकांचे यादीतील मुंबई परिसरातील प्रेस धारकांकडून दरपत्रके मागविणेस किवा वृत्तपत्रात जाहिरात प्रसिद्ध करुन दरपत्रके मागविणेबाबत तसेच छपाईकामी येणा-या अंदाजे रु.२,२५,०००/- मात्रचे खर्चास मान्यतेसाठी सादर.

**निर्णय क्र.४३२** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे माहे जुलै-ऑगष्ट २०१२ ते मे-जून २०१३ या कालावधी करीता साईलीला - मराठी व श्री साईलीला हिंदी-इंग्रजी द्वैमासिके वर्गणीदारांना पोष्टाने पाठविणेकामी आवश्यक पाकीटे छपाईकामी प्रकाशने विभागाकडील उपलब्ध अधिकृत प्रेसधारकांचे यादीतील मुंबई परिसरातील प्रेस धारकांकडून दरपत्रके मागवून छपाई करुन घेण्यास व याकामी येणारे अंदाजे रु.२,२५,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-अधिक्षक,प्रकाशने विभाग)

---

**विषय नं.३१** **श्री साईसमर्थ सतचरित्र इंग्रजी (श्रीमती झरीन) या संस्थान प्रकाशित पूस्तकाचा मल्याळम भाषेतील अनुवाद प्रकाशित करणेस परवानगी देणे बाबत.**

**प्रस्ताव-** श्री शिरडी साईबाबा आश्रम क्षेत्र चॅरीटेबल ट्रस्ट तिरुवनंतरपुरम, केरळ यांनी दि.२६.११.२०११ चे पत्रान्वये श्री साई समर्थ सच्चरित्र इंग्रजी (लेखीका.श्रीमती झरीन) या संस्थान प्रकाशित पुस्तकाचा मल्याळम भाषेतील अनुवाद प्रकाशित करणेस अनुमती मागीतली होती. पुस्तकाची छपाई, प्रकाशन व विक्री सदर ट्रस्ट करणार असून कॉपीराईट त्यांचेकडे राहणार आहेत. तथापि मुळ इंग्रजी संस्थान प्रकाशित पुस्तकाचे सर्वाधिकार (Copy Right) संस्थानकडे असल्याने त्यांना अनुमती आवश्यक असल्याने, तशी अनुमती देणेबाबतचा विषय मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे ठेवला होता.

मा.व्य.समिती सभा दि.१४.०१.२०१२, निर्णय क्र.९३ नुसार खालीलप्रमाणे निर्णय पारीत झाला आहे. संस्थान प्रकाशित पुस्तकाचा मल्याळम भाषेत अनुवाद करणेस मान्यता देण्यात आली, मात्र सदर अनुवाद पुणे विद्यापिठाचे मल्याळम भाषेतील प्राध्यापकाकडून प्रमाणित करुन त्याची प्रत संस्थान दप्तरी ठेवण्यात यावी.

इकडील जावक नं.६०५० दि.०१.०४.२०१२ नुसार ट्रस्टला मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयानुसार कार्यवाही करणेबाबत कळविले होते.

श्री शिरडी साईबाबा आश्रम क्षेत्र चॅरीटेबल ट्रस्ट तिरुवनंतरपुरम, केरळ यांनी दि.०३.०५.२०१२ चे पत्रान्वये कळविले आहे की, पुणे विद्यापीठाकडे मल्याळम भाषा विभाग नसल्याचे समजते. तरी उक्त पुस्तकाचा मल्याळम अनुवाद प्रकाशित करणेबाबत पुढील निर्णय कळविणेबाबत विनंती केली आहे.

सदर ट्रस्टने दि.१४.०९.२०११ चे विनंती पत्रासोबत उक्त पुस्तकाचा मल्याळम भाषेत केलेला अनुवाद मुळ पुस्तकानुसार असुन अर्थात कोणताही बदल केला नसलेबाबत युनिव्हर्सिटी कॉलेज, तिरुवनंतपुरम यांचे मल्याळम विभागाचे प्रमाणपत्र, मल्याळ ट्रान्सलेटर, पोलीस हेडक्वॉर्टर, केरळ व नोटरी

सर्टीफिकेट जोडले आहे. तसेच मल्याळम अनुवादक स्वत: केरळ सरकारचे कायदा विभागाचे जॉईन्ट सेक्रेटरी आहेत. सदर प्रमाणपत्राचे अधीन राहून त्यांना उक्त पुस्तकाचा मल्याळम भाषेत अनुवाद प्रकाशित करणेस अनुमती द्यावी किंवा कसे याबाबत निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.४३३** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईसमर्थ सतचरित्र इंग्रजी (श्रीमती झरीन) या संस्थान प्रकाशित पूस्तकाचा मल्याळम भाषेतील अनुवाद प्रकाशित करणेस श्री शिरडी साईबाबा आश्रम क्षेत्र चॅरीटेबल ट्रस्ट तिरुवनंतरपुरम, केरळ यांना मान्यता देणेत आली.** (कार्यवाही- अधिक्षक, प्रकाशने)

---

**विषय नं.३२** **श्री साईलीला मराठी व श्री साईलीला हिंदी-इंग्रजी व्दैमासिके वर्गणीदारांना पाठविणेकामी मागील मंजूर दराने पाकीटे छपाई करणे बाबत**

**प्रस्ताव-** मे.टॅको व्हीजन्स् प्रा.लि., मुंबई यांची जा.नं.एसएसएस-वशी- प्रकाशने-१९९२/२०११ दिनांक १९.०७.२०११. या पत्रान्वये दिलेल्या साईलीला मराठी व श्री साईलीला हिंदी - इंग्रजी द्वैमासिके वर्गणीदारांना पाठविणेकामी आवश्यक पाकीटे पुरविणेचा कार्यादेशाची मुदत माहे जून २०१२ अखेर संपत असल्याने सन २०१२-२०१३ करीता पाकीटे छपाईसाठी विहीत पद्धतीने दरपत्रके मागविणेबाबतची टिपणी मा.त्रिसदस्यीय समिती सभेपुढे निर्णयार्थ ठेवण्यात आली आहे. तथापि अद्याप विषय प्रलंबीत आहे. सभेची मान्यता मिळणे, दरपत्रके मागविणे, दरपत्रके उघडून तुलनात्मक तक्ता तयार करणे याकामी बराच कालावधी लागणार आहे.

भक्तांना माहे जुलै-ऑगस्ट २०१२ अंक वेळेत मिळावेत म्हणून जून अखेर अखेर पाकीटांची छपाई होऊन अंक वितरीत होणे आवश्यक आहे. सन २०१२-२०१३ करीता आवश्यक पाकीटे छपाईचा निर्णय न झाल्याने सदर अंक पाठविणेकामी अडचण निर्माण झाली आहे.

तरी भक्तांना जुलै-ऑगस्ट २०१२ चे अंक वेळेत मिळावे याकरीता सन २०१२-२०१३ करीता आवश्यक पाकीटे छपाई दराचा निर्णय होईपावेतो मागिल मंजूर दरानेच मे.टॅको व्हीजन्स् प्रा.लि., मुंबई यांचेकडून खालील नमुद केलेप्रमाणे पाकीटे छपाई करुन घेणेबाबत निर्णय होणेस विनंती.

| अ.नं. | तपशिल | छपाई संख्या | मंजूर दर सर्व करांसह रुपये | अपेक्षित खर्च रुपये |
|---|---|---|---|---|
| ०१ | साईलीला मराठी द्वैमासिकासाठी ब्राऊन पाकीटे | १५,००० | ०.८५ | १२७५०.०० |
| ०२ | श्री साईलीला हिंदी - इंग्रजी द्वैमासिकासाठी ब्राऊन पाकीटे | १७,००० | ०.८० | १३६००.०० |
| | | | एकूण रूपये | २६३५०.०० |

प्रस्तावित छपाईसाठी अंदाजे एकूण रू.२६३५०/- मात्र खर्च अपेक्षित आहे.

**निर्णय क्र.४३४** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईलीला मराठी व श्री साईलीला हिंदी-इंग्रजी व्दैमासिके वर्गणीदारांना पाठविणेकामी मागील मंजूर दराने पाकीटे छपाई करणेस व याकामी येणारे अंदाजे रू.२६,३५०/- मात्रचे खर्चास मान्यता देणेत आली.** (कार्यवाही- अधिक्षक, प्रकाशने)

---

**विषय नं.३३** **प्राथमिक विभागासाठी नेमणूक करण्यात आलेल्या सहाय्यक शिक्षक (परिविक्षाधीन) कालावधीला कामावर हजर तारखेपासून सलग ०३ वर्ष मान्यता मिळणे बाबत.**

**प्रस्ताव-** मा. व्यवस्थापन समिती सभा दि.२६.०३.२०११ चे सभेतील निर्णय क्रमांक २३५ नुसार श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कुलचे प्राथमिक विभागासाठी खालीलप्रमाणें २ सहाय्यक शिक्षकांची (परिविक्षाधीन) नेमणूक करण्यात आलेली आहे.

| अ.नं. | उमेदवराचे नांव | पदनाम | जात-प्रवर्ग | शैक्षणिक पात्रता | नेमणूक आदेश |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | श्री पवार शेखर गुलाब | सहाय्यक शिक्षक (परिविक्षाधीन ) | हिंदु- महार एस. सी. | बी.एस्सी. डी.एड. | जा.न.एसएसएस/इं.मि.स्कुल/ ३३२०/२०११ दि.२९.०९.२०११ हजर तारीख:-१ आक्टों. २०११ |
| ०२ | श्रीमती गजरे वैजयंता निवृत्ती | सहाय्यक शिक्षक (परिविक्षाधीन ) | हिंदु- चांभार एस.सी. | एच.एस.सी. डी.टी.एड. | जा.न.एसएसएस/इं.मि.स्कुल/ ३३२१/२०११ दि.२९.०९.२०१० हजर तारीख:- ११ नोव्हें.२०११ |

शाळेकडे सध्या असलेल्या वर्ग / तुकडया तसेच मागील तीन ते चार वर्षापासून वाढती विद्यार्थी संख्या लक्षात घेता, सदर सहाय्यक शिक्षकांची (परिविक्षाधीन) प्रत्येक वर्षी नियमीतपणे आवश्यकता भासणार आहे. तसेच सदरचे सहाय्यक शिक्षक (परिविक्षाधीन) हे जाहिरातीद्वारे व लेखी तोंडी परिक्षा घेवून, मुलाखत घेवून भरलेले आहेत. सध्या हे शिक्षणसेवक शाळेकडे कार्यरत असून त्यांचे काम समाधानकारक आहे. शासनाने वेळोवेळी ठरवून दिलेल्या मानधनाप्रमाणे त्यांना मानधन देण्यात येते परंतू त्यांची नेमणूक शैक्षणिक वर्ष २०११-१२ मध्ये दि. ३० एप्रील २०१२ पर्यंतच करण्यात आलेली होती. पुढील शैक्षणिक वर्ष २०१२-१३ साठी या सहाय्यक शिक्षकांची (परिविक्षाधीन) आवश्यकता लागणार असून त्यांना पुढे नेमणूक द्यावी लागणार आहे. प्रत्येक शैक्षणिक वर्षात मा. व्यवस्थापन समितीची मान्यता घेवून सहाय्यक शिक्षकांना (परिविक्षाधीन) नव्याने

नियुक्ती द्यावी लागते. सदर सहाय्यक शिक्षकांची (परिविक्षाधीन) ११ महिन्यांची नेमणूक दिल्याने त्यांचे सेवेत खंड पडल्याचे दिसून येते व यामुळे त्यांचे वार्षिक सेवेचे नुकसान होत असल्याचे दिसून येते.

महाराष्ट्र शासन निर्णय क्रमांक एसएसएन १०९९/(३४०/९९) माशि-२ दि. १३.आक्टोबर २००० नुसार सहाय्यक शिक्षकांची (परिविक्षाधीन) नेमणूक ३ वर्षासाठी करावयाची आहे. उपरोक्त २ सहाय्यक शिक्षकांचे (परिविक्षाधीन) काम समाधानकारक असून वाढत्या वर्गसंख्यामुळे त्यांची आवश्यकता आहे. तरी वरील २ सहाय्यक शिक्षकांना (परिविक्षाधीन) त्यांचे कामावर हजर झालेच्या तारखेपासून पुढे सलग ३ वर्षासाठी नवीन पदनाम नुसार सहाय्यक शिक्षक (परिविक्षाधीन) म्हणून नेमणूक देणेबाबत मान्यतेसाठी सादर.

**निर्णय क्र.४३५** **यावर सविस्तर चर्चा होऊन, महाराष्ट्र शासन निर्णय क्रमांक एसएसएन १०९९/(३४०/९९) माशि-२, दि. १३ आक्टोबर २००० नुसार श्री.पवार शेखर गुलाब व श्रीमती गजरे वैजयंता निवृत्ती या दोन सहाय्यक शिक्षकांची (परिविक्षाधीन) काम समाधानकारक असून वाढत्या वर्गसंख्यामुळे त्यांची आवश्यकता असल्याने त्यांना कामावर हजर झालेच्या तारखेपासून पुढे सलग ३ वर्षासाठी नवीन पदानामा नुसार सहाय्यक शिक्षक (परिविक्षाधीन) नेमणूक देणेस मान्यता देणेत आली.** (कार्यवाही- प्राचार्या, इंग्लिश मिडीयम स्कुल)

---

**विषय नं.३४** **टीव्ही चॅनेलवरील श्रींचे ऑनलाईन दर्शन तथा आरती सुविधेबाबत.**

**प्रस्ताव-** टिव्ही चॅनेलवर श्रींचे ऑनलाईन दर्शन-तथा-आरती सुविधेचे सिग्नल विविध टिव्ही चॅनेल यांना देणेकामी मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक २८/०८/२०११ रोजीचे सभेतील निर्णय क्र. ६६२ नुसार मार्च, २०१२ पर्यंत येणाऱ्या सर्व प्रस्तावांसाठी Non-Exclusive स्वरुपात रॉयल्टीचे खालीलप्रमाणे दर ठरविण्यात आलेले होते.

| अ.नं. | तपशिल | सन २०११-२०१२<br>या आर्थिक वर्षाचे दर (रुपये) |
|---|---|---|
| ०१ | काकड आरती | ८ लाख |
| ०२ | इतर सर्व आरत्यांसाठी प्रती आरती | ५ लाख |
| ०३ | सर्व आरत्या व संपूर्ण दिवसाचे लाईव्ह दर्शन | २३ लाख |

सन २०१२-२०१३ या अर्थिक वर्षात (दिनांक ०१/०४/२०१२ ते दिनांक ३१/०३/२०१३) श्रींचे लाईव्ह दर्शन सुविधेसाठी येणाऱ्या सर्व प्रस्तावांसाठी दर निश्चीत करणे आवश्यक आहे. त्यानुसार श्रींचे लाईव्ह दर्शन सुविधेसाठी सन २०१२-२०१३ या अर्थिक वर्षासाठी (दि. ०१/०४/२०१२ ते दि. ३१/०३/२०१३) पूर्वीचे दरांमध्ये किमान १० % वाढ करावी, तसेच सदर कालावधी येणाऱ्या सर्व प्रस्तावांसाठी मा. कार्यकारी अधिकारी सो. यांची मान्यतेने श्रींचे लाईव्ह दर्शन सुविधा सुरु करणेस मान्यता असावी, असे नम्र मत आहे.

तरी, टिव्ही चॅनेलवर श्रींचे ऑनलाईन दर्शन-तथा-आरती सुविधेचे सिग्नल विविध टिव्ही चॅनेल यांना २०१२-२०१३ या अर्थिक वर्षासाठीचे दर ठरविणेसाठी सदर प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सविनय सादर.

**निर्णय क्र.४३६** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्रींचे लाईव्ह दर्शन सुविधेसाठी सन २०१२-२०१३ या अर्थिक वर्षासाठी (दि. ०१/०४/२०१२ ते दि. ३१/०३/२०१३) पूर्वीचे दरांमध्ये किमान १०% वाढ करण्यात यावी, तसेच सदर कालावधीत येणाऱ्या सर्व प्रस्तावांसाठी मा. कार्यकारी अधिकारी यांचे मान्यतेने श्रींचे लाईव्ह दर्शन सुविधा सुरु करणेत यावी, असे ठरले.** (कार्यवाही- आय.टी.विभागप्रमुख)

---

**विषय नं.३५** **साधना टी.व्ही चॅनेलवरील श्रींचे ऑनलाईन आरती सुविधेची नोंद घेणे बाबत.**

**प्रस्ताव-** मा. व्यवस्थान समितीचे दिनांक ०७/०८/२०१० रोजीचे सभेतील निर्णय क्र. ६१२ नुसार Sadhna Media (P) Ltd., New Delhi यांना टिव्ही चॅनेलवर श्रींचे ऑनलाईन दर्शन-तथा-आरती सुविधेचे सिग्नल एक वर्षाचे कालावधीसाठी देण्यात आलेले होते. त्याची मुदत दिनांक ०४/०३/२०१२ रोजी संपलेली आहे. मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक २८/०८/२०११ रोजीचे सभेतील निर्णय क्र. ६६२ नुसार काकड आरतीसाठी रक्कम रुपये ८ लाख व इतर आरत्यांसाठी प्रती आरती रक्कम रुपये ५ लाख तसेच सर्व आरत्या व पूर्ण दिवसाचे दर्शन यासाठी एकत्रीत स्वरुपात प्रतिवर्षी रुक्कम रुपये २३ लाख मात्र Non-Exclusive स्वरुपात रॉयल्टी आकरण्यात यावी असे ठरलेले आहे. Sadhna Media (P) Ltd., New Delhi यांनी काकडआरती व धुपआरतीचे सिग्नल पुढील एक वर्षा करीता मिळणेस दिनांक २४/०२/२०१२ रोजीचे ई-मेल अर्जानुसार विनंती केलेली होती.

दिनांक २८/०८/२०११ रोजीचे मा. व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय क्र. ६६२ चे अधिन राहून Sadhna Media (P) Ltd., New Delhi यांना एक वर्षा करीता काकडआरती व धुपआरतीचे लाईव्ह सिग्नल देणेसाठी कार्यादेश देण्यात आलेला आहे. त्यापोटी घेण्यात येणाऱ्या रॉयल्टीचे रक्कम रुपये १३ लाखपैकी पहिले तिमाही हप्त्याची रक्कम रुपये ३,२५,०००/- त्यांनी संस्थानचे स्टेट बँकेच्या ३०६३०८९६८०१ या खात्यावर दिनांक २३/०३/२०१२ रोजी जमा केलेली आहे.

उपरोक्त नमूद केलेप्रमाणे Sadhna Media (P) Ltd., New Delhi यांना काकड आरती व धुपआरतीचे सिग्नल दिनांक ०५/०३/२०१२ पासून एक वर्षाचे कालावधीसाठी दिलेले आहे. नोंद घेणेसाठी सविनय सादर.

**निर्णय क्र.४३७ यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे Sadhna Media (P) Ltd., New Delhi यांना काकड आरती व धुपआरतीचे सिग्नल दिनांक ०५/०३/२०१२ पासून एक वर्षाचे कालावधीसाठी दिलेले आहे. त्याची नोंद घेणेत आली.** (कार्यवाही- आय.टी.विभागप्रमुख)

---

**विषय नं.३६ संस्थान वेबसाईट अपलोड करणेसाठी वापरण्यात येणाऱ्या विविध सॉफ्टवेअरच्या लायसेन्स कॉपी खरेदी करणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थानची **www.shrisaibabasansthan.org/www.sai.org.in** या नावाने वेबसाईट दिनांक १९ नोव्हेंबर, १९९८ पासून ऑनलाईन आहे. आपल्या वेबसाईटवर वेळोवळी करण्यात येणाऱ्या बदलामुळे तसेच श्रींचे ऑन लाईन दर्शन व ऑनलाईन सर्व्हिसेस वेबसाईटवर उपलब्ध झाल्यामुळे साईभक्तांकडून वेबसाईटला अतिशय चांगल्या प्रमाणात प्रतिसाद मिळत आहे. आपल्या वेबसाईटला दररोज दहा ते बारा हजार साईभक्त भेट देतात.

संस्थानची वेबसाईट अधिकाधिक लोकप्रिय होणेसाठी त्यात खालील प्रमाणे बदल करणेत यावे, असे मा. के.व्ही. रमणी यांनी त्यांचे दि.२१/०२/२०१२ रोजीचे ई-मेलव्दारे कळविले होते.

1.Change Management of Trustees to Management.
2.Add 360 Degree view below Sai picture.
3.Push down News & events.
4.Delete Links at the bottom of the Home page.
5.In ALL pages, use the same Top Menu as in Home page.
6.In all pages, use the left Menu specific to selections within the page only.
7.Do you need to buy the software for audio/video conversion? Pl. let me know ASAP.

अ.नं. ५ व ६ नुसार बदल करावयाचे झाल्यास पूर्ण वेबसाईटमध्ये बदल होतो. संस्थानची वेबसाईट ही ५ जीबी इतका डाटा व ६२५० पेजेस वेबसर्व्हरवर आहे. सदर बदल केल्यास सध्याच्या वेबसाईटचा User enterspace बदलून पूर्ण वेबसाईट अद्ययावत होईल. वेबसाईट इंटरनेटवरती अपलोड करणेकरीता जे साफ्टवेअर वापरण्यात येते. त्याची लायसन्स कॉपी संस्थानकडे असणे आवश्यक आहे. लायसन्स कॉपी नसल्यास संबंधीत सॉफ्टवेअरची कंपनी संस्थानवर कायदेशीर कारवाई करण्याची शक्यता नाकारता येत नाही. यासाठी खालीलप्रमाणे सॉफ्टवेअर खरेदी करणे आवश्यक आहे.

| SR.NO. | PATRICULAR | QTY. | PRICE(approx.) |
|---|---|---|---|
| 1 | Adobe creative suite 6 web premium | 1 | 124750/-+tax |
| 2 | Corel draw graphics suite x5. | 1 | 30000/-+tax |
| 3 | MS Office 2010 | 1 | 9400/- +tax |
| 4 | Bluray Drive with 100 disc(monthly backup website) | 1 | 35850/-+tax |
| | | Total | 200000/- |

सदरकामी सॉफ्टवेअर हे साईटेकमध्ये समाविष्ट नाही. यामूळे वरील नमूदप्रमाणे सॉफ्टवेअर खरेदीकरणे आवश्यक आहे.

उपरोक्त नमूद केलेप्रमाणे संस्थान वेबसाईटच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने उपरोक्त सॉफ्टवेअर विविध पुरवठादारांकडून ई-मेलव्दारे दरपत्रके मागवून न्यूनतम दरपत्रकधारकाकडून खरेदी करणेस व त्यासाठी येणारे अंदाजे रूपये दोन लाख मात्र अधिक टॅक्स पर्यंतचे खर्चास मान्यता मिळणेस सदर प्रस्ताव त्रिसदस्य समितीचे सभेपुढे सविनय सादर.

**निर्णय क्र.४३८ यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थान वेबसाईट अपलोड करणेसाठी वापरण्यात येणाऱ्या विविध सॉफ्टवेअरच्या लायसेन्स कॉपी खरेदी करणेकामी प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे सॉफ्टवेअर विविध पुरवठादारांकडून ई-मेलव्दारे दरपत्रके मागवून दरपत्रकधारकांकडून खरेदी करणेस व याकामी येणारे अंदाजे रूपये दोन लाख मात्र अधिक टॅक्स पर्यंतचे खर्चास मान्यता देणेत आली.**

(कार्यवाही- आय.टी.विभागप्रमुख)

---

**विषय नं.३७ पोलिस कामगार निधीचा शिर्डी येथील पेट्रोल पंप चालविणेबाबत मा.पोलिस अधिक्षक, अहमदनगर यांचे दि.२३.०५.२०१२ रोजीचे पत्रावर निर्णय घेणे.**

**प्रस्ताव-** दि.१४/१/२०१२ रोजी झालेल्या मा.व्यवस्थापन समितीचे सभेत जिल्हा पोलीस कल्याण निधीचा शिर्डी येथील पेट्रोलपंप संस्थानने चालविणेस घेणेबाबत सविस्तर चर्चा झाली व चर्चाअंती निर्णय क्र.१५८ नुसार खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात आला आहे.

"आजच्या सभेत पोलीस उपअधिक्षक मा.श्री.श्रीकांत जावळे हे उपस्थित होते त्यांच्याशी झालेल्या समक्ष चर्चेत श्री साई संस्थान ऍम्प्लॉईज क्रेडीट को.ऑप सोसायटी ही संस्था श्री साईबाबा संस्थान कर्मचाऱ्यांचीच संस्था आहे व तो पेट्रोलपंप चालविण्यास तयार आहे. त्यावर श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को.ऑप सोसायटी,शिर्डी यांना पेट्रोलपंप चालविण्यास देण्यात यावा, असे पोलीस विभागास कळविण्यात यावे, असे ठरले".

त्यानुंसार संस्थान कार्यालयाचे पत्र जा.नं.एसएसएस/वशी वाहन/६१०५/२०१२ दि.०५/०३/२०१२ नुसार मा.उपविभागीय पोलीस अधिकारी शिर्डी विभाग शिर्डी यांना सदरचा पेट्रोलपंप श्री साईबाबा संस्थान ऍम्प्लॉईज क्रेडीट को.ऑप सोसायटी, शिर्डी यांना चालविणेत देणेत यावा, असे कळविणेत आले असून या पत्राची प्रत मा.कक्ष अधिकारी, गृहविभाग, मंत्रालय, मुंबई -३२ तसेच मा.पोलीस अधीक्षक, अहमदनगर यांना देण्यात आलेले आहे

तसेच संस्थान कार्यालयाचे जा.नं.एसएसएस/वशी वाहन/६५४४/२०१२ दि.२६/३/२०१२ नुसार मा.अध्यक्ष श्री साईबाबा संस्थान ऍम्प्लॉईज क्रेडीट को.ऑप,सोसायटी, शिर्डी यांना पेट्रोलपंप चालविणेस घेणे प्रकरणी पुढील कार्यवाहीसाठी कळविण्यात आलेले आहे व या पत्राच्या प्रती मा.कक्ष अधिकारी, गृहविभाग, मंत्रालय, मुंबई- ३२, मा.पोलिस अधिक्षक, अहमदनगर व मा. उपविभागीय पोलिस अधिकारी, शिर्डी यांना कळविणेत आलेले आहे.

आता मा.पोलिस अधिक्षक, अहमदनगर यांनी त्यांचे दि.२३.०५.२०१२ रोजीचे पत्रात "महाराष्ट्र शासनाने परवानगी दिलेप्रमाणे अटी/ शर्तीनुसार संस्थानने सदरचा पेट्रोलपंप ताब्यात घेऊन सुरु करावा. या पेट्रोलपंपावर मासिक वेतनावर कर्मचाऱ्यांची नेमणूक करावी व नेमणूक केलेल्या कर्मचाऱ्यांचे मासिक वेतन, लाईटबील व इतर आवश्यक बाबींवर होणारा खर्च वजा करता संपुर्ण ताळमेळांचा अहवाल देऊन मिळणाऱ्या उत्पन्नातून शिल्लक राहणारी रक्कम पोलिस कल्याण निधीमध्ये जमा करण्यास हरकत नाही. त्यामुळे कल्याणकारी उपक्रमास संस्थानचा हातभार लागेल आणि संस्थानला नफा मिळणारे उपक्रम चालविता येत नाही हा मुद्दा राहणार नाही", असे कळविलेले आहे.

मा.पोलिस अधिक्षक, अहमदनगर यांचे सदरचे पत्र अवलोकनार्थ सोबत सादर केले आहे. तरी सदर पत्रावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.४३९** **यावर सविस्तर चर्चा होऊन, पोलीस कल्याण निधीचा शिर्डी येथील पेट्रोलपंप चालविणेबाबत मा.पोलिस अधिक्षक, अहमदनगर यांनी दिलेल्या दिनांक २३.०५.२०१२ चे पत्राची नोंद घेण्यात आली. तसेच याबाबत सुरुवातीपासून झालेला पत्रव्यवहार, संस्थानने याकामी कुणाचा सल्ला घेतला त्याबाबत त्यांनी दिलेले अभिप्राय वगैरे बाबींसह सविस्तर प्रस्ताव पूढील सभेपूढे सादर करावा असे ठरले.** (कार्यवाही-वाहन विभागप्रमुख)

---

**विषय नं.३८** **झेरॉक्स मशिन मॉडेल नं.७५५६ करीता टोनर कार्टेज खरेदी करणे बाबत.**

**प्रस्ताव-** संस्थान कामासाठी पाकीटे प्रिंटींग, कलर झेरॉक्स, स्टॅपलिंग, पंचिंग अशा प्रकारच्या सुविधा असलेले झेरॉक्स कंपनीचे झेरॉक्स मशीन मॉडेल ७५५६ दि.०२/०२/२०१२ रोजी (किंमत रुपये-८.४० लाख) देणगी घेतलेले आहे.

सदरचे मशीनवर श्री रामनवमी उत्सवाच्या ५८ हजार निमंत्रण पत्रिकांवर भक्तमंडळाचे पत्ते व इतर झेरॉक्स असे एकुण ७२ हजार झेरॉक्स प्रती झालेल्या आहेत. याकरीता मशीनबरोबरचे एक टेस्टींग टोनर व एक नविन विकत घेतलेले टोनर वापरले आहे. आता दोन्ही टोनर कार्ट्रेज संपलेले आहेत.

ओम साई मार्केटींग औरंगाबाद, यांचेकडुन एक टोनर कार्ट्रेज किंमत रुपये ८,४००/- (व्हॅटसह) विकत घेतले होते.

झेरॉक्स मशीनचे सन २०१२-२०१३ साठी लागणारे साहीत्य खरेदी विभागामार्फत वार्षिक खरेदीमध्ये घेणार आहोत. मात्र वार्षिक खरेदीस अजुन बराच अवधी लागणार आहे.

माहे मे महीन्यात श्री गुरुपौर्णिमा उत्सवाचे निमंत्रण पत्रिकांवर पत्ते प्रिंट करण्याचे काम चालु होणार आहे. त्यासाठी १.६० लाख पत्ते प्रिंट करणेसाठी साधारण ४ टोनर कार्ट्रेज लागणार आहे. (एका टोनरमध्ये साधारण ४० हजार झेरॉक्स) व दैनंदीन कामासाठी २ असे एकूण ६ टोनर कार्ट्रेज खरेदी करण्यास व त्यासाठी रु.५०,०००/- (रुपये-पन्नास हजार मात्र.) इतक्या खर्चास मान्यता असावी, ही विनंती.

सहा टोनर कार्ट्रेज खरेदी करण्यास व त्यासाठी रु.५०,०००/- (रुपये-पन्नास हजार मात्र.) इतक्या खर्चास मान्यता असावी.

**निर्णय क्र.४४०** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे झेरॉक्स मशिन मॉडेल नं.७५५६ करीता ६ नग टोनर कार्टेज खरेदी करणेस व याकामी येणारे अंदाजे रक्कम रु.५०,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देणेत आली.** (कार्यवाही- प्रशासन शाखा वशी- १२)

---

**विषय नं.३९** **फ्रँकीग मशिनकरीता कार्टेज खरेदी करणे बाबत.**

**प्रस्ताव-** सामान्य प्रशासन जावक विभागाकडे डिजीटल फ्रँकिंग मशिन खरेदी करण्यात आले असून दैनंदिन पोष्टेज फ्रँकिंग करणेकामी काट्रेज व इंक (इंक टेक) ची आवश्यकता असते. सदर कारट्रेज मे कोरस इंडिया लि.कं.पुणे यांचेकडेच उपलब्ध असल्याने सदर कारट्रेज त्यांचेकडूनच खरेदी करावे लागते. सदर कारट्रेज मर्यादा ४५,००० पर्यंत आहे.

दैनंदिन पोष्टेज कामाकरीता तसेच श्री रामनवमी उत्सव- २०१२ निमंत्रण व उदीप्रसाद एकत्र भक्तमंडळ सभासदांना वेळेत पाठविणे गरजेचे असून अडचण येऊ नये म्हणून मे.कोरस इंडिया लि.पुणे यांचेकडून ०४ कारट्रेज मागवून दैनंदिन पोष्टेज काम व उत्सव १,५९,२६१ श्री रामनवमी उत्सव व निमंत्रण पत्रिका व उदीप्रसाद एकत्रित पाठविण्यात आला आहे.

सदरचे ०४ कारट्रेज बिलाची रक्कम रु.६९,५५२/- (व्हॅटसह) मे.कोरस इंडिया लि.पुणे यांना आदा करावी लागणार आहे. तसेच येथूनपुढे कारट्रेज व इंक खरेदी विभागामार्फत वार्षिक मागणी करता येईल.

तरी मे.कोरस इंडिया लि.पुणे यांचे बिलाची रक्कम रु.६९५५२/- (व्हॅटसह) यांना आदा करणेकामी कार्योत्तर मान्यता असावी.

**निर्णय क्र.४४१ यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे फ्रँक्रींग मशिनकरीता कार्टेज मे.कोरस इंडिया लि., पुणे यांचेकडून खरेदी करणेस व याकामी येणारे अंदाजे रक्कम रु.६९,५५२/- (व्हॅटसह) मात्रचे खर्चास मान्यता देणेत आली.** (कार्यवाही- प्रशासन शाखा वशी- १२)

---

**विषय नं.४० फँक्रींग मशिन करिता कारट्रेज व इंक टँक खरेदी करणेबाबत.**

**प्रस्ताव-** संस्थानचा पत्रव्यवहार पोष्टाव्दारे पाठविणेकामी नवीन फ्रॅकिंग मशिन IJ९० खरेदी करण्यात आले असुन संस्थानचे दैनंदिन पोष्टेज टपालासाठी तसेच श्री रामनवमी, श्री गुरुपोर्णिमा, श्री पुण्यतिथी उत्सव असे तीनही उत्सवाचे निमंत्रण पत्रिका व उदीप्रसाद भक्तमंडळाच्या सभासदांना पाठविण्यात येत असतो. सदर फ्रॅकिंग मशिन करीता कारट्रेज व इंक टँक ची आवश्यकता असते. सदर उत्सव व दैनंदिन पोष्टेज टपालाकरीता १ कारट्रेज करीता १६५६०+व्हॅट ५% व १इंक टँक १८०००/- + व्हॅट ५% असे एकुण वार्षिक रक्कम रुपये खर्च अपेक्षित आहे. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे. ( वार्षिक खर्च )

| अ.क्र. | तपशिल | नग | दर प्रती नग | एकुण |
|---|---|---|---|---|
| ०१) | फ्रॅकिंग मशिन कारटेज | १२ | १७,३८८/- | २,०८,६५६/- |
| ०२) | फ्रॅकिंग मशिन इंक टँक | ०६ | १८,९००/- | १,१३,४००/- |
| | | | एकुण अपेक्षित अंदाजे खर्च- | ३,२२,०५६/- |

सदरचा खर्च खरेदी विभागाकडे असलेले या वर्षीचे अंदाजपत्रकीय तरतुदीमधुन करता येईल. तरी सदरचे कारट्रेज व इंक टँक विहीत पध्दतीने खरेदी विभागामार्फत खरेदी करण्यास प्रशासकीय मान्यता असावी.

**निर्णय क्र.४४२ यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे फँक्रींग मशिन करिता कारट्रेज व इंक टँक विहीत पध्दतीने खरेदी विभागामार्फत कोटेशन मागवून खरेदी करणेस व याकामी येणारे अंदाजे रक्कम रु.३,२२,०५६/- मात्रचे खर्चास प्रशासकीय मान्यता देणेत आली.** (कार्यवाही- प्रशासन शाखा वशी- १२)

---

**विषय नं.४१ श्रावण मासानिमित्त श्री साई सच्चरित पारायण सोहळा आयोजित करणेबाबत.**

**प्रस्ताव-** नाटय रसिक संच शिर्डी यांनी दिनांक २१/०५/२०१२ चे पत्राने या वर्षी श्रावण शुध्द प्रतिपदा ते श्रावण शुध्द दशमी शके १९३४, म्हणजे शुक्रवार, दि.२०/०७/२०१२ ते वार शनिवार , दि.२८/०७/२०१२ अखेर साजरा करणे करीता परवानगी मागणी केलेली असून यापत्रात संस्थानमार्फत खालील बाबीवर खर्च करणेस विनंती केलेली आहे.

१) वाचकासाठी प्रशस्त, सुसज्ज मोठा हॅाल किंवा भक्कम असा भव्य मंडप पावसाळा असलेने मंडपात पाऊस गळणार नाही असा वरुन व कडेने बदिस्त मंडप
२) मंडप व स्टेज फुले डेकोरेशन
३) नियोजित किर्तनकार, कलाकार बिदागी, जाणे येण्याचे प्रवास खर्चासह
४) मिरवणुक खर्च बँड व वाद्य इत्यादी
५) पारायाणार्थीना चहा व नाष्टा
६) पत्रिका, हॅन्डबील , बॅनर इत्यादी छपाई
७) पारायण समाप्ती नंतर महाप्रसाद भंडारा खर्च,

(नाटय रसिक संच फक्त वाचकांचे नोंदणी व बॅचेचा खर्च करणार आहेत.)

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, (शिर्डी) अधिनियम २००४ चे कलम नं. १७(१) मध्ये खालीलप्रमाणे तरतुद आहे.

समितीची कर्तव्ये व अधिकार - १७.(१) राज्य शासनाच्या कोणत्याही सर्व साधारण किंवा विशेष आदेशास अधीन राहून संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्था पाहणे, मंदिरामध्ये रुढी व प्रथेनुसार धार्मिक विधी पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करण्यासाठी आणि पार पाडण्यासाठी योग्य ती व्यवस्था करणे, भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे आणि या अधिनियमान्वये विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालवावयाचा आहे, ती उद्दीष्टे साध्य करण्यासाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे, ही समितीची कर्तव्ये असतील.

१७. (२) ठ - श्री साईबाबांचे जीवन, त्यांचे कार्य, त्यांच्या लीला व त्यांची शिकवण याबाबतच्या उपयुक्त माहितीचा प्रचार व प्रसार करील आणि श्री साई साहित्य ग्रंथालय चालवील व त्याचा विस्तार करील.

त्यानुसार श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, (शिर्डी) नाट्य रसिक संच, शिर्डी यांचे मदतीने सन १९९५ पासून म्हणजेच गेल्या १७ वर्षापासून दरवर्षी सामुदायीक श्री साईसच्चरित पारायण सोहळा आयोजित केला जातो. यात सुमारे २,००० साईभक्त सहभाग घेत असतात. दर वर्षी पारायण सोहळयाची रुपरेषा खालील प्रमाणे असते.

१) दररोज सकाळी ७.०० ते ११.०० - साई सच्चरिताचे पारायण
२) दररोज दुपारी ४.०० ते ५.०० - प्रवचन
३) दररोज रात्रौ ७.३० ते ९.३० - निमंत्रीतांचे कीर्तन/ व्याख्यान/ इतर करमणुकीचे कार्यक्रम.
४) आठव्या दिवशी साईचरित्र ग्रंथाची गांवातुन शोभा यात्रा.
५) नवव्या दिवशी कालाकीर्तन व महाप्रसाद भंडारा.

मागीलवर्षी श्रावण मासानिमित्त आयोजित पारायण सोहळयास संस्थान मार्फत आलेला खर्च व यावर्षी पारायण आयोजित करावयाचे असल्यास या कामी संस्थानला येणारा अंदाजे खर्च याची तपशिलवार माहिती खालील प्रमाणे आहे.

| अ.नं. | तपशील | २०११ चा प्रत्यक्ष खर्च | चालू वर्षाचे कार्यक्रमासाठी अंदाजे खर्च |
|---|---|---|---|
| १. | मंडप व्यवस्था कमानी, स्टेज सजावट व अनुशंगीक खर्च | ४,२०,५००.०० | ५,२०,०००.०० |
| २. | निमंत्रण पत्रिका हॅन्डबील छपाई खर्च, रांगोळी, प्लॉऊड व फलेक्स बोर्ड | ६०,५१४.०० | ७०,०००.०० |
| ३. | कलाकार बिदागी ( रंग व वेशभुषा मानधन ड्रेस भाडेसह | २,२३,०७५.०० | २,५०,०००.०० |
| ०४. | प्रसाद खर्च (आचारी मंजुरीसह ) | २,६०,६२४.०० | ३,००,०००.०० |
| | **एकूण खर्च** | **९,६४,७१३.००** | **११,४०,०००.००** |

मागील वर्षी श्रावण मासातील पारायण ग्रामास्थांचे आग्रहास्तव १६ गुंठे जागेत घेण्यात आले होते. ३५०० वाचक बसले असता तेथे जागेची अडचण निर्माण झाली होती. यावर्षी पारायणार्थीचे सख्येत वाढ होण्याची शक्यता आहे.

१) सन १९९५ साली दिक्षीत वाडयाच्या सभागृहात झाले. १९९६ पासून ते सन २००६ पर्यंत ४ नंबर गेटचे परीसरात आयोजीत करण्यांत येत असे.

२) साईभक्ताच्या संख्येत वाढ झालेने त्याच्या जाणेयेणेस जागा अपूरी पडत सन २००७ पासून १६ गुंठे जागेत आयोजीत करणेत येत होते.

३) भक्तांच्या संख्येत दिवसेदिवस लक्षणीय स्वरुपात वाढत असलेने तसेच २०१० मध्ये मंडप कोसळल्याने साईप्रसादालयाचे हॉलमध्ये आयोजीत केले होते.

खालील बाबीवर निर्णय होणेस विनंती

१) उपरोक्तप्रमाणे श्रावण मासातील पारायण आयोजीत करणे निर्णयास्तव तसेच पारायण घेणे निश्चीत झालेस या कामी संस्थानला येणारे अंदाजे रु ११,४०,०००/-चे खर्चास तसेच पारायणाची जागा निश्चीत होणे आवश्यक आहे.

२) मागील वर्षाप्रमाणे पारायणासाठी १६ गुंठेची जागा निश्चीत करणे असल्यास त्या जागेत पारायणार्थी बसू शकतील तसेच भक्ताचे जाणे येणेसाठी पुरेसी जागा राहील याबाबी विचारात घेता पारायणार्थीची कमाल संख्या निश्चीत करणे.

३) इच्छूक पारायणर्थीना पारायणासाठी बसण्याची व्यवस्था करणे असल्यास साईनगर अगर दुस-या मोठया जागेवर मंडप टाकणे.

४) जागा निश्चीतीबाबत तसेच पारायणार्थीची कमाल संख्या निश्चित करणे्बाबत नाटयरसिक संचाचे पदाधिका-यांची सभा आयोजीत करावी किवा कसे?

५) अंदाजे खर्च रु ११,४०,०००/- (रु अकरा लक्ष चाळीस हजार मात्र) चे खर्चास मंजूरी मिळणे.

तरी उपरोक्त प्रमाणे श्रावण मासातील पारायण आयोजित करणे बाबत निर्णयास्तव तसेच पारायण घेणे निश्चीत झालेस या कामी संस्थानला येणारे अंदाजे रु. ११,४०,०००/- चे खर्चास मान्यता असावी

**निर्णय क्र.४४३ यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे दि.२०.०७.२०१२ ते दि.२८.०७.२०१२ अखेर श्रावण मासानिमित्त श्री साई सच्चरित पारायण सोहळा संस्थानमार्फत आयोजित करणेस व याकामी येणाऱ्या अंदाजे रक्कम रु. ११,४०,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देणेत आली. याबाबत जागा निश्चिती, संख्या निश्चिती वगैरे निर्णय घेण्याचे अधिकार त्रिसदस्यीय समितीचे सदस्य तथा मा.कार्यकारी अधिकारी यांना प्रदान करण्यात आले.** (कार्यवाही- प्रशासन शाखा, वशी- ०५)

---

**विषय नं.४२ श्री रामनवमी उत्सव- २०१२ अंदाजपत्रकातील सर्व बाबींवर कमी झालेल्या खर्चास मान्यता मिळणे बाबत.**

**प्रस्ताव-** श्री रामनवमी उत्सव २०१२ मधील खर्चाकरीता मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक १९/०२/२०१२ चे सभेतील निर्णय क्रं.२४९ अन्वये एकूण रु. ६७,००,०००/- चे अंदाजपत्रकास मान्यता मिळालेली आहे.

प्रत्यक्षात मात्र अंदाजीत खर्चापेक्षा सर्व बाबीवर कमी खर्च झालेला आहे. त्याचा अहवाल खालीलप्रमाणे आहे.

| अ.नं. | तपशील | मा.व्य.समितीने मंजूर केलेली रक्कम | प्रत्यक्ष खर्च | तरतुदी पेक्षा जादा खर्च | तरतुदीपेक्षा कमी खर्च |
|---|---|---|---|---|---|
| १ | मंडप, कमानी, गादीभाडे, स्टेज, उन्हाळी मंडपासह व पाणपोई इ. | १६००००0.00 | १२१६३९०.०० | ०.०० | ३८३६१०.०० |
| २ | कलाकार बिदागी, | ८०००००.०० | १३५,३७२.०० | ०.०० | ६६४६२८.०० |
| ३ | भक्तांना मिष्टान्न मजूरीसह | ६१००००.०० | ३७८,२७९.०० | ०.०० | २३१७२१.०० |
| ४ | विद्युत रोषणाई | ९०००००.०० | ३४१,२०८.०० | ०.०० | ५५८७९२.०० |
| ५ | निमंत्रणपत्रिका, उदीप्रसादासह पोष्टेज, जाहिरात, बॅनर | १६००००0.00 | ८५४३४३.०० | ०.०० | ७४५६५७.०० |
| ६ | जादा कामगार | २९००००.०० | १००,६०७.०० | ०.०० | १८९३९३.०० |
| ७ | इतर खर्च - मंदिर रंगकाम, कुस्त्या, लस्सी, मंदिर प्रसाद, कावडी, जादा फर्निचर, गेस्ट हाऊस, व्ही.डी.ओ. शुटींग, पेंटर बिले, पोलीस स्टेशन इंधन बीलासह. | १०००००.०० | ३१,९८३.०० | ०.०० | ६८०१७.०० |
| ८ | पालख्या, पिण्याचे पाणी इ. | ५०००००.०० | २२,८३२.०० | ०.०० | ४७७१६८.०० |
| ९ | कुस्ती हगामा | ३०००००.०० | २६३४००.०० | ०.०० | ३६६००.०० |
| | **एकूण-** | **६७००००००.००** | **३३४४४१४.००** | ०.०० | ३३५५५८६.०० |

उपरोक्त तपशिल पाहता-

श्री रामनवमी उत्सव २०१२ करीता एकूण ६७,००,०००/- (अक्षरी रुपये सदुसष्ट लाख मात्र) अंदाजपत्रकीय तरतूद करण्यात आलेली होती. या उत्सवा करीता प्रत्यक्षात एकूण रु ३३,४४,४१४/- (अक्षरी रुपये तेहतीस लाख चौरेचाळीस हजार चारशे चौदा मात्र ) खर्च झालेला आहे

तरी सदर उत्सवाकरीता उपरोक्त तपशिलप्रमाणे झालेल्या एकूण रु ३३,४४,४१४/- (अक्षरी रुपये तेहतीस लाख चौरेचाळीस हजार चारशे चौदा मात्र ) चे खर्चास मान्यता मिळणेस विनंती आहे.

**निर्णय क्र.४४४ यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावाची नोंद घेण्यात येऊन मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- प्रशासन शाखा, वशी- ०५)

---

**विषय नं.४३ श्री गुरुपौर्णिमा उत्सव-२०१२ किर्तनकार व कलाकार निश्चित करणे, बिदागी निश्चिती करणे बाबत**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिरडी तर्फे श्री गुरुपौर्णिमा उत्सव २०१२ हा दि.२/०७/२०१२ ते दि.०४/०७/२०१२ अखेर तीन दिवस साजरा होणार आहे.

**अ) <u>कीर्तन कार्यक्रम :-</u>**

उत्सवात ३ दिवस नारदीय पध्दतीने किर्तन कार्यक्रम होत असतात. मागील रामनवमी उत्सवात ३ दिवसाचे किर्तनासाठी रु. ९००१/- बिदागी देण्यात आलेली होती. खालील ४ कीर्तनकारांनी श्री गुरुपौर्णिमा उत्सव- २०१२ मध्ये कीर्तन कार्यक्रम मिळावा म्हणून संस्थानकडे अर्ज केलेले आहेत, त्यांचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| अ.नं. | किर्तनकार नांव |
|---|---|
| १ | ह.भ.प. मंदार गंगाधर व्यासबुवा,<br>साई सदन नं. १ / ३ रा मजला, जुना आयरे रोड, मढवी शाळेजवळ, डोंबिवली (पू) जि ठाणे.<br>फोन नं.०२५१-२४४४५१६ मो.९५९४२५६५७० / ९८६९६२८९८६ |
| २ | ह.भ.प. गंगाधर नरहर व्यासबुवा<br>साई सदन नं. १ / ३ रा मजला, जुना आयरे रोड, मढवी शाळेजवळ , डोंबिवली (पू) जि ठाणे.<br>फोन नं.०२५१-२४४४५१६ मो.९५९४२५६५७० / ९८६९६२८९८६ |
| ३ | ह.भ.प. माधवराव तुकारामपंत आजेगांवकर, श्री केशव कृपा, कौस्तुभ मंगल कार्यालय, श्री संत दासगणु नगर, कारेगांव रोड, परभणी ४३१ ४०१. मो.नं. ९४२१९८३०५१. |
| ४ | श्री मनुमहाराज कोकलेगांवकर<br>श्री.सदगुरु छाया, ३/३/१३९, चिखलवाडी, नांदेड-४३१६०१ मो.नं.९४२०६६७५४९ |

श्री मनुमहाराज कोकलेगांवकर, नांदेड यांना गुरुपौर्णिमा उत्सवात किर्तन कार्यक्रम द्यावा. याबाबत मंदिरपमुख श्री.रामराव शेळके यांनी दुरध्वनीवरुन कळविलेले आहे.

मागील उत्सवाप्रमाणे किर्तनकारास रु.९००१/- ( नऊ हजार एक मात्र ) मानधन देणेबाबत व उपरोक्त पैकी किर्तन कार्यक्रम कोणास द्यावा या बाबतचा निर्णय होणेस विनंती.

**ब) कलाकार कार्यक्रम :**

प्रत्येक उत्सवात तिन दिवस संगीत गायनाच्या कार्यक्रमाचे आयोजन संस्थान मार्फत करण्यात येत असते. गुरुपौर्णिमा-२०१२ चे उत्सवात खालीलप्रमाणे - १४ कलाकारांनी कार्यक्रम मिळणे बाबत अर्ज केलेले आहेत. त्यांची तपशिलवार माहिती खालील प्रमाणे आहे.

| अ.नं. | कलाकाराचे नांव | कार्यक्रम तपशील | कलाकार संख्या | बिदागी |
|---|---|---|---|---|
| १ | गुरु रेखाश्री कलाकृती डान्स ॲकेडमी डी-००२/००३, निरा कॉम्पेक्स, न्यू गोल्डन नेस्ट रोड, पोलीस चौकीच्या पाठीमागे, भायंदर (पुर्व ) जिल्हा-ठाणे | कार्यक्रम कथक नृत्याचा | २० | रु.४५,०००/- दोन तासाचा कार्यक्रम |
| २ | राम कोठेकर ( रेडिओ स्टार ) मु.पो.हिवरा आश्रम ( विवेकानंद आश्रम ता.मेहकर जि.बुलढाणा | गायन कार्यक्रम | ५ | रु.२०,०००/- दोन तासाचा कार्यक्रम |
| ३ | अनंत स.पांचाळ ( ढोलकीवादक ) १/११, हेंद्रे ( रुस्तम ) बिल्डींग गणपतराव कदम मार्ग, लोअर परेल मुंबई. ४०००१३ | श्री साईसरगम प्रस्तुत मुजरा घ्या साईनाथा भक्तीगीते, साईगीते, लोकगीते | १५ | **मानधनाचा उल्लेख नाही.** |
| ४ | श्री.विजया ज्योती, श्रीनिर्मला नृत्य निकेतन, ६-९३/१ संथीनगर, पेन्डूथ्री, विशाखापटणम् , आंध्रप्रदेश, ५३११७३<br>लिम्का रेकॉर्ड व ग्रिनींज रेकॉर्ड | नृत्याचा कार्यक्रम | २५ | **विनामूल्य** |
| ५ | मनोहर अजमेरी ( कव्वाल ) जयजवान नगर, सर्व्हे नं.१४, चाँदनी चौक, -बुध्द विहार जवळ , यरवडा पुणे. ४११००६ | साई कवालीचा कार्यक्रम | १० | संस्थान देईल ते मानधन |
| ६ | रविपाल सात खजेरीवाले राष्ट्रीय किर्तनकार मंगलादेवी,ता.मेहर,जि.यवतमाळ( विदर्भ ) | समाज प्रबोधनकार व किर्तन | ६ | संस्थान देईल ते मानधन |
| ७ | नरेंद्र अशोक काळे<br>१२८,समर्थ प्लाजा, चिंचवड पुणे-३३ | स्वामीची पालखी धार्मिक गीतांवर अधारीत गायनांचा कार्यक्रम. | १० | संस्थान देईल ते मानधन |
| ८ | डॉ.दिनेश वाघोलीकर मो.९८२२०५३८३४<br>स्वरसंगम, संगीत प्रसारक मंडळ, संगमनेर -४२२६०५ , जि.अहमदनगर<br>गुरुपौर्णिमा उत्सव २००७ ला हा कार्यक्रम झालेला आहे. | भागगीते, भक्तीगीते, जुन्या मराठी हिंदी गीतांचा कार्यक्रम. | | रु.२५००० ते ३००००/- |
| ९ | वनिता म्युजीकल ग्रुप<br>बी-२९१/सेक्टर-५६ केंद्रीय विहार, गुडगांव हरियाणा. | साईसंध्या | | संस्थान देईल ते मानधन |
| १० | वंदना राणे जोगी<br>अरोही फलॅट नं.७, प्लॉट नं.४,६ ,चेडानगर , चेंबुर (वेस्ट )<br>मुंबई ४०० ०८९ | भजनसंध्या | | मानधन २५०००/- |
| ११ | कृष्णानंद<br>६ब/ १६५/ गोपेशन कुंज, वृदांवन कॉलनी, रायबरेली रोड,लखनौ | साईभजन संध्या | ४ | ५००००/- रुपये प्रवास भाडेसह |
| १२ | प्रा.रविंद्र इंगळे ,<br>संगीत विभाग प्रमुख, कै.सौ.कमलताई जामकर महिला विदयालय, परभणी-४३१४१ | भजन सेवा | ८ ते १० | मानधनाचा उल्लेख नाही. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १३ | सौ.शुभांगी नितीन मुळे<br>९९७/१९, पूर्ती, सत्संग सोसायटी,नवी पेठ पुणे-४११०३० | भजनसंध्या | १० ते १२ | ३०,०००/-<br>मानधन |
| १४ | श्वेता चक्रव्रती<br>तपोवन ,ए १ए ,प्लेट न.७ कृष्णधाम, डब्लू व्ही.हायवे मालाड पूर्व मुंबई -४०००९७ | भजन कार्यक्रम | ४ | २१,०००/-<br>मानधन |

उत्सवाचे प्रत्येक दिवशी किमान एक कार्यक्रम या प्रमाणे तीन दिवशी किमान तीन कार्यक्रम आयोजित करणे अपेक्षित आहे. गुरुपौर्णिमा-२०१२ चे उत्सवाचे तीन दिवसाचे कालावधीसाठी उपरोक्तपैकी कलाकार व त्यांचे मानधन निश्चीती बाबत निर्णय होणेस विनंती.

निर्णय क्र.४४५ **यावर सविस्तर चर्चा होऊन श्री गुरुपौर्णिमा उत्सव २०१२ मध्ये खालीलप्रमाणे किर्तन व कलाकार कार्यक्रम निश्चित करण्यात आले.**

| अ. नं | कलाकारांचे नाव | दिनांक | कार्यक्रम | वेळ व ठिकाण | मानधन |
|---|---|---|---|---|---|
| १. | ह.भ.प. माधवराव तुकारामपंत आजेगांवकर ,परभणी | ०२/०७/२०१२<br>३/०७/२०१२<br>०४/०७/२०१२ | **कीर्तन**<br><br>**गोपालकाला कीर्तन व दंहीहंडी** | दुपारी ४.०० ते ६.००<br>दुपारी ४.०० ते ६.००<br>सकाळी १०.३० वा.<br>समाधी मंदिराशेजारील स्टेज. | **रु. ९,००१/-** |
| २. | श्री.विश्वनाथ ओझा, श्रीरामपूर | २/०७/२०१२ | **साईभजनसंध्या** | रात्रौ ७.३० ते १०.००<br>समाधी मंदिराशेजारील स्टेज. | प्रत्येक कलाकारांस शॉल, श्रीफळ व रुपये १ ची नाणी |
| ३. | साईगोपाल देशमुख, बीड | ३/०७/२०१२ | **साईबाबांचे संपूर्ण चरित्र व जीवनगाथा, गीत, नृत्य,नाटय** | रात्रौ ७.३० ते १०.००<br>समाधी मंदिराशेजारील स्टेज. | प्रत्येक कलाकारांस शॉल, श्रीफळ व रुपये १ ची नाणी |
| ४. | सौ.विजया ज्योती विशाखापटण् | ०४/०७/२०१२ | **नृत्याचा कार्यक्रम** | रात्रौ ७.३० ते १०.००<br>समाधी मंदिराशेजारील स्टेज. | प्रत्येक कलाकारांस शॉल, श्रीफळ व रुपये १ ची नाणी |

(कार्यवाही-प्रशासनशाखा वशी-५)

---------------------------------------------------------------------------------------------------------------**यानंतर मा.अध्यक्ष यांचे परवानगीने**

**आयत्या वेळेचे विषयावर चर्चा सुरु करण्यात आली.**

**आयत्या वेळेचा विषय नं.०१** **विश्वस्तांच्या सुचनांबाबत.**

**र्णिय क्र.४४६** मा.विश्वस्तांनी सभेत खालीलप्रमाणे सुचना मांडल्या त्या मान्य करण्यात आल्या-

**०१)** माहितीचे अधिकारात संस्थानचे विश्वस्त/अधिकारी व कर्मचारी विरुध्द विविध न्यायालयात केसेस दाखल करण्यात आलेल्या आहेत. या केसेसचे काम पहाण्यासाठी संस्थानचे वतीने वकिलाची नियुक्ती करुन त्याचा खर्च संस्थानमार्फत आदा करण्यात यावा. (कार्यवाही-विधी अधिकारी)

**०२)** श्री साईबाबा संस्थानच्या अन्नदान निधीमध्ये दिवसेंदिवस वाढ होत आहे. अन्नदान निधीमध्ये जमा होणारा निधी त्याच कारणासाठी खर्च होणे आवश्यक आहे. हा खर्च न केल्यास व ही रक्कम वाढीव प्रमाणात शिल्लक राहील्यास त्यावर टॅक्सेस लागण्याची शक्यता आहे. संस्थानने सुरु केलेल्या अन्नदान योजनेतून सद्य परिस्थितीत १२५ ते १५० दिवस मोफत प्रसादभोजन देण्यात येत आहे. याबाबीचा विचार करता संस्थानचे साईप्रसादालयात जनरल हॉलमध्ये प्रसादभोजन घेणाऱ्या भक्तांना विनामूल्य प्रसादभोजन देता येईल किंवा कसे? तसेच साईप्रसादालयाचे व्ही.आय.पी. कक्षामध्ये प्रसादभोजन घेणाऱ्या भक्तांसाठी प्रसादभोजनाचा दर रु.४०/- ऐवजी रु.५०/-करणे योग्य होईल किंवा कसे? याबाबत चर्चा झाली. हा निर्णय आर्थिकदृष्टया अत्यंत महत्वाचा असल्याने या बाबत सर्व बाबींचा सर्वांगीण दृष्टया सांगोपांग विचार करुन प्रस्ताव मा.व्यवस्थापन समिती सभेपुढे सादर करणेत यावा, असे ठरले.

(कार्यवाही- अधिक्षक, श्री साई प्रसादालय)

**०३)** श्री साईबाबा संस्थानच्या इंग्लिश मिडीयम स्कूल ज्युनिअर के.जी च्या एकूण ०६ तुकडयांमध्ये ३.३ ते ४.३ वर्षे या वयोगटातील, प्रत्येक तुकडीत ४५ विद्यार्थी याप्रमाणे ०६ वर्ग तुकडयांमध्ये एकूण २७० विद्यार्थ्यांना प्रवेश देण्याचे ठरलेले आहे. याशिवाय आणखी ०२ जादा विद्यार्थ्यांना प्रवेश देण्याबाबत चर्चा होऊन मान्यता देण्यात आली. (कार्यवाही- प्राचार्या, इंग्लिश मिडीयम स्कूल)

**०४)** मंदिरामध्ये चित्रीकरणाबाबत मागील व्यवस्थापन समितीने घेतलेल्या निर्णयाप्रमाणेच चित्रीकरणाबाबत पध्दत चालू ठेवावी. फक्त दैनंदिन VVIP च्या भेटींच्यावेळी संस्थानकडून शुटिंग करुन चित्रफीत चॅनेल्सना देण्यात यावी असे ठरले. (कार्यवाही-जनसंपर्क अधिकारी/ ध्वनीक्षेपन विभागप्रमुख)

**०५)** मंदिर व परिसराचे विस्तारीकरणासाठी मागील व्यवस्थापन समितीने मे.हफीज कॉन्ट्रॅक्टर यांचेकडून Plans मागविले होते. तथापि सदर प्लॅनचा अभ्यास करता, सदर प्लॅ्नमध्ये आपल्या गरजा पूर्ण होत नाहीत. याकामी मंदिर Architects कडून प्लॅन मागविणे आवश्यक आहे. श्री.कानविंदे, प्राचार्य, अभिनव आर्किटेक्चर कॉलेज, पुणे यांनी संस्थानला देणगी मिळालेल्या जागेवर शैक्षणिक संकुल उभारण्यासाठी प्लॅन दिलेला आहे. तो चांगला आहे. म्हणून मंदिर व मंदिर परिसर विकासासाठी

त्यांचेकडून Plans मागविण्यात यावा. तसेच शिर्डी संस्थान मंदिर व परिसर विकासासाठीचा एक प्लॅन व शिर्डी गांव विकासासाठीचा एक प्लॅन तयार करण्यात येऊन मा.केंद्र व राज्य सरकार यांचेकडे श्री साई समाधी शताब्दी महोत्सवाच्यानिमित्त निधी मिळण्यासाठी प्रस्ताव सादर करावा असे ठरले.

(कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

**०६)** शिर्डीमध्ये नगर-मनमाड रोडवर जे Divider आहेत त्याची उंची अत्यंत कमी असल्यामुळे साईभक्त त्यावरुन ये जा करतात व त्यामुळे तेथे लावलेली झाडेही येत नाहीत. मा.जिल्हाधिकारी, अहमदनगर यांनी याबाबत हैद्राबाद येथे रस्त्यांना असणा-या Divider ची उंची व त्यावर चांगली झाडे आलेले असल्याबाबतची माहिती सभेला दिली. संस्थानने सदर रोड डिव्हायडरची उंची वाढीव धरुन नव्याने प्रस्ताव तयार करण्यासाठी Plans व Estimates तयार करावेत. याकामी जागतिक बँकेची परवानगी घेण्यात यावी. (कार्यवाही-बगीचा विभागप्रमुख/बांधकाम विभागप्रमुख)

**०७)** अहमदनगरचे अतिरिक्त पोलीस अधीक्षक श्री.संजय बारकुंड यांनी अहमदनगर, शनिशिंगणापूर व शिर्डी येथील वाहतूक नियंत्रणासाठी ट्राफिक वॉर्डन म्हणून कर्मचारी मिळणेबाबतचा प्रस्ताव संस्थानकडे सादर केलेला आहे. यामध्ये शिर्डी येथील वाहतूक नियोजनासाठी दररोज ३० कर्मचारी मिळण्याची विनंती केली आहे. दिवसेंदिवस शिर्डी येथे साईभक्तांची गर्दी वाढत चालली आहे. वाहतुकीवर नियंत्रण ठेवणे पोलीस खात्याला तोकडया मनुष्यबळाअभावी शक्य होत नाही. त्यामुळे वारंवार वाहतूक जाम होऊन त्याचा साईभक्तांना त्रास होतो. साईभक्तांना त्रास होऊ नये, त्यांचा वेळ वाचावा व नगर-मनमाड रोडवरील वाहतूक सुरळीत चालावी म्हणून याकामी श्री.संजय बारकुंड,अतिरिक्त पोलीस अधीक्षक, अहमदनगर यांची संकल्पना समजून घेण्यात यावी व त्यानंतर त्यांनी मागणी केल्याप्रमाणे कंत्राटी सिक्युरीटीचे ३० कर्मचारी संस्थानमार्फत शिर्डी येथे ट्राफीक वार्डन म्हणून पोलीस खात्याकडे देण्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-संरक्षण विभागप्रमुख/प्रशासनशाखा वशी-०३)

**०८)** अहमदनगर-मनमाड रोडवर हॉटेल सिध्दांत समोर एक नाला जातो यामध्ये हॉटेलचे ड्रेनेज व संस्थानचे ड्रेनेजचाही समावेश आहे. सध्या सदर नाल्यामध्ये घाण, कचरा पडून पाणी तुंबलेले आहे व त्यामुळे अत्यंत दुर्गंधी सुटलेली आहे. शिर्डी नगरपंचायतने याबाबत संस्थानला पत्र देऊन नाला स्वच्छ करण्याची विनंती केली आहे. सदर नाला हा मुंबई-नाशिक तसेच धुळयाकडून येणारे साईभक्तांना शिर्डीत प्रवेश करतानांच लागतो. तसेच संस्थानच्या प्रसादालयामध्ये साईभक्तांना जाताना याच नाल्यावरुन जावे लागते. त्यामुळे साईभक्तांना या दुर्गंधीचा त्रास होत असल्यामुळे, सदर नाला प्रथम प्राधान्याने स्वच्छ करणे अत्यंत गरजेचे आहे,ही बाब मा.कार्यकारी अधिकारी यांनी सभेच्या निदर्शनास आणून दिली. यावर चर्चा होऊन साईभक्तांच्या सुविधेसाठी एक विशेष बाब म्हणून हा नाला संस्थानमार्फत एखादी एजन्सी नेमून त्वरित स्वच्छ करुन घेण्यात यावा. याकामी येणारे योग्य त्या खर्चासही मंजुरी देण्यात आली.

(कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख/आरोग्य विभागप्रमुख)

**०९)** संस्थानचे व्यवस्थापन सध्या मे.हायकोर्ट नियुक्त त्रिसदस्यीय समिती पाहत आहे. त्रिसदस्यीय समितीच्या सभा असतील त्यावेळी सभेचे इतिवृत्त सभा चालू असतांना निर्णय झाल्यानंतर लगेचच लॅपटॉपवर तयार करुन, सभा झाल्यानंतर लगेच Printout घेऊन त्यावर त्रिसदस्यीय समिती सदस्यांच्या सहया घेण्याची पध्दत त्वरित सुरु करण्यात यावी, असे ठरले. (कार्यवाही-अधिक्षक,सभाकामकाज विभाग)

---

वरील निर्णय क्र. ४०३ ते ४४६ सर्वानुमते घेण्यात आले.
यानंतर सभा समाप्तीची घोषणा करण्यात आली.

| | | |
|---|---|---|
| स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/- |
| (किशोर मोरे) | (डॉ.संजीवकुमार) | (जयंत कुलकर्णी) |
| कार्यकारी अधिकारी | जिल्हाधिकारी, अहमदनगर | मुख्य जिल्हा न्यायाधीश |
| सदस्य | सदस्य | अध्यक्ष |

**श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था, शिर्डी**